।। ॐ ।।

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प ४१

**श्रीदासराममहाराज**
यांची

# आत्म लहरी

ॐ

**प्रकाशिका**
**सौ. रंजना बजरंग हडदरे**

**संपादक**
**प्रा. डॉ. के. वा. आपटे**

आवृत्ति पहिली सांगली इ.स. २०११

श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ४१

श्रीदासराममहाराज यांची

**आत्म लहरी**

प्रकाशिका :

**सौ. रंजना बजरंग हडदरे**

कोठावळे गल्ली, खणभाग, सांगली.

प्रकाशन दिन :

**सोमवार दि. ५/१२/२०११**

मार्गशीर्ष शुद्ध एकादशी, शके १९३३

(प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर पुण्यतिथि)

**प्रथम आवृत्ति, २०११**

© मा. दीपक चंद्रशेखर केळकर यांचे स्वाधीन

मुद्रक :

**एस. बी. ऑफसेट प्रिंटर्स,**

सांगली. ४१६ ४१६

अक्षरजुळणी :

**वरद ग्राफिक्स**

सांगली. मोबा. ९७६६६७२४४७

प्रत मिळणेचे ठिकाण :

**दीपक चंद्रशेखर केळकर**

'श्रीराम निकेतन', ८२७, गांवभाग, सांगली ४१६ ४१६.

भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८

**प्रसादमूल्य : रु. ५०/-**

# प्रकाशिकेचे मनोगत

भगवान श्री सद्गुरु श्रीदासराममहाराज यांचा आत्म लहरी हा ग्रंथ प्रकाशित करण्याचे भाग्य मला लाभले ही फार मोठी भाग्याची गोष्ट आहे. हे भाग्य मला जे लाभले ते माझे पतीदेव श्रीदासराममहाराजांचे कृपांकित व श्रीदादांचेवर आत्यंतिक निष्ठा असलेले श्री. बजरंगराव हडदरे यांच्यामुळे आहे. आमच्या साऱ्या हडदरे घराण्यावर श्रीदादांची अलौकीक अशी कृपा आहे. एवढेच मला सांगता येईल.

सारे हडदरे कुटुंब श्रीदादांचेकडे कसे आकृष्ट झाले याबद्दल चार शब्द लिहावेत अशी मी श्री. बजरंगराव हडदरे यांना विनंती केली. त्यांनीही लिहून दिले ते यासोबत जोडले आहे. त्यांची मी कायमचीच ऋणी आहे.

या ग्रंथाच्या अक्षरजुळणीचे काम वरद ग्राफीक्स प्रो. सागर मोहिते व छपाईचे काम एस. बी. ऑफसेट प्रिंटर्स यांनी केले असून ते फार चांगले झाले आहे. त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडे आहेत.

हे पुस्तक प्रकाशात यायला भगवान श्रीसद्गुरु श्रीदादांचे नातू श्री. दीपक चंद्रशेखर केळकर व प्रा. नारायण केशव आपटे ही सगळी श्रीदादांचीच माणसे/लेकरे आहेत. यांनी खूप कष्ट घेतले आहेत. त्यांनाही धन्यवाद...! याचा एकच अर्थ होतो हे सगळे आमच्या ती.प.पू. श्रीदादांनी केले आहे. मी काहीच केलेले नाही आणि हीच धारणा माझी कायम रहावी अशी भगवान श्रीसद्गुरु श्रीदासराममहाराज यांची चरणी शतशः प्रार्थना करीत आहे.

आमच्या साऱ्या श्री. हडदरे कुटुंबावर श्रीदादांची अशीच कृपा रहावी अशी श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, श्रीसद्गुरु मामामहाराज केळकर, श्रीसद्गुरु श्रीदासराममहाराज केळकर या त्रैमूर्तींच्या चरणी शतशः प्रार्थना करते व साष्टांग दंडवत घालून येथेच थांबते.

अधिक काय लिहू...!

सांगली

दि. २६/११/२०११

देव दीपावली

**सौ. रंजना बजरंग हडदरे**

# माझ्या मनीचे

भगवान श्री सद्‌गुरु श्रीदासराममहाराज यांना अभिवादन करून पत्नी सौ. रंजना यांनी आग्रह केल्यामुळे एक चार शब्द लिहणार आहे. ते श्रीदादांच्या कृपेने पूर्ण व्हावेत ही त्यांचे चरणी शतशः प्रार्थना.

माझे पितृदेव कै. रामराव यशवंत हडदरे व मातोश्री कै. पार्वती रामराव हडदरे या दोघांनाही प.पू. श्रीदासराममहाराज यांचा अनुग्रह लाभला होता. हे जे सगळे घडले ते केवळ प.पू. श्रीसूरदासमहाराज यांचेमुळे. त्यांनी ही सगळी गोडी आम्हाला लावली. मातोश्री कै. पार्वतीबाई श्रीदादांच्या कीर्तनाला यायच्या. कीर्तनाचा जो प्रसाद असेल तो घरी आल्यावर आम्हाला द्यायच्या. या प्रसादातूनच सार्‍या हडदरे कुटुंबाला प.पू. श्रीदादांच्या कडून प्रसाद- अनुग्रह व प्रसन्नता प्राप्ती झाली. 'मातृदेव भव । पितृदेवो भव ।' हेच खरे.

मला कीर्तन, भजन, पुजा यापैकी कशाचीही आवड नव्हती. परंतु आमचे ज्येष्ठ गुरुबंधू कै. विलासराव काटकर नित्यनेमाने प.पू. श्रीदादांचे कीर्तनास जात असत. त्यांची श्रीदादांचेवर नितांत श्रद्‌धा. रात्रीचे जेवण झालेवर आम्ही एकत्र भेटलोकी कीर्तनातील विषय, काही गोष्टी आम्हाला ते सांगत असत. परंतु यातील काहीच माहिती आम्हाला नसल्याने आमचे फारसे लक्ष तिकडे नसायचे. आमचे बँकेतील मित्र श्री. वामनराव सहस्त्रबुद्धे हे श्रीदादांचे कीर्तनाला जायचे. त्यांना भेटणेसाठी आम्ही श्रीराम निकेतनकडे येत असू. त्यांना बाहेर भेटायचे आणि आम्ही परत जायचो. आत यावं, श्रीदादांचे दर्शन घ्यावे असे कधी त्यावेळी वाटले नाही. त्यावेळी आमच्या नशिबातच नव्हते या काय करणार !

श्री. विलासराव काटकर यांना मात्र बरेच दिवस वाटत होते की श्री. हडदरे यांना श्रीदादांचेकडे घेऊन जावे. आणि एक दिवस त्यांनी मला श्रीदादांचे कीर्तनाचे वेळी आणले. कीर्तन, पंचपदी झालेवर त्यांनी माझा परिचय करून दिला. मी घरी आलो. मला खूप खूप बरे वाटले, खूप आनंद झाला. आणि त्याचदिवशी पहाटे श्रीदादा स्वप्नात आले. त्यांनी जे काही मला दाखविले त्याने मी खरोखरीच भारावून गेलो. तो प्रसंग आज ही माझ्या स्मरणात आहे. त्यानंतर प.पू. श्रीदादांनी माझे काही न पहाताना माझ्यावर अनुग्रह केला, मला आपलं म्हटलं काय त्यांचा मोठेपणा आहे याबद्दल सांगायला माझ्याकडे शब्द नाहीत. श्रीदादांनी जे मला सांगितले ते आचरणामध्ये आणण्याचा माझ्याकडून मी प्रयत्न करतो. त्यानंतर माझ्या पत्नी सौ. रंजना बजरंग हडदरे, माझी चार ही मुले, कपील, कल्याणी, कावेरी, गंगा ऊर्फ कीरण यांनाही श्रीदादांचा अनुग्रह मिळाला. मुलांना तर अगदी लहानपणीच अनुग्रह प्राप्त झाला आहे.

माझे सर्व बंधु, त्यांच्या पत्नी, मुले, माझे चुलत बंधु श्री. चंद्रकांत हडदरे, यांच्या पत्नीमुळे आमच्या भगिनी या सर्वांना प.पू. श्रीदादांचा अनुग्रह लाभला आहे. हडदरे कुटुंबांचे हे फार मोठे भाग्य आहे. सर्वांचे अध्यात्मिक व प्रापंचिक कल्याण झाले आहे. आम्ही सर्वजण आनंदात, सुखात आहोत.

प.पू. श्रीदादा आमचे घरी अनेक वेळा आले. काही वेळा त्यांची पाद्यपुजा पण केली. आपणहून त्यांनी आपल्या चंदनाच्या पादुका दिल्या. त्याची नित्यनेमाने पुजा होते. चैत्र पाडव्याला या पादुका स्थापनेचा वाढदिवस घरगुती पण थाटात संपन्न होतो. अनेक भक्त उपस्थित असतात. प.पू. श्रीदादा एकदा मला असे म्हणाले की 'हडदरे, मी तुमचा हात सोडण्यासाठी धरलेला नाही. सगळीकडे मला चैतन्याशिवाय काही दिसत नाही आणि दिसलेलेही नाही.' आपली काय इच्छा आहे असे त्यांनी मला विचारलेवर मी म्हणालो 'आपली आम्हा सर्वांचेवर कृपा असावी, साधना व्हावी व दररोज घरी रामपाठ व पंचपदी व्हावी. आणि केवळ त्यांच्या सत्तेने नित्यनेमाने आजही ते सारे सुरु आहे.

आमचे आई-वडील असताना व त्यांनी देह ठेवल्यावर घरच्या सर्व कुटुंबीयांची जबाबदारी माझ्या पत्नी सौ. रंजना हिने फार कष्ट करून सांभाळली आहे. मी कोणतीही जबाबदारी घेत नव्हतो व घेतलेली नाही. पत्नी सौ. रंजना ह्या मुळच्या इचलकरंजीच्या. कै. लक्ष्मण दत्तात्रय घोरपडे यांच्या कन्या होत. त्यांचे घरीही मारुति मंदिर असून याला सोन्या मारुति या नावाने ओळखले जाते. अनेक वर्षे सेवा सुरु आहे.

सौ. रंजना समंजस, मनमिळावू, प्रेमळ आहे. कोणीही आले तरी आगत-स्वागत हसत मुखाने होते. एके दिवशी दुपारी ३ वा. श्रीदादांचेकडे मी व सौ. रंजना आलो होतो. सौ. रंजनाने श्रीदादांना नमस्कार केला. त्यावेमी श्रीदादा म्हणाले 'अहो हडदरे, ही माझी लेक आहे त्या दृष्टीने तीच्याकडे पहा.' प.पू. श्रीदादांचे घरचे कोणीही आले तरी तीला फार आनंद होतो. काय करु आणि

काय नको अशी तीची अवस्था होते.

आज आमचे दोन्ही जावई, दड्डीचे श्री. संपतराव भांदुर्गे व कराडचे श्री. विकासराव पवार यांना प.पू. श्रीअण्णांचा अनुग्रह लाभला आहे. त्यांच्या पत्नी, मुले सतेज, कु. कैवल्या व राम सगळे आनंदात व सुखात आहेत. दोन्ही जावयांचे आई-वडील भगवद्भक्त व वारकरी आहेत.

आजवर जे सगळे चांगले घडत आले आहे व घडणार आहे ही केवळ श्रीदादांची कृपा आहे. अशीच कृपा सतत आमच्या हडदरे घराण्यावर रहावी अशी त्यांचे चरणी शतशः प्रार्थना आहे.

शेवटी भगवान श्रीसद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, भगवान श्रीसद्‌गुरु श्रीमामामहाराज केळकर, भगवान श्रीसद्‌गुरु श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी अनेक प्रणिपात.

प्रा. डॉ. के. वा. आपटे यांच्या शब्दात जर सांगायचे झाले तर,

रामराय रामराय रामराय रामराय ।
राममाय राममाय राममाय राममाय ।
रामतात रामतात रामतात रामतात ।
राम पायी दंडवत, राम पायी दंडवत ।।

असे शतशः दंडवत श्रीदादांचे चरणी करतो आणि थांबतो.

''सद्‌गुरुनाथ माझे आई । मला ठाव द्यावा पायी ।।''

सांगली
दि. २६/११/२०११
देव दीपावली

श्रीदादांचा एक सेवक,

बजरंग हडदरे

**बजरंग रामराव हडदरे**

# श्रीराम

श्री.प.पू. श्रीदासराममहाराज केळकर यांची आत्म लहरी प्रकाशात आणत आहेत आमच्या श्री. बजरंग हडदरे साहेब यांच्या पत्नी सौ. रंजना बजरंग हडदरे. अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. या योगे अनेक साधकांचे वर त्यांचे फार मोठे उपकार आहेत.

आत्म लहरी लहरतात केव्हा हा फार मोठा प्रश्न आहे. 'कृष्ण विष्णु हरि गोविंद। या नामाचे निखील प्रबंध । माजी आत्मचर्चा विशद। उदंड गाती ।।' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. आणि नामाचे निखील प्रबंध कशातून निर्माण होतात ''म्हणोनी माझे नित्य नवे । श्वासोश्वासही प्रबंध होवावे । श्रीगुरुकृपा काय नोहे । ज्ञानदेवो म्हणे ।।'' त्या महात्म्याच्या प्रत्येक श्वासागणिक हे प्रबंध उमटतात व काय नोहे ऐसे होते आणि त्यातूनच आत्म लहरी लहरतात.

परमार्थात नित्य नूतनला फार मोठे महत्त्व आहे. 'नित्य नवा कीर्तनी कैचा ओढवला रंग । श्रोता आणि वक्ता स्वये झाला श्रीरंग ।।' 'नित्य नवे जे देईल माधव । भक्षु तेचि घरी ।।' असा या श्रीदादांच्या नित्य अखंड कीर्तनातील नित्य नूतन रंग या आत्म लहरीतून आपल्याला अनुभवता येणार आहे. तसा तो यावा अशी शतशः प्रार्थना ती.प.पू. श्रीदादांचे चरणी करतो.

भगवान श्रीसद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू. श्रीमामामहाराज केळकर व माझे पितृदेव श्रीदासराममहाराज केळकर यांना शतशः अनेक प्रणिपात करून श्री हडदरे कुटुंबाला शतशः धन्यवाद देऊन येथेच थांबतो.

या पुस्तक प्रकाशनाचे कामी आमच्या श्रीदादांच्या अंतरंगातील शिष्य प्रा. डॉ. के. वा. आपटे तथा आमचे ती. केशवकाका, त्यांचे चिरंजीव प्रा. नारायण के. आपटे व आमचा श्री. दीपक केळकर यांनी फार कष्ट घेतले आहेत. त्यामुळे हे आपल्याला उपलब्ध होत आहे. त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडे आहेत.

सद्‌गुरुनाथ माझे आई । मला ठाव द्यावा पायी ।। अशी श्रीदादांचे चरणी प्रार्थना करून येथेच थांबतो.

सांगली
दि. २६/११/२०११
देव दीपावली

श्रीदादांचा कृपाभिलाषी

चंद्रशेखर

**(चंद्रशेखर रामराय केळकर)**

# प्रस्तावना

श्रीदासराममहाराज ऊर्फ श्रीदादा यांची ‘आत्मलहरी’ ही चार वह्यांत लिखित स्वरूपात आढळून येते. त्यांचा तपशील असा :- वही १३९ मध्ये श्री. व. म. बापट यांनी केलेली श्रीदादांच्या आत्मलहरीची प्रत आहे. या वहीत एकूण १८६९ वक्ये आहेत. वही क्रमांक ८१ मध्ये आत्मलहरीतील काही वाक्यांची प्रत आहे. ही प्रत कुणी केली हे ज्ञात नाही. या वहीत ‘‘धुताच मोती जळी हरपलं’’ या वाक्यापासून प्रारंभ होऊन आणि त्याला क्रमांक १ देऊन होणारी एकूण ६२ वाक्ये आहेत. शेवटचे ६२ वे वाक्य ‘‘सत् चिदानंद परमात्मा म्हटल्यानंतर त्याचे अस्तित्व सिद्‌ध करण्याची आवश्यकता नाही,’’ असे आहे. वही क्रमांक ६२ मध्ये श्रीदादांच्या हस्ताक्षरातील आत्मलहरी आहे. त्यात १ ते १९८६ इतकी वाक्ये आहेत. पण मध्ये चुकीचे अंक पडल्याने एकूण वाक्ये कमी होतात. वही क्रमांक १०१ ही कार्डशीटचे कव्हर असणारी आहे. यातील वाक्ये १९८७ क्रमांकापासून सुरू होतात. म्हणजे वही क्रमांक ६२ मधील शेवटच्या १९८६ क्रमांकानंतरचे हे क्रमांक आहेत. वही क्रमांक ६२ मध्ये शेवटच्या पृष्ठाचा क्रमांक 182 असा इंग्रजीत आहे तर वही क्रमांक १०१ मध्ये पहिला पृष्ठ क्रमांक 173 असा इंग्रजीत आहे. ही अनवधानाने घडलेली चूक आहे. हा पृष्ठ क्रमांक 183 असा हवा होता. या क्रमांक १०१ वहीमध्ये १९८७ ते २०८३ इतकी वाक्ये आहेत. याचा अर्थ असा होतो की श्रीदादांच्या हस्ताक्षरातील आत्मलहरीची वाक्ये १ ते २०८३ इतकी होतात. येथे हे लक्षात घ्यावे की क्रमांकांचे मधले आकडे चुकलेले आहेत.

वरील सर्व वह्यांत वही क्रमांक ६२ ही महत्त्वाची आहे. या वहीचा अधिक तपशील पुढील प्रमाणे देता येतो. (१) ही वही रेखांकित असून, तिला पुठ्ठा कव्हर आहे. (२) प्रारंभीच्या क्रमांकरहित पानावर

।। श्री।।

आत्मलहरी

या शब्दांखाली श्रीदादांची इंग्रजीत सही, इंग्रजीत Sangli हा शब्द व त्याचे खाली इंग्रजीत 15-8-1955 अशी तारीख आहे. (२) नंतर एका पानावर फक्त ‘‘आत्मलहरी’’ हा शब्द आहे. (३) यानंतरच्या वहीच्या पृष्ठांना श्रीदादांनी इंग्रजीत पृष्ठ क्रमांक दिले आहेत. ते 1 ते 182 असे आहेत. (४) शेवटचे क्रमांक १९८६ वाक्य संपल्यावर आत्मलहरी संपली असे दाखवणारी खूण नाही. (५) पृष्ठ १ वर ।।श्री।। व मराठीत ता. २१-७-५५ आहे. (६) पृष्ठ ४८ वर ।। ॐ ।। ता. १६-६-५४ आहे. (७) पृष्ठ ५५ वर तळाशी ‘‘सोमवार, आषाढ व ४, शके १८७६, ता. १९-७-५४’’ असे शब्द आहेत. (८) पृष्ठ ६६ वर ‘‘बुधवार, आषाढ व षष्ठी, शके १८७६, ता. २१-७-५४’’ असे आहे. याच पानावर क्रमांक ६४० च्या वाक्यानंतर ता. २९-७-५४ असे आहे. (९) पृष्ठ ८१ वर ता. २६-८-५४ असे अंक आहेत. (१०) पृष्ठ ८४ वर ता. २६-८-५४ असे लिहिलेले आहे. (११) पृष्ठ ८८ वर, ता. २८-८-५४ असे आहे. (१२) पृष्ठ ८८ नंतर पुढे कुठेही तारखा दिलेल्या नाहीत. (१३) पृष्ठ १४० वर, १५२६ क्रमांकाच्या वाक्यानंतर--ह्ल--ह्ल--ह्ल-- अशी समाप्तीची खूण आहे. (१४) पृष्ठ १४८ वर, क्रमांक १६१८ च्या वाक्यानंतर ‘‘आत्मलहरी हे अनंत । तुर्त स्थिरली येथ’’ दासराम, असे शब्द आहेत. (१५) पृष्ठ १८२ वर, क्रमांक १९८६ हे शेवटचे वाक्य आहे. पण त्यानंतर ‘आत्मलहरी’ संपल्याची कोणतीच खूण नाही.

वर दिलेल्या तपशीलावरून पुढील निष्कर्ष निघू शकतात :-

**(१)** इ.स. १९५४ सालापासून श्रीदादांना ‘आत्मलहरी’ स्फुरू लागली आणि ती त्यांनी लिहून काढली. (२) वाक्य क्रमांक १५२६ नंतर आणि वाक्य क्रमांक १६१८ नंतर, आत्मलहरी तात्पुरती थांबली असे दिसते. तथापि त्यानंतरही ती स्फुरत राहीली हे उघड आहे. (३) इ.स. १९५४ मध्ये स्फुरणारी ‘आत्मलहरी’ ही इ.स. १९५५ मध्ये पूर्ण झाली असावी. म्हणून वही क्रमांक ६२ च्या प्रारंभीच्या पानावर १५-८-१९५५ अशी तारीख श्रीदादांनी घातलेली दिसते.

‘आत्मलहरी’ मधील वाक्यांना श्रीदादांनी स्वतःच मराठीत क्रमांक १ ते १९८६ असे दिले आहेत. पण ते देताना अनवधानाने पुढील प्रकार झालेले दिसतात :- (१) पृ. ५३ वरील वचन क्रमांक ५१५, ५१६ आणि ५१७ हे पुढे वचन क्रमांक ५१८, ५२०, ५२१ असे पुनरुक्त झाले आहेत. (२) पृष्ठ १०० वर वचन क्रमांक १०१० नंतर वचनांचे क्रमांक १०११ चे ऐवजी ११११ पासून

सुरू झाले आहेत. (३) पृष्ठ ११८ वर, वचन क्रमांक १२७६ नंतर एकदम १२७७ हा क्रमांक आला आहे. (४) पृष्ठ १२३ वर क्र. १३३० नंतर एकदम क्रमांक १३३३ आला आहे. (५) पृष्ठ १३५ वर, क्रमांक दोनदा पडला आहे. (६) पृष्ठ १३८ वर, क्रमांक १५०१ नंतर एकदम क्रमांक १५०६ असा येतो आणि क्रमांक १५०६ हा दोनदा आला आहे. तसेच क्रमांक १५१० नंतर एकदम क्रमांक १५१६ आला असून, त्याची द्विरुक्ति झाली आहे. (७) पृष्ठ १४४ वर, क्रमांक १५७४ नंतर एकदम क्रमांक १५७६ आहे. (८) पृष्ठ १४७ वर, क्रमांक १६०८ हा दोनदा पडला आहे. (९) पृष्ठ १५६ वर, क्रमांक १७१६ नंतर एकदम क्रमांक १७१८ आला आहे.

वर सांगितल्याप्रमाणे अनवधानाने झालेल्या आकड्यांचा गोंधळ लक्षात घेतला तर आत्मलहरीतील - वही क्रमांक १०१ प्रमाणे - २०८३ वाक्ये न रहाता ती फक्त १९५५ इतकीच वाक्ये होतात.

## आत्मलहरी हे शीर्षक

अंतःस्फूर्त अशा या वचनांना श्रीदादांनी स्वतःच आत्मलहरी हे नाव दिले आहे. आणि ''आत्म्यातून उठलेल्या लहरी'' असे स्पष्टीकरणही दिलेले आहे. आणि ही आत्मलहरी अनंत आहे असेही म्हटले आहे.

आत्मलहरी जरी अनंत असली तरी श्रीदादांनी तिला बंदिस्त करून सांत केले आहे हे आपण लक्षात घ्यावे.

आता आत्मलहरी म्हणजे तरी काय असा प्रश्न येतो. त्याचे उत्तर असे :- आत्म्यातून उठणाऱ्या लहरी, या स्पष्टीकरणात 'आत्म' शब्दाचा अर्थ काय असा प्रश्न आहे. आत्मलहरी शब्दातील 'आत्म' शब्दाने 'आत्मा' हे अंतिम तत्त्व सूचित होत नाही हे उघड आहे. कारण अंतिम तत्त्व 'आत्मा' हे निश्चळ, निर्गुण इत्यादि आहे. असे दादांनी स्वतःच सांगितले आहे. तेव्हा अंतिम तत्त्वाच्या लहरी असा अर्थ होणार नाही.

संस्कृतमध्ये 'आत्मन' शब्दाला अनेक अर्थ आहेत त्यात 'मन' असा एक अर्थ आहे. मन हे संकल्पविकल्पात्मक आहे. मनामध्ये सतत विचार येत असतात. हे विचार अनंत, असंख्य होऊ शकतात. अनेकदा 'विचार-तरंग' असा शब्द वापराला जातो. तरंग म्हणजे लहरी असा अर्थ आहे. तेव्हा आत्मलहरी म्हणजे 'मनातील विचारतरंग' असा अर्थ होतो. तेव्हा आत्मलहरी म्हणजे श्रीदादांच्या मनात निरनिराळ्या वेळी जे विचार आले त्यांचा संग्रह असा अर्थ होतो.

## आत्मलहरीची वर्गीकरणे

मनातील विचार तरंग नाना प्रकारचे असू शकतात. त्यामुळे निरनिराळ्या दृष्टिकोनातून त्याचे वर्गीकरण करता येणे शक्य आहे. यापुढे अशी काही वर्गीकरणे सुचवून, त्यातील उदाहरणे नमुना म्हणून दिली आहेत :-

**१) महाराजांविषयी :-** महाराज हे आपल्या भक्ताला इकडे तिकडे जाऊ देतच नाहीत. महाराजांचे स्वप्नातही दर्शन होणे ही मोठी पुण्याईची गोष्ट आहे.

**२) स्वतः विषयी :-** महाराजांचे नावानेच माझे काय ते व्हावे यापलीकडे माझी इच्छाच नाही. सर्वांचा माझ्याशी संबंध येतो म्हणून मला सर्वांनाच राखले पाहिजे.

**३) श्रीदादांना आवडणारे संतांचे अभंग, पदे, वा त्यांचे चरण उदा.**

(अ) संपूर्ण अभंग :-

उल्लंघिली लाज...... उरली वाचा मारी हाका ।।
घालोनी आसन...... तोची ही जाणेल वर्म खूण ।।

(आ) अभंग/पद यांचे काही भाग :-

करविली तैसी केली कटकट । वाकडी की नीट देव जाणे ।।

**४) श्रीदादांना पसंत पडलेल्या व्यवहारातील म्हणी अथवा वाक्प्रचार उदा.**

जुने ते सोने, एक पुती रडे, सात पुती रडे.

**५) व्यवहारातील गोष्टी विषयी :-**

परतीराला गेल्यावर नावेची जरुरी नाही. दुसऱ्याचे काहीही ऐकून करू नये. स्वानुभवाने बुद्धीला पटेल तेच करावे. प्रेमाशिवाय राग नाही. मी पापी दुर्दैवी असे म्हणू नये. खोटे बोलण्याइतके पाप नाही. चिंता करून काय होते? कोणास जामीन होऊ नये.

व्यावहारिक जीवनात काम, क्रोध इत्यादि विकार असतात. त्यांचे समीकरण

असे :- काम + क्रोध = लोभ. क्रोध + लोभ = मोह. लोभ + मोह = मद.
मोह + मद = मत्सर. मद + मत्सर = काम.

**६) परमार्थाविषयी :-**

१) निश्चळ आत्मा

२) आनंद सतत टिकणे म्हणजेच परमेश्वर दर्शन.

३) साधना परते सुख नाही. साधनाने वृत्ति निवळते. साधनात सर्व सुख आहे.

४) भक्तीचे विस्मरण झाले तर भक्त व्याकुळ होतो.

५) भक्ताकरता व्यवहार व चमत्कार देवच करतो. भक्तीचे सुखदुःख, पाप पुण्य, मानापमान, कीर्ति-अपकीर्ति, यशापयश देवाला आपलीच वाटतात.

६) संतांच्या बोलण्यात, लिहिण्यात, वागण्यात अहंकार येत नाही.

७) जग म्हणजे वायूचा विलास आहे. जग हे बनले आहे म्हणून त्याला अस्तित्व आहे.

८) शरीराचा व जीवाचा तसा संबंध नाही, फक्त ते जवळ जवळ आहेत.

९) काम क्रोधाचा यथोचित उपयोग करणे म्हणजेच त्यांचा नाश.

१०) एक मीपणा गेल्याने संसार ब्रह्मरूप

११) प्रेमाची पराकाष्ठा हीच भक्ति. संतोष ही श्रीमंती.

ढोबळमानाने वरील वर्गीकरण सुचविलेले आहे. एक मात्र लक्षात घ्यावे की आत्मलहरीतील अनेक वाक्ये ही अर्थगर्भ आहेत; त्यांचे स्पष्टीकरण आवश्यक आहे.

अशी ही श्रीदासराममहाराजांची ऊर्फ श्रीदादांची ''आत्मलहरी'' आहे. तिचा यथोचित उपयोग व्हावा.

**- के. वा. आपटे**

# आत्म लहरी

१. गाडी या रुळावरुन त्या रुळावर घेताना सांधा बदलावा लागतो.

२. सुपारी प्रिय आहे खरी पण ती आपल्याला मानवत नसेल तर ती कितीही चांगली असली तरी सोडलीच पाहीजे.

३. मनुष्याच्या कृतीपेक्षा वृत्तीलाच अधिक महत्त्व असून त्याचे हेतूवरच पापपुण्याचे मोजमाप होते.

४. एका औषधाने ७२ रोग ७२ लोकांचे बरे करणेचे सामर्थ्य एका महाराजांचे जवळच आहे.

५. आपणास नको असलेली म्हणजे आवश्यक नसलेली गोष्ट आपोआपच बाजूला होते असा परमार्थाचा अनुभव आहे.

६. मनाच्या विरुद्ध कांही गोष्टी घडणे हा निसर्ग असून एखादी गोष्ट का होईना पण ती मनासारखी होणे हा दैवी चमत्कार आहे.

७. करविली तैसी केली कटकट । वाकडी की नीट देव जाणे ।। तुकाराम

८. आपण आपल्या स्वार्थाकरताच केवळ जोपर्यंत कांही करत नसतो तोपर्यंत पापपुण्याची बाधा होण्याची भीती नाही.

९. स्वार्थाची पराकाष्ठा हाच परमार्थ.

१०. एक मीपणा गेल्याने संसार ब्रह्मरूप.

११. प्रेमाची पराकाष्ठा हीच भक्ती.

१२. जीवाची पराकाष्ठा म्हणजेच देव.

१३. सर्व काही वायूच असून नाम, रूप, गुण हा त्याचा विलास आहे. यात जो स्वतःला विसरला त्याच्या आड काही येत नाही. सर्व काही त्याच्या मनाजोगते होते आणि त्याला ज्या गोष्टी अनावश्यक असतात त्या त्याच्या मनातच येत नाहीत.

१४. भक्ताकरता व्यवहार व चमत्कार देवच करतो.



१५. तुमच्या मनात जे आहे तसाच मी आहे असे समजा.

१६. जे कोणी तुम्ही स्वतः आहा ते तुम्ही जे करता तेच मला करावे लागते; कारण त्यापेक्षा निराळे करणे आता शक्य नाही. होत असेल तर ती चैतन्याची सत्ता, विलास व ऐक्य आहे असे समजा.

१७. जो दुसऱ्याचे नुकसान करू पाहतो त्याचेच नुकसान होते हा ईश्वरी न्याय आहे.

१८. भक्ताचे सुखदुःख, पाप पुण्य, मानापमान, कीर्ती, अपकीर्ती यशापयश देवाला आपलीच वाटतात.

१९. देवाची व भक्ताची भाकरी एकच.

२०. साधनापरते सुख नाही.

२१. भक्ताचा अपमान झाल्यास देवाला तो आपलाच वाटतो.

२२. साधकाचे पहिले पाऊलच बरोबर पाहिजे.

२३. समोरच चहा असून चहाची चहा न करणे हेच देहभान विसरल्याचे लक्षण होय.

२४. देवभक्तांचा व्यवहार कार्यकारणावर अवलंबून नसल्याने तो अखंडच चालतो.

२५. प्रेमव्याज देई हरी । माझा हिशेब लवकर करी ।।

२६. देव भक्तांचा जमाखर्च बिन हिशोबी. कारण भक्तीचा हिशेब करता येत नाही.

२७. गोपींनी दाराला अडसर घालून कृष्णाला येऊ नको म्हटले तरी कृष्ण जातच होता.

२८. भक्तीचे विस्मरण झाले तर भक्त व्याकुळ होतो.

२९. भगवंताचे स्मरणानेही भक्ताला समाधान होते.

३०. ते माझे सोयरे सज्जन सांगाती। पाय आठविती विठोबाचे ।।१।।
येर मान विधी पाळणापुरते । देवाची ती भुते म्हणोनिया ।।२।।

३१. तुका म्हणे तुज सोडविना कोणी । एका चक्रपाणी वाचोनिया ।।१।।

३२. तुका म्हणे मार्ग शुद्ध केला चित्ती ।
३३. उल्लंघीली लाज। तेणे साधीयेले काज ।।१।।
हरिनामाची सांगडी । भावे बांधीली आवडी ।।२।।
नाचू पैलतीरी । पार गेलो भवसागरी ।।३।।
पार झाला तुका । उरली वाचा मारी हाका ।।४।।
३४. ज्याचे सुख त्याला सुख त्याला । काय असे भलत्याला ।।१।।
३५. काळ जवळीच उभा नेणा । घाली झडप खुंटी काना ।।
कैसा हुषार सावध होई । आपण तू आपले ठाई ।।
३६. नाशिवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ।।
३७. आयुष्याच्या या साधने । सत्‌चिदानंद पदवी घेणे ।।
३८. नाम संकीर्तन साधन पै सोपे । जळतील पापे जन्मांतरीची ।
३९. तुका म्हणे होसी नामेची तू मुक्त । काय करिसी भुक्त जाणिवेची ।।
४०. घालोनी आसन करी एकाग्र मन । मेरुदंड जाण उभा राहे ।।
नासिकेपासोनी अंगुळ्या त्या चार । दृष्टी करी स्थिर तये ठायी ।।
प्रथम प्रकाश चांदणे पडेल । तेज ते दाटेल वर्णवेना।।
तया तेजामाजी देहभाव राहे । निर्विकल्प पाहे समाधि ते ।।
तुका म्हणे ज्यासी सद्‌गुरु असेल । तोची ही जाणेल वर्म खूण ।।
४१. स्वरूपाचा पूर गगना सरिसा आला। देखणा बुडाला देखताची ।।१।।
चैतन्याचा लोट धावे एक सरा । प्रळयाची निरा सारिखेची ।।२।।
नातरी मोतये विखुरली अंबरी । दिसती परी करी येतीच ना ।।३।।
गुरुमुखे खुण ओळखुनी घ्यावी । देहीच पावावी मुक्त दशा ।।४।।
ज्ञानदेव म्हणे निवृत्ती दातारे । चोजवीले सारे माझे मज ।।५।।
४२. उफराटी दृष्टी लावुनिया दिली । प्रकाशाची केली भेटी जेणे ।।
४३. ज्याचे सुख त्याला सुख त्याला । काय असे भलत्याला ।।ध्रु।।
एक जेवुनी तृप्त झाला । एक हाका मारी अन्नाला ।।१।।
एक नदी उतरुनि गेला । एक हाका मारी तारूला ।।२।।



तुका वैकुंठाशी गेला । हाका मारितो लोकाला ।।३।।
४४. देव्हाऱ्यावरी विंचु आला । देव पूजा नावडे त्याला ।
त्यासी पैजाराचे काम । अधमाहोनी तो अधम ।।
४५. सर्प विंचू नारायण । परी वंदावे दुरून ।।
४६. ऐका ऐका भाविक जन । कोण कोण व्हाल ते ।।
तार्किकांचा टाका संग । पांडुरंग स्मरा हो ।।
नका शोधु मतांतरे । नुमगे खरे बुडाल ।।
कलीमध्ये दास तुका । जातो लोका सांगत ।।
४७. परतीराला गेल्यावर नावेची जरुरी नाही.
४८. देवाची गाठ पडेपर्यंत कोणीही पुजाऱ्यास विचारतो.
४९. गरज सरो वैद्य मरो, असे नसावे.
५०. समज मन कोई नही अपना ।।ध्रु।।
चारो मीलकर खाट उठावे । जंगल बीच रहना ।।१।।
जंगल बीचमे लकडीके चुलना । हर हुन्नर से जलना ।।२।।
कहत कबीरा सुनो भाई साधु । ओ एक घर अपना ।।३।।
५१. कोन बतावे वाट गुरुबीन कोन बतावे बाट । बडा बिकट जमघाट ।।ध्रु।।
भ्रांती के बाडी नदीया बीचमे । अहंकारकी लाट ।
मदमत्सरकी धारा बरसत । माया पवन घनदाट ।।१।।
काम क्रोध दो पर्वत ठाडे । लोभ चोर संगात ।
कहत कबीरा सुनो भाई साधु । मत करना बोभाट ।।२।।
५२. तुका म्हणे जरी अग्नी झाला साधु । परी पावे बाधु संगष्टणे ।।१।।
५३. एक पहातसा एकाची दहने । सावध त्या गुणे का रे व्हाना? ।।
५४. बोलता बोलता जिव्हा पै खादली । खेचरी लागली पहाता पहाता ।।
५५. वामसव्य दोहीकडे । देखू देवाचे रुपडे ।।१।।
खाली पाहो अथवा वरी । अवघा दिसे माझा हरी ।।२।।
डोळे झाकोनिया पाहे । गोपाळ पुढे उभा राहे ।।३।।

अणु रेणु चक्रपाणी । खूष झाली दासी जनी ।।४।।

५६. नामयाची जनी लागे संताचे पायी ।
प्रेम असो द्या हृदयी म्हणोनी ठेवीतसे डोयी ।।

५७. भक्ताने शिव्या दिल्या तरी देवाला आनंदच होतो ।
उभी राहोनी अंगणी । शिव्या देते दासी जनी ।।
अरे विठ्या अरे विठ्या । मुळ मायेच्या कारट्या ।।

५८. ज्याचे हाताला एक नाम येते त्याची कोणत्याही वस्तूवर एकच प्रचीती येते.

५९. व्यवहारात कोणत्याही पदार्थाची प्रचीती भिन्न असते.

६०. कानाची, डोळ्याची, नाकाची, जीभेची, त्वचेची प्रचीती भिन्न आहे. एकाची एकाला येत नाही.

६१. डोळ्याची प्रचीती कानाला व कानाची डोळ्याला येणार नाही.

६२. दोरी असताना साप दिसला व कंदील घेऊन पाहता पुन्हा दोरी दिसली. यात पदार्थ पहाणारा एक व त्याचे डोळेही होतेच, पण प्रचीती एकाच डोळ्याची भिन्न झाली.

६३. चत्वार देहाला सुटून चैतन्यरूप झालेला जीवच नाम देऊ शकतो.

६४. ज्याला नाम द्यावयाचे असते असा जीव जी जी वलये घेत बनत बनत दृश्य स्थितीत आला तेथेच धक्का देऊन त्याची ती वलये फोडूनच व पूर्वस्थितीत आणून चैतन्याकडे खेचावा लागतो.

६५. चक्रव्यूहात ज्या मार्गाने जावे त्याच मार्गाने व त्याच पावलाने परतावे लागते.

६६. ज्याची प्रचीती एक तेथे कोणतीही लाट आली तरी त्याची प्रचीती एक होऊन ती लाट नाहीशी करून तो तीच प्रचिती घेऊ शकतो व देऊ शकतो.

६७. स्थानभ्रष्ट झालेला जीव भ्रमणाने अनेक प्रचीती घेतो. त्याचा त्याच भ्रमणाने सर्व वलयांचा निरास करीत मूळ स्थानात आणून त्याचे चैतन्याशी



तादात्म्य करून मग त्यास अढळ पदावर बसवावे लागते.

६८. चैतन्याशी तादाम्य झालेल्या जीवाचे तो दरवाजातच असल्याने बाह्य उपाधीची खेच होऊन जर तो तेथेच तादात्म्य झाला, तर तो त्या सुखाला अंतरतो. म्हणून साधनाची आवश्यकता आहे. स्थानभ्रष्ट भ्रमित झालेला जीव जर स्थानावर सर्व वलये फोडून आला तर त्याला एक प्रचीती झाल्याने दृश्यातील अनेकत्व सरून दृश्यनिरासाने आत्म्याशी समरस होतो त्याला साधन करावे लागत नाही.

६९. जीवाला रोज नवे हवे असते; पण ज्याचे जीवन एक झाले त्याची वृत्तीच एक होते. यामुळे तो विचार करतो की घ्यावयाचे झाले तर कृष्णाबाईचेच पाणी व रोज सूर्याचाच प्रकाश घेतला पाहिजे. रहावयाचे तर पृथ्वीवरच व जगायचे तर श्वसनाचा अवलंब केला पाहिजे. प्राणाशिवाय जगताच येणार नाही तर श्वसनाचा अवलंब केला पाहिजे. प्राणाशिवाय जगताच येणार नाही तर एक जीवन झाल्यावर आता अनेकाला अनेक प्रचीती कशी संभवेल? रोज नवीन कुठले आणावे?

७०. परमेश्वरप्राप्तीचा रस्ता एकच.

७१. ज्याचे सुख त्यानेच शोधले पाहिजे.

७२. वृत्ती, प्रवृत्ती, निवृत्तीचा विचार प्रगट होणे म्हणजे खोबरे व नारळातील पाणी घेतले नाही तर नारळाच्या शेंडीने तवा घासल्यापैकी आहे.

७३. चैतन्याचे अधिष्ठानावर मनाचे ठिकाणी उसळलेल्या लाटा चैतन्याकडे धावणारच.

७४. आयुष्याचा क्रम एकच झालेल्या जीवाला तो बदलावा असे स्वप्नात सुद्धा वाटत नाही.

७५. गुरुशिष्याचे नाते न बदलणारेच आहे.

७६. अनेक प्रचीती घेतच जीव दुःखी राहीला म्हणून प्रचीती एक झाल्यावर त्याला मागील प्रसंगांची आठवण झाली तरीही ओकारी येते.

७७. निर्विकल्पासी कल्पिता । कल्पना मोडे तत्त्वता ।।

७८. परमार्थाचा विचारही परमार्थात जमा होतो.

७९. शरीराने घडते ते पाप, मनाने घडते ते पुण्य.

८०. अग्नीत कोणताही पदार्थ भस्मसात् व्हावा, तसे चैतन्यात पापपुण्याची विभूतीच होते; त्याचा शहाण्यानी विचार करू नये.

८१. रोज नवे पहाता जन्म गेला पण जुने कोणी पाहीचना.

८२. जुने ते सोने.

८३. देवळात जाऊन जोड्यात चित्त, असे भ्रमित जीवाचे केव्हा केव्हा होते.

८४. चैतन्यरूप झालेल्याला घाणीतही चैतन्य दिसते; उलट पक्षी जड जीवाला चैतन्यातही घाण दिसते; असे परस्पर विरोधी गुणधर्म सुज्ञ जाणतात.

८५. सुंब जळला तरी पीळ जळत नाही; या प्रमाणे अनुभव येऊनही काही वेळा विरोधी शक्ती साधकास नडवते.

८६. संताचे पहिले व शेवटचे इंप्रेशन एकच, इतरांचे तसे नसते.

८७. बोलणाराची मातीही खपते, पण न बोलणाऱ्याची साखरसुद्धा खपत नाही.

८८. नांद्रयातील निरूपणाची X.Y.Z. ला आठवण देताच तो खजील झाला.

८९. क्षणोक्षणी हाची करावा विचार । तरावया पार भवसिंधु ।।
नाशीवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ।।

९०. जग म्हणजे वायूचा विलास आहे. जग हे बनले आहे म्हणून त्यास अस्तित्व आहे. त्यातील वायु तो आनंदरूप व त्याचा विलास चैतन्यरूप आहे.

९१. कुठेही गेलो तरी पळसाला पाने तीनच.

९२. एक पुती रडे, सात पुती रडे

९३. दुःखाचे चटके बसल्याशिवाय मनुष्य परमार्थाकडे वळत नाही. खरे सुख मिळत नाही म्हणून तर परमेश्वराने जन्म दिला आहे व यात सुख शोधणे हास्यास्पद आहे.

९४. ज्याचे साधन पुरे झाले आहे त्याला हवे नको असे काही असत नाही.



९५. जे आपण हवे म्हणतो ते केव्हा तरी पूर्वी नको होते व जे नको म्हणतो ते केव्हातरी हवे होते हे निश्चित.

९६. ज्याचे साधन पुरे झाले आहे त्याची दृष्टी जर भिडली तर बाकीच्या सर्व दृष्टी निवळतात व एकच उरते.

९७. अहंपणा नाहीसा झाला की तृतीय पुरुषातील व्यवहार सुरू होतो.

९८. संताच्या बोलण्यात, लिहिण्यात, वागण्यात अहंपणा येत नाही.

९९. डोळा हे पापाचे व पुण्याचे उत्पत्ति स्थान असून नरकाचे व स्वर्गाचे द्वार आहे.

१००. कृपेनेच जे पूर्ण होतात त्यांचे साधन दिसण्यासारखे नसते; कारण कृपा हेच त्यांचे साधन.

१०१. मुक्तीवरील गुरुभक्ति हेच खरे साधन.

१०२. सहज साधन हे आसनरहित दृष्टीचे केंद्रीकरणात असल्याने दिसण्यासारखे नसते व ते एखाद्यालाच लाभते.

१०३. कृपेने साधन अथवा सहज साधन हा अपवादच, नियम नव्हे.

१०४. कोणालाही साधनाची जरुरी आहेच.

१०५. खरे साधन हाती न येता शिणती व्यर्थ लोक.

१०६. आयुष्याच्या या साधने सत्चिदानंद पदवी घेणे.

१०७. संताची वृत्ती निःश्चळ असली तरी चंचळास निःश्चळ करणेकरता चंचळत्वानेच चंचळपणा घालवावा लागत असल्याने, त्यांना चंचळ बनावे लागते.

१०८. वाऱ्यानेच दिवा लागतो व जातो.

१०९. अर्भकाचे साठी पंतोजी हातात पाटी घेतो.

११०. अपूर्णातून निर्माण झालेले सर्व अपूर्णच.

१११. निश्चळ आत्मा.

११२. काही जण दुखणे बरे होण्यासाठी औषध घेतात, तर काही ते होऊ नये, त्याची प्रवृतीच नसावी अशी योजना करतात.

११३. तुका म्हणे मग नये वृत्ती वरी, हेच खरे सुख.
११४. परमेश्वराने कोणत्याही परिस्थितीत बिनतक्रार केल्यावर पुनः तक्रार करणे हा एक मोठा वेडेपणाच.
११५. शब्दानें तक्रार न करता येणे म्हणजे बिनतक्रार.
११६. शब्दाने तक्रार करता आली नाही तर आंतून जर त्याच वृत्तीचा जोर असेल तर ती तक्रार मनुष्याच्या हालचालीतून व्यक्त होते व ती जाणती माणसे ओळखतात.
११७. कोणी अनुभवाने शहाणा होतो. कोणी हिशेब जाणून विवेक करतो. पण मनातील चडफड जोपर्यंत गेली नाही तोपर्यंत त्याचा काय उपयोग?
११८. आपण कोण आहोत हे कळेपर्यंत मनुष्य कसाही वागो पण ते कळल्यानंतर त्याने पूर्वीच्या प्रवृत्तीसच प्रोत्साहन देणे आणि त्याची जाणीव निस्वार्थ बुद्धीने उत्पन्न करणाऱ्या जवळही वकिली करणे म्हणजे दुर्दैवच होय.
११९. आपण कोण आहोत याचे ज्ञान झाले की चांगले वागावेच लागते.
१२०. मनुष्याचे शुद्ध आचरण हीच निवृत्ती.
१२१. प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखावी.
१२२. आपण कोण होतो, आहोत, व होणार हे कळले की जबाबदारी वाढते.
१२३. जितकी अधिक जबाबदारी तितके बंधन अधिक
१२४. बंधनाची पराकाष्ठा हीच मुक्ती.
१२५. दगडाची पराकाष्ठा म्हणजेच जीव, जीवाची पराकाष्ठा म्हणजे शिव व शिवाची पराकाष्ठा म्हणजेच देव (परमात्मा)
१२६. स्वेच्छेचे बंधन त्रासदायक नसते.
१२७. लादले अगर लादून घेतलेले बंधन हीच गुलामगिरी अगर बद्धता होय.
१२८. साधनानेच वृत्ती निवळते.
१२९. दृश्याची समरस होण्यानेच वृत्तीत गढूळपणा येतो.
१३०. खोटे बोलण्याइतके पाप नाही.
१३१. खरे बोलणारा तरलाच पाहिजे.



१३२. मोकळे मन हेच शुद्ध पुण्य.
१३३. वृत्तीच्या केंद्रीकरणातच मोठी शक्ती निर्माण होते.
१३४. वृत्तींची केंद्रीभूत शक्ति ही ॲटम बॉंबपेक्षाही प्रभावी आहे. त्याचा सदुपयोग करणे हे आपले हाती आहे.
१३५. वृत्तीच्या केंद्रीकरणाने स्वतः चढावे, दुसऱ्यास पाडू नये.
१३६. चेंडूच्या उशीवरुन तो किती उंचावरून किती खोल फेकला होता हे गणित करता येते.
१३७. तोवरी तोवरी ज्ञानाचिया गोष्टी । तुकया सवे गांठी पडली नाही ।।
१३८. ज्याची त्याने आपल्या शिरावर जबाबदारी घेतली तर उत्तमच.
१३९. आपणास खोटे सांगून द्यावे असे वाटणे हेच जबाबदारीने मी पार पडीन असा दृढ विश्वास म्हणजे अविश्वास प्रगट करणेचे चिन्ह होय.
१४०. ज्यापासून दुःख होते त्याचीच शपथ घ्यावी.
१४१. वृत्ती नष्ट होण्यास मनालाच बंधन पाहीजे.
१४२. मनाला वीट येणे हीच निवृत्ती.
१४३. सत्सगंतीपेक्षा कुसंगतीचा परिणाम जलद होतो.
१४४. ज्याच्यापासून दुःख होते त्याचा सहवासही नको.
१४५. आतला न्यायाधीश सांगेल तेच खरे.
१४६. दुसऱ्याचे काहीही ऐकून करू नये.
१४७. स्वानुभवाने बुद्धीला पटेल तेच करावे.
१४८. आपण एखाद्याशी निस्वार्थ बुध्दीने, शुध्दतेने, सत्याने, निष्पाप व कर्तव्यदक्ष राहिलो तरी दुसऱ्याची तशीच वृत्ती पाहीजे; नाहीतर महाराजांनाच प्रार्थना करावी हे उत्तम.
१४९. खरे आणि खोटे हे ज्याचे त्यानेच ओळखले पाहिजे.
१५०. नुसत्या जाहिरातीने काय होणार?
१५१. महाराजांनी इतके दाखले दिले म्हणून त्यांच्यावर तरी विश्वास ठेवा.
१५२. देवाच्या पुजाऱ्याला विसरलात तरी चालेल, पण देवाला विसरू नका हीच

विनंती.

१५३. शेंदूर लावलेला दगड तो दगडच; पण तो ज्याने लावला त्याला मात्र खास किंमत आहे.

१५४. डोळे उघडून चालले म्हणजे सहसा दगाफटका होत नाही; झालाच तर आपण आपला ऐवज सोडून दुसरीकडे पहात होतो याचा पुरावाच आहे तो.

१५५. अंतःकरण हळुवार असणे व दुसऱ्याचे दुःख आपण सोसणे हाही दोषच म्हणायचा; हे करावे तर संतानीच.

१५६. ज्याचा तो खबरदार असला की दुसऱ्याला लक्ष द्यावे लागत नाही.

१५७. आत्म्याजवळ काहीही चोरता येत नाही.

१५८. देव भेटल्यावर आपण काही चोरून ठेवले तर तो आपलीच चोरी करतो व तसे झाले की रडूनही काही उपयोग नाही.

१५९. आपलीच चोरी देवाने करावी म्हणजे मोठी पुण्याईच, पाप नव्हे.

१६०. आपण आपल्याला विसरणे म्हणजेच देवाने आपल्यास चोरले असे होणे.

१६१. सर्व सुखाचे आगर । बापरखुमादेवीवर ।।

१६२. जो आपल्याला विसरला तो दुसरीकडे पहाणार तरी कसा?
खिडकीतून का कोनाड्यातून?

१६३. जो आपल्याला विसरतो तोच देवाला पहातो व जो देवाला पहातो तोच आपल्याला विसरतो.

१६४. ज्याचे हृदयात देव बसला तोच देवाचा भक्त व त्याच्यावर देवाची सत्ता.

१६५. आपले हृदय देवाचे होणे म्हणजेच देव हृदयात बसणे.

१६६. तत्त्वरुपाने देव सर्वत्र आहे पण त्याला ओळखल्याशिवाय जीवाला समाधान नाही.

१६७. देवाची व भक्ताची गाठ पडण्याचा क्षण आपल्या आयुष्यात देवच आणतो; ते भक्ताचे हाती नाही.

१६८. देवाचेच चिंतन हेच भक्ताचे जीवन होय.



१६९. भक्ताने केव्हाही केलेली भक्ति देव फलद्रूप करतोच.

१७०. भक्ताने कोणत्याही परिस्थितीत भक्ति सोडू नये.

१७१. देवाला स्मरणे हीच भक्ति.

१७२. देवावर आपण रागावलो तर आपणावर सगळेच रागावतील.

१७३. देवावर प्रेम ठेवणारा सर्वांनाच प्रिय होतो.

१७४. देवाला ओळखले तरी तो भक्तावर माया टाकून आपल्यापासून तो भक्त बाजूला होतो काय याची परीक्षा देव पहातो.

१७५. आपल्या आई-बापाबद्दल आपणास विश्वासच ठेवावा लागतो.

१७६. नाते कळले की प्रेम.

१७७. देवभक्तांचे नातेच असे आहे की त्यातील प्रेम समुद्रासारखे असते, कमी अधिक होत नाही.

१७८. व्यवहारिक नाती ही कमी अधिक प्रेमाची असतात.

१७९. जे प्रेम कमी ते अधिक व अधिक ते कमी.

१८०. व्यवहारीक प्रेम सापेक्ष व पारमार्थिक निरपेक्ष असते.

१८१. व्यावहारिक पारमार्थिक प्रेम हे निरपेक्ष सापेक्ष असते कारण तेथे परमार्थातला व्यवहार असतो.

१८२. येर ती माईक दुःखाची जनीती ।

१८३. पोट भरल्यावरी न बोलाव्या गोष्टी । भ्रम अन्न पोटीं घेऊ नये ।।

१८४. देवाज्ञा झालीया न ठेवावी वासना । दुःश्चीत या मना आणू नये ।।

१८५. घोड्याला झापड असते तशी वृत्ती व्हावी.

१८६. साधुसमागम दुलर्भ भाई, असे कबीर सांगतात.

१८७. मी पापी दुर्दैवी, असे म्हणू नये.

१८८. आपण कोण आहोत हे कळवून देणेकरता भक्तांचे आयुर्मार्गात देव दुर्दैव निर्माण करतो.

१८९. तक्रारीचे फळ म्हणजे दुर्दैव.

१९०. तक्रार न करता पुन्हा समाधानाने साधन करणे यापरते दैवच नाही.

१९१. साधनाचा पंथ हाच आत्मसाक्षात्काराचा मार्ग.

१९२. देवाचे दर्शन झाले तरी पुरे.

१९३. ज्याला देवदर्शन झाले त्याला दुसरीकडे पहाण्याची इच्छाही होणार नाही.

१९४. देवाला ज्याने पाहिले तो सतत देवालाच पाहील.

१९५. सर्व सुखात भक्तिसुख निराळे आहे, हे अज्ञानीही सांगू शकतो.

१९६. काळ सारावा चिंतने । एकांत वासी गंगा स्नाने ।
करोनी पूजन । प्रदक्षिणा तुळशीच्या ।।

१९७. साधनापरते सुख या जगांत नाही. त्याचा लाभ हाच आत्मलाभ.

१९८. साधनाखेरीज आता वासनाच नको.

१९९. मनाला मुरड घालण्याने मनाची अस्वस्थता जाते.

२००. इंद्रिये बहिर्मुख होऊ लागली तर विवेक हा त्याचा लगाम आहे.

२०१. प्राप्त स्थितीत ईश्वरी इच्छेप्रमाणे आनंदाने रहाणे हाच सुखाचा बिनचूक मार्ग.

२०२. प्राप्त स्थिति नकोशी वाटणे हाच निसर्ग.

२०३. निसर्गाप्रमाणे वागणे हाच व्यवहार.

२०४. निसर्गाचे विरुद्ध जाणे हाच परमार्थाचा रस्ता.

२०५. तक्रारीने परमेश्वराने इच्छित परिस्थिती दिली तरी ती दुःखालाच कारण.

२०६. मागे पुढे जर हिशेब सारखा आहे तर त्याचा विचार न करणेच उत्तम.

२०७. आत्मज्ञान हे व्यवहाराच्या पलीकडचे असल्याने व्यवहारात त्याचा फायदा व्हावा अशी इच्छा धरणे हे अज्ञानच.

२०८. आपल्या नशिबाचा वाटा आपण सारलाच पाहीजे.

२०९. संत ही कर्माची रेषाच पुसतात. यामुळे जीवावरची गंडातरे शेपटावर जातात व विचारी मनुष्य त्यातच आनंद मानतो.

२१०. साधन हे ज्याचे त्यानेच करावे लागते.

२११. असून नसून हिशेब सारखाच कोणत्याही परिस्थितीत दिसू लागला तर तो परमार्थी आहे व त्याच्याशी निगडित असणारे जीव त्या रस्त्यावरचेच आहेत हे निश्चित समजावे.



२१२. परमार्थी जीवाला कोणत्याही परिस्थितीत परमेश्वर व्यवहार करू देत नाही व झालाच तर तो निष्फल किंवा दुःखदायी करून त्याला तो आपल्या मूळच्या वृत्तीवर आणतो.

२१३. हिशेब हा सापेक्ष पण साधन हे निरपेक्ष.

२१४. निरपेक्ष स्थितीत सुख असल्याने साधनच करावे.

२१५. खरे सुख हे निर्भेळ असल्याने त्यात भेळ नाही.

२१६. हेचि देवाचे भजन । सदा राहे समाधान ।।

२१७. जेणे करून आपले समाधान कोणत्याही स्थितीत मोडणार नाही असेच वागावे.

२१८. आपण कोण आहोत याचाच विचार करावा म्हणजे आचरण शुद्ध रहातेच.

२१९. आडमार्गी कोणी जन जे जातील । त्यातून काढील तोची ज्ञानी ।।

२२०. वायूच्या लहरीतही अंतर्बाह्य वायुच असणार.

२२१. वायूची लहरी जरी कोठे दृश्याच्या फेऱ्यात सापडली तरी शेवटी ती वायूकडेच धावणार; त्याशिवाय फेऱ्यातून सुटकाच नाही.

२२२. वायुलहरीची गाठ दृश्य व्हावी हे म्हणणे म्हणजेच अज्ञान.

२२३. वायुलहरीची गाठ आहेच हे अनुभवाने दाखवणे म्हणजे ज्ञान.

२२४. वायुलहरीची गाठ विशिष्ट कृतीने साधणे हेच साधन.

२२५. या साधनात अखंड राहणे हेच समाधान.

२२६. याबद्दल विकल्प येणे हेच दुर्दैव.

२२७. परमार्थी मनुष्याचे व्यवहारही जगाप्रमाणेच; पण ते व्यवहार चवीने घडत नाहीत इतकेच.

२२८. चवीने व्यवहार करणारा जीव क्वचित् विषय लोभाने प्राणही देईल.

२२९. ज्याला परमार्थातील अत्युच्च पदवी संपादन करणेची आहे, त्याचा विषय

एक ''नारायणच'' असल्याने तो अन्य विषयांची चव घेण्याची इच्छाच करीत नाही व यातच संताचे आमचे वाकडे येते. अशा माणसाने चहा घेतला काय सोडला काय एकच.

२३०. नारायणाकडे जीवांची दृष्टी जावी इतकीच ज्याची इच्छा तोच निर्लोभतेने सर्वावर प्रेम करू शकतो.

२३१. ज्याची बाहेर प्रवृत्ती नाही तोच आत पहातो.

२३२. सर्वाचेच चांगले व्हावे ही तळमळ असणाराचे चांगलेच होते.

२३३. महाराज जी जी स्थिती आपणास दाखवतात ती आपल्या चांगल्याकरताच हे खास होय.

२३४. आता बोलू नका काही । आम्हा माणुसपणा नाही।।

२३५. केशव म्हणे जवळी याल । तरी तुम्ही वेडे व्हाल ।।

२३६. देव जडला जाईना अंगा । यासी कशी गत करू मी सांगा।।

२३७. हा देव जन्माचा सांगाती आहे.

२३८. देवाचे दर्शन हे एकदाच व्हावयाचे.

२३९. अमृताचे एकाच घोटाने मनुष्य अमर होतो.

२४०. नुसते. ''नारायण नारायण'' म्हटले तरी आमचा उद्धार होणार आहे.

२४१. संतांचे दर्शनही दुर्घट.

२४२. संतांनी ज्याला आपले म्हटले त्याच्या भाग्याला सीमाच नाही.

२४३. चित्ताचे समाधान हेच खरे समाधान.

२४४. संतोष ही श्रीमंती.

२४५. निर्विषय होणे हेच सद्गुणांचे माहेरघर.

२४६. अंगावरचे दागिने उतरवणे हे वैराग्याचे लक्षण नव्हे.

२४७. जीवाची प्रवृत्ती बदलणे हेच वैराग्य.

२४८ अंतर्यामी साधनाने श्वसनाचे ऐक्यात देवाची भेट अखंड घेणे जीवाला शक्य आहे.

२४९. न कळणारी गोष्ट गुरुकृपेने कळली तर विचारी जीव त्यातच समाधान



मानतो.

२५०. सामान्य कक्षेत न येणारा जीवच असामान्य.

२५१. परमार्थाच्या गोष्टी बोलाव्यात तेवढ्या थोड्याच; म्हणून आपणच कोठेतरी थांबले पाहिजे. तरच समाधान.

२५२. जीवाने कोठेतरी थांबलेच पाहिजे व आपला प्रवास थांबविला पाहिजे तरच समाधान; नाहीतर त्याच्यापुढे असणारे सहारा वाळवंट संपणार नाही.

२५३. मी कसा आहे याचा विचार करण्यापेक्षा माणसाने मला काय व्हावयाचे आहे याचाच अधिक विचार करावा.

२५४. आपण प्रपंच का करतो याचेही उत्तर ज्याला देता येत नाही, तो परमार्थ कसा करतात याचे उत्तर काय देणार?

२५५. इंद्रियात्मक जीवनापलीकडे आध्यात्मिक जीवनाचा विकास करणेसाठी केवळ परमार्थाचीच जरुरी आहे.

२५६. शरीराच्या गरजा भागवण्यासाठी जसा प्रपंच, तसाच जीवाच्या गरजा भागवण्यासाठी परमार्थ.

२५७. ज्याचा गरजा कमी तो सुखी.

२५८. शरीर सुखी झाले म्हणून काही जीव सुखी होत नाही, त्याला परमार्थ हेच उत्तम रसायन आहे.

२५९. मनुष्याने विवेक केला तरच मनाला सुख व शांति मिळून त्याचे चित्तास व बुद्धीस स्थैर्य प्राप्त होते.

२६०. जीवाची तळमळ जीवाच्या सुखाकरिताच.

२६१. भांड्यातल्या लाटा भांड्यातच. त्या पुरत्या परसल्या की कमी होणे हा निसर्गच आहे.

२६२. मनाच्या व चित्ताच्या लहरी कमी झाल्या की बुद्धि ही आत्मबुद्धि होऊन जीव तेथेच आत्मबिंदूत केंद्रित होतो.

२६३. ज्याची बडबड संपली त्यालाच ब्रह्म कळले.

२६४. जीवाची धाव जेथे पूर्णपणे थांबते व आता पुढे पाऊल टाकावे अशी छातीच होत नाही, तेथेच सत्‌चिदानंद ब्रह्म आहे असे निश्चित समजावे.

२६५. आशा ही वेडीच व न संपणारी आहे.

२६६. आशा वाढणे हीच दुराशा.

२६७. दुराशेने सर्व नाश म्हणून माणसाला सुख हवे असेल तर त्याने आशेला कोठेतरी मुरड घातलीच पाहीजे. नाहीतर आशा संपेना व देव भेटेना असेच व्हावयाचे.

२६८. वायूची लहरी वायूतच उढणार व नाहीशी होणार तर या वायुलहरीचे ऐक्य हे पारमार्थिक दृश्यापलिकडचेच असल्याने ते दृश्यात यावे असे कुणी पूर्वी म्हटले आता म्हटले व पुढे म्हणाले तरी ते वेडेपणाचेच ठरेल नाही का?

२६९. अंर्तबाह्य वायुलहरीची प्रचीती एकच असल्याने ती प्रचीती ज्याची त्यानेच घ्यावयाची आहे.

२७०. वायुलहरी हे जीवनाचे माध्यम आहे. हे दोनी अदृश्य, पण यांची उपाधी दृश्य.

२७१. वायुलहरी प्रगट झाली तरी दृश्य असून अदृश्य म्हणावी लागेल.

२७२. पंचमहाभूतांत जखडलेले जीव मुक्त होण्याकरिता वायुरूप संतांचे सान्निध्यात येण्याचा प्रयत्न करतात पण त्याच वायूवर उठणारे तरंग कोठेही असले तरी त्याचे आत्मानुसंधान सुटणारे नसल्याने परमेश्वर ते तरंग इतस्ततः विखरून टाकतो.

२७३. परमार्थी मनुष्य विषयलोभी असत नाही.

२७४ परमार्थी मनुष्य विषयजागृतीनेही आत जागा होऊन निर्विषय होतो.

२७५. साधन न करणे हा मोठाच गुन्हा आहे.

२७६. मोठ्या गुन्ह्याची शिक्षा ही मोठीच.

२७७. संतसंगतीने पूर्व कर्मे दग्ध झाली तरी कर्माचा पश्चात्ताप होऊन साधन घडले तर जीवनाचे सार्थक.



२७८. दुसऱ्याची फजीती करू गेले तर स्वतःचीच फजीती होते.

२७९. संताचे बरोबर विनोद करू नये.

२८०. नसत्या छंदे नसत्या छंदे । जग विनोदे विव्हळतसे ।।

२८१. ऐसा विकल्प पातकी । आप आपणा घातकी ।।

२८२. अविश्वासियाचे शरीर सुतकी । चांडाळ पातकी महादोषी।।
काय त्याचा वेल जाईल मांडवा । होता तैसा देवा पुढे आला ।।
तुका म्हणे जैसा कुचाराचा दाणा । परिपाकी अन्ना शिजेचना ।।३।।

२८३. परमार्थात वकिली चालत नाही.

२८४. ज्ञानी पुरुषांनी केलेला गुन्हा माफ होत नाही.

२८५. अज्ञानी पुरुषापेक्षा ज्ञानी पुरुषावर जबाबदारी अधिक.

२८६. परमार्थी पुरुष आडरानात शिरल्यास त्याला परमार्थातील एक शब्द बोलता येणार नाही; त्याची वाचा बंद होईल.

२८७. व्यवहारात जशी फसवेगिरी चालते तशी परमार्थात नाही.

२८८. ज्याचेवर महाराजांची कृपा आहे त्याचे वावगे वर्तन होणार नाही.

२८९. वकिल सुद्‌धा फर्डा बोलतो खरा, पण परमार्थ हा केवळ बुद्‌धीचा विषय नसून तो कृपेचा व वाटचाल करणाऱ्या अभ्यासकांचा विषय असल्याने, आपली वाट सोडणारास नुसत्या ज्ञानाने तो मुळीच बोलता येणार नाही.

२९०. परमार्थी पुरुष वकिल असेल पण वकिली करणारा परमार्थी असेल असे नाही.

२९१. आपण कसे पडलो याची चर्चा करणेपेक्षा आता वर कसे निघू याचाच विचार करावा.

२९२. आत्याबाईला मिशा असत्या तर म्हणणेचा काय उपयोग?

२९३. सद्‌गुरूंचे स्वरूप एक असले तरीही त्यांचे अंतरंग ओळखून त्यांची उपासना केली तरच जीवाला खरेखुरे समाधान आहे.

२९४. अंतर उपासना एकदम होत नाही, म्हणून बाह्य उपासनेला महत्त्व आहे.

२९५. जगात असे कोठे समाधान नाही व या मार्गानेच तगलो एवढे समजल्यावर

तरी आपली निष्ठा अढळ ठेवावी.

२९६. जीवाचा स्वभावच आहे. हजारो अनुभव आले तरी आपले अंतःकरण खरेखुरे सद्गुरूपाशी प्रगट करावे असे त्याला वाटत नाही.

२९७. खोटे बोलणारा मनुष्य दोन गुन्ह्यांचा अधिकारी होतो.

२९८. गुन्ह्यात खरे बोलणाऱ्यास माफीचा साक्षीदार केले जाते. हाच नियम परमार्थातही आहे.

२९९. पोट भरलेल्याची वासना पुनः अन्नावर जाणार नाही.

३००. जैसे का वमिलिया अन्ना । लाळ न घोटे जेवी रसना ।। हेच खरे

३०१. माणसाने पचेल ते खावे, रुचेल ते बोलावे, पण ते खोटे नसावे.

३०२. शोकाचे व मोहाचे प्रसंगी विवेक करणे हेच परमार्थाचे मुख्य तत्त्व आहे.

३०३. महाराज हे आपल्या भक्ताला इकडे तिकडे जाऊ देतच नाहीत.

३०४. साधनानेच मोक्ष असा संतांचा अट्टाहास आहे.

३०५. अन्नात विष कालवलेले आहे हे समजताच सहा महिन्याचा उपाशी असलेला ज्ञानी अगर अज्ञानी ते अन्न खाण्यास प्रवृत्त होणार नाही.

३०६. आपण जिवंत असलो तर बाकीच्या गोष्टी; इतर दुखण्यांचा विचार नंतरचा आहे.

३०७. संजीवनी मात्रा अशी आहे की तिने सर्व दुखणी जातात.

३०८. शिवाचा षडक्षरी मंत्र हीच संजीवनी मात्रा.

३०९. घूस सोने म्हणून मातीच उकरते तशी जीवाची स्थिती आहे. तो सुख म्हणून दुःखच घेत असतो. त्याला ते दुःख सुखासारखे वाटत असल्याने तसल्याच सुखासाठी तो परमेश्वराजवळ तक्रार करतो व दुःखच विकत घेतो. ते दुःख दुःखानेच बाजूस सारून सुखरूप व्हावे लागते.

३१०. वृत्तीनेच वृत्तीचा नाश.

३११. घुशीला आपल्या घराचे स्मरण असते.

३१२. स्मरणानेच पूर्व संस्कार बळावतात.

३१३. जीवाचे ठिकाणी जीवदशा प्राप्त होण्यापूर्वीचे स्मरण सद्गुरु निर्माण करतात व म्हणूनच ते संस्कार बळावल्याने ते शिवत्वाप्रत पावतात.



३१४. ज्ञानापेक्षा अज्ञानच बरे असे काही वेळा म्हणावे लागते, ते सर्वच दृष्टीने फायदेशीर.

३१५. साधली तर शिकार, नाहीतर भिकार.

३१६. गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाहीतर मोडून खाल्ली, तेही साधले नाहीतर फेकून दिली असे मात्र नसावे.

३१७. मनुष्याच्या मनातील हालचाली एखाद्या ज्ञानी जीवास कळू लागल्या तर व्यवहारात अनवस्था प्रसंग ओढवतील.

३१८. परमेश्वराने प्रत्येक जीवाला वर्तमान, भूत, भविष्याचे ज्ञान दिले नाही हेच ठीक आहे.

३१९. त्रिकाल ज्ञानी माणसाचे वर्तन व्यवहार दृष्ट्या विसंगत असणार; कारण व्यवहारी जीव हे सर्वच त्रिकालज्ञ नसतात म्हणून.

३२०. भ्रमित जीव गाडी पळत असतांना झाडे पळतात असे म्हणतो.

३२१. संतांचे व आपले गणित एक कधीच असणार नाही; म्हणून त्यांचा ताळा व्यवहारात घेऊ नये.

३२२. जीवावर एखादा आरोप करणे म्हणजे गाडीत बसलेल्या माणसाने गाडी चालू असता गाडीत लेफ्ट राईट करण्यासारखे आहे.

३२३. देणे घेणे चुकते करणाऱ्या जीवास या जन्मी मोक्ष

३२४. भ्रमित जीवास अध्यासाने भ्रमण व भ्रमणानेच भ्रमणाचा निरास

३२५. पृथ्वी फिरते व सूर्य स्थिर आहे पण सूर्योदय व सूर्यास्त हे शब्द आपण अज्ञानाने वापरतो. तसे उपाधीला भ्रमण, जीवाला नाही. पण आपण अज्ञानाने म्हणजे भ्रमणाने निर्माण झालेल्या विपरीत ज्ञानाने शरीराच्या भ्रमणाने निर्माण झालेले सर्व आरोप जीवावरच करतो.

३२६. प्राणाशी गांठ हेंच साधन.

३२७. सर्वांचा प्राण तडफडत जातो, संतांचा आनंदाने.

३२८. शरीरातील जीव, शरीरास सुटून रहाणारा जीव, शरीर टाकलेला जीव,

शरीर टाकल्यावर लगेच दुसऱ्या शरीरात प्रविष्ठ होणारा जीव व मुक्त स्थितीनंतर उपाधीचा संपर्क न घेणारा जीव या जीवांत महदंतर आहे.

३२९. शरीराचा व जीवाचा तसा संबंध नाही, फक्त ते जवळ जवळ आहेत इतकेच.

३३०. परमेश्वराचे दृष्टीने आपण मेलेलेच आहोत म्हणून त्याची व आमची ओळख नाही. ज्याप्रमाणे प्रेताची आणि जिवंत माणसाची ओळख पटत नाही त्याप्रमाणे.

३३१. जीवाचा ध्रुवबिंदु सुटला की तो भ्रमिष्ट होतो व तो आपल्या जीवपणाला विसरून अध्यासाने होणारे सर्व आरोप आपणावर घेतो. या कारणाने तो सुखी-दुःखी, पाप-पुण्यांचे फेऱ्यात सापडतो.

३३२. पुण्याचाही फेराच आहे.

३३३. पाप ही लोखंडाची बेडी म्हटली तर पुण्य ही सोन्याची बेडी आहे.

३३४. निश्चळ आत्माही गतिमान् आहे. म्हणून त्याच्यावर चंचळाच्या लहरी-उपाधी- व त्यात अंशरूप जीवाचा ध्रुवबिंदु सुटला की तो भ्रमित होण्याची-आत्म - विस्मृतीची स्थिती.

३३५. असंगाशी संग व प्राणाशी गांठ.

३३६. असंगाशी असंगाचाच संग होतो.

३३७. जागृतीतल्या गोष्टी स्वप्नात व स्वप्नातल्या गोष्टी जागृतीत बोलणेही मूर्खपणाचे आहे. तद्वत् पूर्व संस्कृत गोष्टी व्यवहारात बोलणे अव्यवहार्य ठरेल.

३३८. स्थूलाचे व्यवहार सूक्ष्मात, सूक्ष्माचे कारणात व कारणाचे महाकारणात होत नाहीत; त्याची संगति कोणी लावेल तर ती विसंगति होईल.

३३९. भ्रमणाने भ्रमणाचा निरास होऊन जीवाचा अढळ बिंदु जीवाला प्राप्त झाल्याखेरीज त्याला शिवाकडे पहाता येत नाही.

३४०. घराच्या खिडक्या बंद केल्या की साहजिकच आंत पहाण्याची प्रवृत्ती होऊन देवाकडे नजर जाण्याचा संभव उत्पन्न होतो.



३४१. प्राण जावा तसा तो जाऊ लागला व शरीरातून म्हणजे पिंडातून वहाणाऱ्या प्राणवायूचा प्राणगतीशी संयोग झाला की उर्ध्वमुख जीवनास त्याचा धक्का बसल्याने जीव परावृत्त होऊन तो शिवाकडे पहातो. व काही वेळा त्याचेवर होणारे आरोपही त्याला कळत नाहीत व अंर्तबाह्य पहाणारा शिवात्माही त्याच धक्याने परमात्म्यात विलीन झाला की त्याचे साक्षित्व सुटते व त्यालाच आपण विदेही म्हणतो.

३४२. त्रिकालज्ञ जीव कोणासही तिन्ही कालचे प्रसंग पटवून देण्यास समर्थ असतो पण ती एखाद्याला उपाधीच होऊन बसते.

३४३. शरीरातून प्राण गेल्यावरच जीवाचे अंग जे चैतन्य त्या चैतन्याशी चैतन्याने चैतन्याचे व्यवहार घडू लागतात. त्यातून होणारा आनंद हा निर्भेळ आनंद.

३४४. आपला वाटा आपणच पत्करला पाहिजे.

३४५. आले भागा ते करीतो । तुझे नाम उच्चारितो ।।

३४६. प्राण गेलीया शरीर । काय करील व्यवहार ।।

३४७. देवुनी साकी बाकी तुका मार्गी झाला । पदर दिधला माळणीला ।।

३४८. सजातीय पदार्थ एकमेकांत मिसळू शकतात, विजातीय नाहीत.

३४९. खांबाला पाहता पाहता कोणी खांब होत नाही. कोणत्याही दृश्य पदार्थाचे असेच आहे. पण देवाला पाहता पाहता पहाणाराही देवच होतो; म्हणून त्याला त्याचे वर्णनच करता येत नाही.

३५०. देव आपला आहे. म्हणूनच तो आपला करून घेण्यास योग्य आहे.

३५१. जो आपला नाही तो आपला होईल कसा?

३५२. मोहनाचा मोहन तो गे बाई । जीवाचा जीवन तो गे बाई ।।

३५३. सूर्य जगातून नाहीसा झाला तर आपण जिवंत कसे रहाणार? त्याप्रमाणे देवाशिवाय जीवाला अस्तित्वच नाही.

३५४. तेणे वीण जीव म्हणण्याचे कारण इतकेच की भ्रमित स्थितीने ज्यातील प्रखरता नष्ट झाली आहे. तो तापला म्हणजेच पूर्वस्थितीत येणार.

३५५. मायेतून ज्याची निर्मिति तो पदार्थ चटका देणारच.
३५६. अग्नीतून निघालेली ठिणगी चटकाच देते.
३५७. जीवाला जीवन पोचविणारा व खऱ्याचे किंवा खोट्याचे ते खोटे का असेना पण त्याचे ज्ञान करून देणारा तोच देव.
३५८. खोटे कळले तरी काम झाले.
३५९. खरे आणि खोटे कळणेस सराफकट्टाच गाठला पाहीजे.
३६०. जगात निर्भेळ चांगले आणि वाईट काहीच नाही. जे गुणावगुण अधिक तसे त्याला आपण नाव देतो इतकेच; कारण सर्व दृश्य त्रिगुणानेच साधले आहे.
३६१. बोधालाही बोध करण्याचा प्रसंग केव्हा केव्हा येतो; कारण तो बोध पक्का व्हावा म्हणून.
३६२. सोहंतत्त्वी अनुराग तो गे बाई।
३६३. जीवाचा व देहाचा संबंधच नाही. म्हणून जीवानेच परमार्थ करावयाचा आहे.
३६४. सच्चा बोले धक्का खावे हेच खरे. गती दिलेले गाडगे हे फिरणारच, यात दोष गाडग्याचा की कुंभाराचा हेच कळत नाही व गुण असेल तो तरी कुणाचा?
३६५. गाडगी फिरतात म्हणून कुंभाराने मी फिरतो असे म्हणणेचे काय कारण?
३६६. कर्माकर्मात जो लिप्त नसेल तोच स्वेच्छेने बंधन घेतो व स्वेच्छेने बंधन घेणारा मुक्त होतो.
३६७. बंधनाची पराकाष्ठा हीच मुक्ति.
३६८. तुरुंगातील कैदी खडी फोडतो व घरचा मालक घरातील गटार बांधतो हे दोन्ही एकच काय? व्यवहार एकाच तऱ्हेचे पण एक बद्‌ध व एक मुक्त.
३६९. आपण कोण आहोत हे कळले तरी वागण्यात सुधारणा व्हावयास पाहिजे.
३७०. खोटे बोलणारा लाडु खात असला तरी त्याची आशा नको.



३७१. घरात केरकचरा साचणे हा निसर्ग आहे; म्हणून कांही तो तसाच ठेवावा असे कोणी म्हणत नाही.
३७२. आलेला पाहुणा आला तसा जाईल; पण घरचाच मनुष्य जाणार कोठे?
३७३. ते माझे सोयरे सज्जन सांगाती । पाय आठविती विठोबाचे ।।
येर मानविधी पाळणा पुरते । देवाची ती भुते म्हणोनीया ।।
३७४. देव हा प्रकाशरूप असल्याने तो बुद्‌धीत उत्तम प्रकाश पाडतो.
३७५. प्रकाश दिसणे हे मोठे भाग्याचे लक्षण आहे.
३७६. जी मायिके दुःखाची जनिती आहेत, मायेतून ज्यांचा जन्म आहे त्याना जन्माला येताना आणि मरताना अवसानच नसते. जन्माला येताना व मरताना कापत कापत त्या अवस्था भोगाव्या लागतात.
३७७. संत हे अवसान घेऊन जन्माला येतात व मरतात.
३७८. ज्याच्या आदि अंती अवसान नाही, तो मध्ये काय आमचे रक्षण करणार?
३७९. साधा व्यवहार घडेना, तो परमार्थ काय करील.
३८०. देव भक्ताला आपल्या सारखाच करतो.
३८१. तत्त्वज्ञान हे जर त्रिकालाबाधित सत्य असेल तर ते व्यवहारी जीवांचे गळीही उतरले पाहिजे; नाहीतर नुसते तोंडाने बोलून काय उपयोग? एखादा वकिलसुद्‌धा उत्तम बोलतो.
३८२. संत हे देवाचे वकिल आहेत. त्यांचेकडे कोणी पक्षकार आल्यास ते त्याची केस घेऊन देवाशीही भांडतात.
३८३. एका धोंड्यात दोन पक्षी मारणे हे संतांचे लक्षण आहे.
३८४. चांगली माणसे वेलाला आणि वाळकालाही दुखवीत नाहीत.
३८५. देवाची भेट झाली की आणि काही पहावे असे वाटणार नाही.
३८६. नेम म्हणजे साधन.
३८७. देव माझा मी देवाचा, हे संतांनीच म्हणावे व ते सत्य आहे.
३८८. आम्ही देवाचे असे आम्ही म्हणू, पण त्याने आम्हाला आपले म्हटले तर ते सत्य.

३८९. अमृतमंथन करताना विष निघाले, म्हणून अमृताची अवहेलना कुणी केली नाही.
३९०. विषाने बाधा झाली, म्हणून अमृत फेकून देऊ नये.
३९१. नामरूपाचा मेळ नाही; म्हणून वाचेचा गोंधळ चालला आहे.
३९२. वाचेचा गोंधळ संपला की नामरूपाचा मेळ होणार हे सत्य आहे.
३९३. विचार, उच्चार व आचार असा त्रिधा प्रचीतीचा दृश्यात्मक दुवा आहे.
३९४. ज्याची प्रचीती एक झाली त्याचे ठिकाणी फक्त पहाणे उरते.
३९५. पहाणेच पहाणे हेच देवाचे दर्शन.
३९६. अलक्षात लक्ष लागले की लक्षात अलक्ष होतेच.
३९७. बोलणे संपले की पहाणेच उरते.
३९८. दृष्टीतून होणारा बोध सर्वोत्तम.
३९९. निर्विकार दृष्टीचा बोधही निर्विकारच ठरतो.
४००. आकारात विकार, पण निराकारात नाही.
४०१. अकार असेल तरच उकार-मकाराच्या गोष्टी.
४०२. परमार्थी माणसाला व्यवहार कसा व केव्हा करू असे होते.
४०३. व्यवहाराचा त्रास होणे हे एक परमार्थाचे लक्षण आहे.
४०४. व्यवहार करणे म्हणजे हे एक ओझेच.
४०५. ज्याने आपल्या डोक्यावरचे ओझे खाली उतरले तोच मान वर करू शकतो.
४०६. ज्याचे ओझे भगवंताने घेतले त्याने काळजी करण्याचे कारण काय?
४०७. ज्याचे जया ध्यान । तेची त्याचे होय मन ।।
४०८. आम्हाला देहाचे ध्यान असेल तर त्याची फळेही तशीच मिळणार.
४०९. आता कोठे धावे मन । तुमचे चरण देखिलीया ।।
भाग गेला शीण गेला । अवघा झाला आनंद ।।
४१०. गुण दुसऱ्याकडे देऊन दोष आपल्या पूर्व कर्माकडेच.
४११. अहंकाराने ज्ञान, दुराभिमानाने अज्ञान, व निरभिमानाने विज्ञान प्राप्त झालेल्यांना नारायण आपलेच वेड लावतो.



४१२. काम, क्रोध गेले म्हणणे हे खोटेच; फक्त त्यांची चौकट बदलता येते.
४१३. काम क्रोधाचा यथोचित उपयोग करणे म्हणजेच त्यांचा नाश.
४१४. पायातील जोडा पायातच व डोक्यावरची टोपी ती डोक्यावरच पाहिजे.
४१५. कोणत्या गोष्टीस किती महत्त्व द्यावे हेच महत्वाचे असून त्यातच माणसाची अक्कल हुशारी दिसून येते.
४१६. वर्तमान, भूत, भविष्य यात वर्तमान कालच सत्य; कारण भूतकाळ हा केव्हातरी वर्तमानच होता व भविष्य काळ केव्हातरी वर्तमानच होणार.
४१७. जीवाची पूर्व स्थिति व अंत्य स्थिति केव्हातरी मध्य स्थितीत होती व येणार, तेव्हा मध्यस्थितीच महत्वाची, त्यावरच पूर्वस्थितीचे, अंत्यस्थितीचे मोजमाप होते.
४१८ प्रारब्ध हे पूर्वी क्रियमाणच होते व संचित हे पुढे क्रियमाणच होणार. तेव्हा क्रियमाण कर्मच खरे.
४१९ परस्त्री व परपुरुषासारखे पातक नाही, पण पर वस्तूचा अभिलाष नसता जी वस्तु आपलीच आहे, त्याचाच अभिलाष केला गेला तर त्यात भीती नाही.
४२० आपले व परके ओळखणे याचेच नाव ज्ञान, बाकी अज्ञानच.
४२१ अंधाराचा अभाव म्हणजेच उजेड, म्हणून बाहेरचा उजेड परमार्थ मार्गावर उजेड पाडू शकत नाही.
४२२ वाचा बोलू वेद नीती । करू संती केले ते ।।
४२३ संतांची कृपा ज्याच्यावर आहे त्यांनी कोणत्याच गोष्टीचा विचार न करता जे तळमळीने सांगितले आहे तेवढेच करीत रहावे.
४२४ महाराजांचे स्वप्नातही दर्शन होणे ही मोठी पुण्याईची गोष्ट आहे.
४२५ ज्याच्या चित्तात जे असते तेच त्याला प्राप्त होते; असे असता आरडा ओरड केली तरी ती परमेश्वरालाही खपत नाही.
४२६ न बदलणारी स्थिती फक्त साधनाचीच, हे पक्के ध्यानी असावे.

४२७ साधनाचे सुख बसल्या ठिकाणीच व अविनाश आहे.

४२८ परके असलेले ते आपले करू पहाणे हे अज्ञान व आपले तेच आपले होणे हे विज्ञान होय.

४२९ परमार्थात सवलतीचाच फायदा घेणारास नरक प्राप्ती होते.

४३० परमार्थातील कडक बंधनेच जीवाला फायदेशीर आहेत.

४३१ पूर्व कर्मांतर खोडण्याचे दृष्टीने संतांची सत्ता केवळ कृपेनेच क्वचित् आपले कार्य करू शकते.

४३२ साधनाचे अभ्यासानेही कर्मांतराचा नाश होतो.

४३३ आपल्या दृष्टीनेच आपण संतांकडे पाहणे म्हणजे तो गुन्हाच आहे.

४३४ निर्विकल्प संतांचे भजन ही निर्विकल्पनेनेच होणे जरुर आहे.

४३५ संत होऊनिया संताशी भजावे । तरीच तरावे तुका म्हणे ।।

४३६ ज्याला बंधनाची पराकाष्ठा, त्याला काही सवलतीही आहेत.

४३७ प्रेम हे सत्ता व बंधन यांचा दुवा आहे.

४३८ मुक्त स्थितीतही काही बंधने आहेतच पण ती निरुपाधिक असतात.

४३९ वृत्ति तापून थंड झाली की पुन्हा त्यात ढवळाढवळ केल्यास ती गरम होण्याची भीति असते व त्याचा पारमार्थिक दृष्टीने फायदा होत नाही.

४४० पदार्थ तापवून थंड झाला व पुन्हा तापवला तर तो करपतो व त्याला करपट वास येतो.

४४१ एखाद्या पदार्थातील चव व वास नष्ट झाला तर मग त्याचा व्यवहारात उपयोग नाही, परमार्थातही नाही.

४४२ वृत्ती थंड झाली की साधनच करावे. ते आळस टाकून केले तर वृत्ती ढवळली तरी पुन्हा तापणार नाही.

४४३ निखाऱ्यावर राख व ज्योतीवर धूर म्हणजेच ज्ञानावर अज्ञान हे दोन्ही नष्ट झाल्यावर जे रहाते ते विज्ञान होय; म्हणूनच ते अगम्य आहे.

४४४ संकल्प विकल्प गेलेला साधकच विज्ञानी होतो.

४४५ ज्यातून हे सर्व निर्माण झाले तेच होणे म्हणजे विज्ञान.



४४६ मराठीचे व्याकरणही अध्यात्मास धरून आहे.

४४७ हा, ही, हे व तो, ती, ते अशीच जगाची उत्पत्ति आहे.

४४८ कर्ता, कर्म, क्रियापद म्हणजेच वाक्यरचना.

४४९ उद्देश्य विस्तार व विधेय विस्तारच महत्वाचे.

४५० जो वर्तमानकाळ भूतकाळातही होता व भविष्यकाळातही असणार तोच वर्तमानकाळ सत्य होय ही ग्यानबाची मेख आहे.

४५१ अज्ञानाचे ज्ञान होणे जसे अवघड तसेच ज्ञानाजवळ अज्ञान टिकणेही अवघड.

४५२ ज्ञान व अज्ञान एका रेषेत येणे हेच विज्ञान.

४५३ विज्ञानाने बुद्धि प्रकाशित झाली की सर्वांतून परावृत्त झाल्याने आत्म्याखेरीज काही पहावयास तयारच होत नाही.

४५४ रूपाची कमाई तीच रुखमाई असून तेजाची धारणा हीच राधा होय.

४५५ दोन शून्यांत विज्ञानरूपाची अनुभूति हाच विठ्ठल.

४५६ अहंकार नष्ट होऊन विज्ञानरूपच झाला तोही पण देवच.

४५७ अहंभाव गेला । तुका म्हणे देव झाला ।।

४५८ ज्यातून आनंद निर्माण होतो तेवढीच स्मृती करावी.

४५९ दुःखाची स्मृतीही नको.

४६० पुष्कळ ऐकलेले व पाहिलेले असले तरी आपल्या उपयोगाचे तेवढेच स्मरणात ठेवावे.

४६१ जेथे जेथे जाय मन । आड घाली सुदर्शन ।।

४६२ पहिले दुःखणे गेल्याखेरीज दुसऱ्या रोगावर औषध चालत नाही.

४६३ चहा सोड म्हणणाराला कॉफी घे असे सांगावे लागते.

४६४ ज्याची जी प्रकृति तेथेच त्याचे प्रेम.

४६५ सत्तेने मनातील गोष्ट सांगणाऱ्याबद्दल अधिक प्रेम वाटते.

४६६ परस्पर सत्ता चालल्याशिवाय प्रपंच व परमार्थ नाही.

४६७ प्रेमाशिवाय राग नाही.

४६८ सत्तेशिवाय प्रेम नाही व प्रेमाशिवाय सत्ता नाही.

४६९ साधनात सर्व सुख आहे.

४७० श्रीमंत माणसाने भिक्षा मागितली तरी त्याला कोणी भिक्षेकरी म्हणत नाहीत.

४७१ गुन्ह्याच्या तपासाकरता जर चोरी केली तर त्याला शिक्षा नाही.

४७२ साक्षीदार हा गुन्ह्यात सापडत नाही.

४७३ साक्षीदार साक्ष ठेऊन वागतो.

४७४ अपवित्राला पवित्राची जरुरी आहे.

४७५ जड व चैतन्य जवळजवळ आहे, पण एकाचा एकाला स्पर्श नाही.

४७६ जड शरीरही चैतन्यरूप होणे हाच परमार्थ.

४७७ चैतन्याला जडामार्फतच चैतन्यास मिळावे लागते; तसे झाले की जडाची जरुरी नाही.

४७८ वर गेलेला जीव खाली येत नाही. जो खाली येतो तो वर गेलाच नाही. जो खडा असतो तो खाली येऊ शकतो.

४७९ तिमजल्यावरुन खाली येणारा माणूस महाराजांच्या आज्ञेने तळमजल्यात येतो, तो जीवाला वर नेण्याकरता येतो.

४८० तुका म्हणे काळा । कर्म मिळते ते जाळा ।।

४८१ तुका म्हणे आम्ही झालो अग्निरूप । लागो नेदी पाप पुण्य अंगा ।।

४८२ फुलाच्या चोळण्याने दुर्योधनाचा घात. धर्मराजाचे त्रैराशिक हे व्यवहाराहून भिन्न, पण तत्त्वाला धरूनच होते. यावरून तत्त्वबोध होण्यासारखा आहे.

४८३ ज्याला महाराजांनी हाताशी धरले आहे त्याला ते तारतातच. फक्त निष्ठेची जरुरी आहे.

४८४ सत्तेनेच सत्तेची परीक्षा होते.

४८५ महाराजांच्याकडे ज्याने आपले सर्वस्व सोपविले तो सर्वातून मोकळा होतो.



४८६ परमार्थाला अंतःकरणाची जरुरी असून मनाला मन मिळणे हीच शरणागति.

४८७ अज्ञान प्रगट होणे हेच ज्ञान.

४८८ घर बसल्याच ज्याला जे सर्व काही ज्ञान होते, त्याने जागा सोडणेचे कारणच नाही.

४८९ स्थानभ्रष्ट जीवच भ्रमिष्ट होतो.

४९० आपल्या ठिकाणावर आपण आरूढ होणे हाच परमार्थ.

४९१ भक्तीचे आकर्षण असे आहे की ते भगवंतालाही खेचते व न घडे ते घडो असा अनुभव येतो.

४९२ आत्मप्रकाश दिसणे यापरते दैव नाही. ही महाराजांची कृपा; पण ती वाढवणे हे निष्ठापूर्ण साधनभक्तीवर अवलंबून आहे.

४९३ निःश्चळ दृष्टी, अलक्षात लक्ष, कामकाज करतानाही जीवाचे चैतन्याशी तादात्म्य हे सर्व साधनाचे प्रकार होत.

४९४ चैतन्याला म्हणजे नामाला स्मरणाची म्हणजे सद्‌वस्तूची जोड झाली की जे स्वतःसंवेद्य सुख निर्माण होते त्यालाच ब्रह्मानंद म्हणतात.

४९५ इंद्रियाचे सुख मर्यादित, नाशिवंत, संवेद्य, सापेक्ष, आणि दुःखाचे कारण व एकाचे एकाला प्राप्त न होणारे आहे. पण साधनाचे (चैतन्याचे) सुख अमर्याद, शाश्वत, स्वसंवेद्य, निरपेक्ष, सुखाचे कारण, व कुठेही बसल्या ठिकाणी मिळविता येणारे आहे.

४९६ चैतन्याचा प्रवाह जडाला सुटून अंतर्यामी वाहू लागला की जडाची जरुरी नाही, ते आपल्या हातात आहे. वाटल्यास जडाची जरुरी घ्यावी नाही तर आपले सुख अखंड आहेच.

४९७ तुका जवळी हमाल । भार चालवी विठ्ठल ।।

४९८ तुका म्हणे विठो भरला सबाह्य । तया उणे काय चराचरी ।।

४९९ कसोटीतून तापून सुलाखून निघालेले सोनेच किमतीला चढते.

५०० तुका म्हणे जैसे । आम्ही वर्तू त्याच्या इच्छे ।।

५०१ पाहिजे असणारी वस्तु मिळाली की मनुष्य प्राण्याला ब्रह्मच भेटल्यासारखे

वाटते पण ती काही कालाने नकोशी होते, ज्याची प्राप्ती झाल्यानंतर ती वस्तु नकोशी होतच नाही तेच ब्रह्म समजावे.

५०२ मनुष्याचे सर्व प्रयत्न समाधानाकरिता असतात पण इतकेही करून समाधान नसेल तर ते प्रयत्न फोल होत असे समजावे.

५०३ महाराजांची कृपा असली म्हणजे वाटेतील अनावश्यक काटेकुटे आपोआप बाजूला होतात व एखादा काटा राहिलाच तर काट्याने काटा काढण्यासाठी काट्याने काटा काढून तो काटाही फेकून द्यावा.

५०४ महाराजांची इच्छा व सत्ता न बदलणारी आहे. त्यांचे इच्छेप्रमाणे वागणेतच साधकाचे कल्याण आहे. आपण न वागलो तर ते वागवूनच घेतातच, परिस्थितीच साधकाला अनुकूल बनवितात. आपणास प्रतिकूल वाटली तरी आपणापेक्षा त्यांना आपली अधिक काळजी असते व ती ते घेतातच परिणामी त्यांचे वचनच योग्य म्हणावे लागते.

५०५ प्रकृतीशी म्हणजे शरीराशी ज्याचे तादात्म्य नाही, जडातही जो चैतन्यालाच पाहतो, त्याला ग्रहणीग्रहण लागतच नाही. तो प्रकृतिवश असल्याने प्रपंची नसला तरीही ग्रहणात सापडतो.

५०६ आत्मसूर्याचे प्रतिबिंबरूप चंद्राचे आड शरीराची धारणा येणे हेच चंद्र सूर्य ग्रहण होय.

५०७ जो वाऱ्यासारख्या होतो तोच निष्पाप होतो.

५०८ वायुस्नानासारखे स्नान नाही.

५०९ वायुस्नानाने चित्तशुद्‍धि होते.

५१० तू मला ओळखलेस तर तू स्वतःला ओळखशील किंवा तू स्वतःला ओळखलेस तर तू मला ओळखशील असे महाराजांचे वचन आहे.

५११ ज्याचा स्वतःवर विश्वास नाही तो सद्‍गुरूवर काय ठेवणार?

५१२ विश्वासानेच परमार्थ साधतो.

५१३ ज्याची कोणी चहा करीत नाही त्याची परमेश्वर चहा करतो.

५१४ लाख गोष्टी मनाच्या विरुद्‍ध घडल्या तरी एखादी गोष्ट परमेश्वर मनुष्याच्या मनाजोगी घडवितो व तेच परमार्थाची निःसीम आवड उत्पन्न होण्याचे कारण बनते.



५१५ ज्याची दृश्यावरील धावणारी दृष्टी ज्यावेळी कोणत्याही योग्य अशा एखाद्या दृश्य बिंदूवर अंतर्बाह्य रीतीने केंद्रित होते, त्याच्याच चित्ताचा प्रवाह थंड होऊन तो अंतर्मुख होऊन उर्ध्वमुख वाहू लागतो व चैतन्याशी समरस होतो.

५१६ दृश्य मर्यादित केल्याखेरीज आत्म्याचे क्षेत्र वाढत नाही.

५१७ दृष्टीपुढील दृश्य जसजसे कमी कमी होत जाईल तसतसा आत्मसाक्षात्कार वाढत जाईल.

५१८ पुष्कळ गोष्टी मनाविरुद्‍ध होत असता एखादीच गोष्ट मनाजोगी होणे किंवा पुष्कळ गोष्टी मनासारख्या होत असता एखादीच गोष्ट मनाविरुद्‍ध होणे हीच परमेश्वरी सत्ता.

५१९ ज्याने आपले सर्वस्व नारायणाचे हाती दिले व ज्याचे सर्वस्व नारायणाने कृपायुक्त अंतःकरणाने घेऊन त्याचा अंगीकार केला, त्याचे हाती त्याचे वागणे नाही. ते सर्व सहजच नारायणाचे सत्तेने व इच्छेने होत असल्याने त्याची सर्व जबाबदारी कीर्ती-अपकीर्ती, बरे-वाईट, त्या नारायणाकडेच जाते.

५२० नारायण हा आदिमध्यांत असल्याने त्याच्याशिवाय ज्याला जिवंत रहाणेही अशक्य त्याला तो कोणत्याही गोष्टीत - मध्ये - असणारच.

५२१ श्रीगुरुलिंगगीता हे श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे स्वरूप.

५२२ नारायणाचे इच्छेने साक्षीने/सत्तेने घडेल तेच उत्तम.

५२३ मनातील हृद्‍गद काढून घेणेस उलटा फासा टाकावा लागतो; यालाच ग्यानबाची मेख व तुकोबाची खुंटी म्हणतात.

५२४ ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी हे लक्षात आणावे.

५२५ पहिले काय वाईट होते असे वाटणे हाच संशय.

५२६ ज्याला स्वतःची ओळख झाली तोच स्वतःला विसरतो व जो स्वतःला

विसरतो तोच दृश्याला विसरतो व जो दृश्याला विसरून कोणतीही कृती करतो त्याच्या चेष्टा केवळ द्रष्टा म्हणून होत असल्याने त्याच्या कोणत्याही कृतीचे परिवर्तन त्याच्यातच होते व या कारणाने पापपुण्यात्मक कर्माचे फळ तेथे दिसून येत नाही. मारलेला चेंडू दुसऱ्याला लागला तर कर्म बद्धता आहे. पण तोच चेंडू जर त्या बिंदूवर आदळून पुन्हा टाकणाराचे हाती आला तर पुन्हा मोकळाच. संतांचा वृत्तिभाव याप्रमाणे असतो.

५२७ कोणाचीही पहिली प्राप्त स्थिती उत्तम, मागून घेतलेली गढूळ व त्यात मागची परिस्थिती व चालू परिस्थिती हे सापेक्ष विचार याची तुलना करून कल्पना व संशय यात झोके घेणे, हे अज्ञान.

५२८ कोणत्याही जीवाची प्रथमावस्थाच शेवटाला येते. म्हणून शेवट गाठला हे कळल्यावर तरी पुनः गढूळपणास प्रारंभ करून कल्पना, संशय विभ्रमात शिरू नये.

५२९ जीवाची प्रथमावस्था व सायुज्यावस्था शुद्ध असते.

५३० अलक्ष्यात लक्ष असणे हेच अनुसंधान, त्याच्या सांन्निध्यात जाणारेही तसेच होतात.

५३१ वृत्तिशून्य साधक वृत्तिशून्य असतो.

५३२ काही चुका झाल्याशिवाय बरोबर वाट कळत नाही; म्हणून त्या चुकाही क्वचित् उपकारक होतात.

५३३ चुकलेला मनुष्यच सापडणेची आशा करतो.

५३४ एक मीपणा गेल्याने संसार ब्रह्मरूप होतो.

५३५ बोलणे संपले की काम सुरू होते.

५३६ बिभीषण व रावण रामचिंतनानेच तरले.

५३७ कोणत्याही निमित्ताने होणारा सत्समागम आम्हाला योग्य मार्गावरच आणील.

५३८ तुका म्हणे महापातकी पतित । होती जीवनमुक्त हेळामात्रे।।

५३९ निळा म्हणे यांच्या नामे करिता घोष । नातळती दोष कळिकालांचे ।।



५४० ''नारायण नामे होऊ जीवन्मुक्त'' एवढे कळले तरी पुरे.

५४१ संतांचे मनात काय आहे हे कळणे कठिण.

५४२ असंख्य गुण म्हणजेच निर्गुण.

५४३ असंख्य विकार म्हणजेच निर्विकार.

५४४ सर्वत्र लक्ष्य होणे म्हणजेच अलक्ष्य.

५४५ सर्वाला जाणणे हीच सर्वज्ञता.

५४६ चैतन्यात मिळालेले चैतन्य साधनाच्या कृतीत येणार आहे.

५४७ श्रवणाने श्रवण, मनाने मनन, व चित्ताने चिंतन होते.

५४८ नाम हीच रूपाची प्रचिती.

५४९ ज्याला नुसते क्विनाईन पचणार नाही असे वाटते त्यालाच डॉक्टर शुगर कोटेड क्विनाईन देतो. नुसता परमार्थ पचनी पडणे जेथे कठिण असते तेथे व्यवहाराची सांगड घालावी लागते.

५५० विश्वासी माणसाने केव्हाही विश्वासघात करू नये.

५५१ आपला अहंकारच आपणास शिरजोर होतो.

५५२ जवळ असलेली वस्तु अहंकाराने जाते.

५५३ आपल्या घरी ब्रह्म राबते आहे याची जाणीव जरी झाली तरी भक्तापासून ब्रह्म दुरावते.

५५४ परिस्थितीने जाणीव उत्पन्न होते.

५५५ अन्नाची व पाण्याची वांती होते, पण रक्तात मिसळणाऱ्या औषधाची वांती होत नाही. ते शरीराची कांती व बुद्धीचे वैभव वाढविते.

५५६ अमृताच्या सागरात बुडालेला माणूसही तरतो.

५५७ मोक्ष एकदा मिळाला असता जो आनंद तोच आनंद सतत मिळाला तरी.

५५८ वांती झालेल्या माणसाचे मन पुन्हा त्या अन्नाला स्पर्श करणार नाही.

५५९ ज्याच्या अंगी दोष नाहीत त्याला मुक्त स्नानाचीही जरुरी नाही.

५६० नासिकाग्र दृष्टीने विचार कमी येतात, उच्चारात फरक पडतो व आचार बदलतात.

५६१ घेरी आणि पित्त यांची सांगड असल्याने मनुष्याला झालेले हे विकार एकदमच जाणार, कारण ते एकमेकाला पूरक आहेत.

५६२ परतीराला पाय लागेपर्यंत मनुष्याला नावेची आवश्यकता.

५६३ परमेश्वराचे किंवा संताचे दर्शन झाले की मिळावयाचे असे काही रहात नाही.

५६४ आत्मवस्तूने सुखरूप झालेला जीव आपली नसलेल्या परक्या वस्तूकडे पहात नाही हे निश्चित समजावे.

५६५ आम्ही आपुल्या रंगात असतो । अखंड आनंदात ।।

५६६ नाटकासारखी पात्रे रंगावी लागतात.

५६७ खरेपणा पटला की जाणता मनुष्य नाटकालाही कंटाळतो.

५६८ चैतन्याची ओळख पटली की जीव चैतन्यच होतो.

५६९ साधनापरते समाधान जगात तरी नसेल.

५७० आलेले दुखणे जाते पण घेतलेले जात नाही.

५७१ साधनाने कोणतीही पीडा होत नाही.

५७२ शिष्याने नामरूपाची ओळख करून घेतली की गुरूला धन्यता वाटते.

५७३ ज्याला मी गुरु आहे असे वाटत नाही तोच गुरु.

५७४ शिष्याच्या कीर्तिनेही गुरूला खरा आनंद होतो.

५७५ संतांची शिकवण निस्वार्थ असल्याने त्यांत कशाचीही अपेक्षा असत नाही.

५७६ संतांचे संगतीने कोणाचेही अकल्याण झाले नाही.

५७७ लोहाराचा हातोडा रागाने परिसावर हापटला तरी त्याचे सोनेच होणार.

५७८ जाणती माणसे राग, लोभ पहात नाहीत; ते आपले कर्तव्य करीतच असतात.

५७९ परमार्थात जीव रंगला आहे, अशी भगवंताची खात्री झाली की तो त्याला व्यवहारातून आपोआप सोडवितो.

५८० भगवंताच्या कृपेला काय अशक्य आहे?



५८१ ज्याने आपले सर्वस्व भगवंताला अर्पण केले त्याच्या मनाजोगे सर्व काही होत असते.

५८२ मनुष्य मेला म्हणजे या जगातून नाहीसा झाला इतकेच.

५८३ मनुष्य बदलले की व्यवहारही बदलतात.

५८४ ज्याचे व्यवहार बदलले तो मरून जिवंत झाला असे ज्ञानी ओळखतात.

५८५ खच्ची केलेल्या झाडालाच अधिक पालवी फुटते.

५८६ ज्याला कोणी या जगात आपले आहे असे वाटत नाही त्याचाच परमेश्वर अंगीकार करतो.

५८७ ज्यांना कोणी विचारत नाहीत अशीच मुले आईबापाची लाडकी होतात.

५८८ महाराजांनी सर्वांची काळजी घेतली आहे.

५८९ शेराला सव्वाशेर जगात असतातच.

५९० परमेश्वरावर मात्र कोणी नाही.

५९१ प्रश्नाला रोखून प्रश्न करणारा कोणी भेटला तर त्याचे काम होत नाही.

५९२ आपण कोणावर मात करावी म्हटली तर आपल्यावरच मात होणार.

५९३ जसे आपण चिंतावे तसे होते.

५९४ नारायण हा सर्वांचे मनोरथ पूर्ण करतो. म्हणून त्याच्यावर रागावता येत नाही.

५९५ ज्ञानी माणसास कर्मांतराची रेषा दिसते.

५९६ कल्पनेची बाधा न हो कोणे काळी। ही संत मंडळी सुखी असो।।

५९७ आत्मप्रकाश पहात कोणतेही काम केल्यास यश येतेच.

५९८ मोह हा भोवरा भोवरा । फिरवी गरागरा ।।

५९९ तापून थंड झालेला जीव पुन्हा तापत नाही. म्हणून परमेश्वर त्याची कसोटी पहातो आणि त्याला शांत करतो.

६०० देह अवसानावर कथेची सामग्री.

६०१ देवाचे ध्यान ही कथा.

६०२ उर्ध्ववाहिनी हरिकथा.

६०३ देवाच्या दारात चारी मुक्ती.
६०४ साक्षी चैतन्याला चोरून कोणताही व्यवहार करता येत नाही; कारण सर्व टपाल तेथूनच Dispatch होते.
६०५ चैतन्याला कळल्यावर मग कोणतीही गोष्ट जीवाला ज्ञात होते.
६०६ त्रिगुणातीत सद्गुरु.
६०७ अग्नीला अंघोळ घालण्याची आवश्यकता नाही.
६०८ आपला बाण दुसऱ्याच्या हाती न देणे हे एक व्यवहारातील कसब आहे.
६०९ अष्टावधानी मनुष्य परमार्थाला निरुपयोगी.
६१० व्यवहारातील चातुर्य परमार्थात उपयोगी पडत नाही.
६११ करा हरिभक्ती परलोकी ये कामा । सोडवील यमापासोनिया ।।
६१२ तुका म्हणे करा आयुष्याचे मोल । नका वेचू बोल नामेवीण ।।
६१३ आपण जो रस निर्माण करावा तो वातावरणात भरतो.
६१४ मौन हीच संमति व हास्य हाच आनंद.
६१५ साधनी पुरुषाचे डोळ्याच्या पापण्या काळ्या असतात.
६१६ रघुपती मग तेथे आठवे नाठवीता, हीच कृपा.
६१७ शिव हलाहले तापला । तो नामे शीतल झाला ।।
६१८ पार्वतीलागे आदिनाथे दाविले । ज्ञानदेवा फावले निवृत्ती कृपे ।।
६१९ दुराशा हीच दुर्दशा.
६२० संतांचे आचारांत, विचारांत व उच्चारातही फरक होत नाही; झालाच तर तो ज्याचे बाबतीत झाला त्यानेच त्याचा विचारपूर्वक शोध घ्यावा.
६२१ साधनातले सुख अवीट व न सरणारे आहे. यामुळे जाणता मनुष्य आपले आयुष्य सार्थकी लावणेचे दृष्टीने त्यातच आपला अधिक काळ घालवणेचा निश्चय व प्रयत्न करतो.
६२२ प्रयत्नांती परमेश्वर.
६२३ जो दुसऱ्यावरी विसावला । त्याचा कार्यभाग बुडाला ।।
६२४ विचारानेच विचारांचा निरास.



६२५ जगाचे तेच तेच अनुभव पुनः पुनः घ्यावे, असे सुज्ञाला कधीच वाटत नाही.
६२६ स्वतः जवळ काही कमती नसताना जो दुसऱ्याच्या सुखाकरिता निस्वार्थ बुद्धीने झटतो तोच संत.
६२७ जो स्वार्थाने उपकार करतो त्याचे उपकार कसले?
६२८ संबंधी माणसांनी उपकार केले तर ते कर्तव्यच ठरेल.
६२९ मनुष्याचा मूळ स्वभाव न बदलणारा असल्यामुळे विचारी मनुष्य त्याचा विचारच करीत नाही.
६३० जगावरचे खरे उपकार संतांचेच.
६३१ महाराजांचे उपकार जन्मोजन्मी न फिटणारे असल्याने त्यांचे पायांत अंगाच्या कातड्याचे जोडे करून घातले तरी उपकारांची फेड झाली असे वाटणार नाही.
६३२ आपले उपकार लोकांनी स्मरावे असेही संतांना वाटत नाही.
६३३ सूर्याचा रथ कोणत्याही नमस्काराकरिता तटला नाही. तो आपले काम करीतच असतो.
६३४ महाराजांचे स्मरण असावे.
६३५ महाराजांचे स्मरणांत अद्भुत शक्ति आहे.
६३६ ज्याची परीक्षा घेणेस काही शिल्लक राहिले नाही तो सत् शिष्य.
६३७ काय वानू मी या संतांचे उपकार । मज निरंतर जागविती ।।१।।
काय द्यावे यासी व्हावे उतराई । ठेविता हा पायी जीव थोडा ।।२।।
सहज बोलणे हितोपदेश । करोनि सायास शिकवीती ।।३।।
तुका म्हणे वत्स धेनुवेचे चित्ती । तैसे मज येती सांभाळीत ।।४।।
६३८ झाले ते झाले पुढे तरी दखलगिरी घ्यावी म्हणजे पूर्वीचे भलेबुरे कर्म महाराज दग्ध करणेस समर्थ आहेत व त्यांनी ते केलेही.
६३९ हिशोब चुकता झाल्यावर नवीन पान उघडण्याची जरुरी नाही. उघडलेच की पुनः तो चुकता करण्याची जबाबदारी आलीच.

६४० जगणे नको वाटणाऱ्याला जीवनांत सुख वाटणे; कोणत्याही गोष्टीचा विचार सतत करून डोक्यास शीण देणारे विचार कमी होणे; क्षुद्र कारणानेही संताप होणाऱ्याचा संताप कमी होणे, अनावर राग असता तो आला की तो लगेच जाणे, स्वप्न सृष्टीतच वावरणाऱ्या जीवाची स्वप्ने लक्षातही न राहणे, स्वप्न सृष्टि सत्य सृष्टीत येणे, भीतीप्रद स्वप्ने न पडणे, जगाचे तेच तेच अनुभव आता नकोत असे वाटणे, रक्ताचे गरमपणातील गरमपणा नाहीसा होऊन वृत्ति थंड होणे, डोळ्यापुढील दृश्य हलके हलके कमी होऊन आत्मानुसंधानाचा काल वाढणे, शौचकूपासारख्या घाणीजवळही अत्तराला लाजवेल असा सुगंध दरवळणे, साधनाचे कष्ट घेणाऱ्यासही न दिसणारा आत्मप्रकाश सहज दिसणे, मनातील गोष्टीचा दुसऱ्याच्या मुखातून अनपेक्षित उच्चार होणे. मनातील सर्व प्रश्न आपोआप सुटणे, सर्व शरीर थंड होऊन चैतन्याचा चैतन्यामार्फत चैतन्यास सुखाच्या लहरी सतत मिळणे, त्रैराशिकातील आकडे फिरणे, प्रश्नाचे आधीच उत्तर मिळणे, डोळ्यासमोर दिसणारे धोके दुसऱ्याचे मुखातून बाहेर येणे, न टळण्यासारखे प्रसंग टळणे, अनावश्यक गोष्टी बाजूला आपोआप होणे, मागच्या व पुढच्या गोष्टी, सर्व शंकांचे निरसन पूर्णतः अनुभवाने झाल्याने बुद्धीला पटणे, आठवण करू नये म्हटले तरी महाराजांची आठवण होणे, जगात पूर्वी न आलेले अनुभव येणे, जगात कोणी आपले नाही, कोणीही वावडी करावी असे वाटून सर्वाशी सौजन्याने वागून उलटे अनुभव येत असताही त्याच्या उलटच साधन भक्तीने येणारा आत्मानुभव, ही महाराजांची कृपाच नव्हे का? कृपेकरीता काहीही प्रयत्न केला नसता कृपा होणे यांत पूर्व जन्मीचा अभ्यास स्पष्ट होत नाही काय? आत्म्यावर सतत लक्ष अगर त्याचे स्मरण जर इतके काम करते तर त्यावर सतत वेळ सापडेल तेव्हा दृष्टी ठेवल्यास काय होणार नाही? सर्व सुखाचे आगर बाप रखुमादेवीवर हा अनुभव यावयास हवाच. अंतर बाह्य आत्मस्वरूपाची बुद्धिग्राह्य प्रचिती हे दुर्दैवाचेच लक्षण काय?



६४१ दुर्दैव व दुर्दशा या शब्दाची ओकारी येते.

६४२ भक्तीचे रुपांतर अद्वैतात म्हणजे एका ब्रह्मस्थितीतच होते व त्यालाच न मागता प्रसाद मिळतो. महाराजांचा प्रसाद गुरुपौर्णिमेचे आदले दिवशी इच्छा न करताही घरी चालून येणे ही महाराजांची केवढी कृपा.

६४३ महाराजांचे कृपेला शोभेल असेच वागले पाहीजे.

६४४ महाराजांची आम्ही लेकुरे । नाचू कीर्तनी बडिवारे ।।१।।

६४५ साधनाभ्यासाने आत्मानुभव चोखाळण्यातच महाराजांना खराखुरा आनंद आहे.

६४६ ज्याच्या अंगात दुसऱ्याला गरम करण्याची शक्ति आहे त्याची प्रकृति थंड असणारच नाही.

६४७ संतांची प्रकृति आणि प्रवृत्ति ही थंड असल्याने त्यांचे जवळ येणारे जीव ही थंड होतात.

६४८ चैतन्य हे स्वतः थंड असते पण ते उपाधीने योग्य प्रमाणात गरम होते.

६४९ चैतन्याच्या उपाधीशी तादात्म्यतेने येणारा गरमपणा कमी अधिक होणे हीच विकृति होय.

६५० जन्म हे चैतन्याचे अंग असून शीतलता ही प्रकृति.

६५१ प्रकृती ती की ज्यांत विकृती होत नाही.

६५२ अंग ते की ज्यात विकृती होते.

६५३ संत हे दुसऱ्यांची दुखणी आपण घेऊन दुसऱ्यास रोगमुक्त करतात.

६५४ विषानेच विष मरते; कारण विषच विषाला मारक असते.

६५५ आप करे सो काम, पदरी असे तो दाम।।

६५६ महाराजांचे जवळ तरी प्रांजळपणा असावा.

६५७ स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही.

६५८ आप मेला आणि जग बुडाला.

६५९ झाले ते झाले पुढे तरी सावध रहावे.

६६० झालेल्याची व होणाऱ्याची स्मृती असली तरी वाट चुकत नाही.

६६१ परमेश्वर प्राप्तीचा अंतर्बाह्य एकच रस्ता आहे. आणि तो एखाद्या भाग्यवंतालाच ईश्वरी घटनेने व सत्तेने सापडतो.

६६२ परमेश्वर प्रत्येकाचे आयुष्यात एकादा तरी क्रांतीचा प्रसंग आणतो. पण ज्याची खंबीरी आहे, त्याची क्रांती टिकते व इतरांची टिकत नाही.

६६३ मरणाचे स्मरण असावे.

६६४ घर मालकच घरी असला की त्याची व्यवस्था ठेवणारे व्यवस्थापक (Manager) व बिऱ्हाडकरु घर मोकळे करतात.

६६५ तुका म्हणे भोग सारे। गुणा येती अंगारे।।

६६६ मरावे परी कीर्ति रूपे उरावे।।

६६७ कोणत्याही गोष्टीची अनुभवाने कबुली दिल्यावर कुरकुरु नये.

६६८ आधी गुंतू नये मग कुंथू नये.

६६९ ज्याने हूं म्हणावे त्यानेच कीर्तन करावे अशी रीतच आहे.

६७० दरिद्री जीवांना श्रीमंत करणारा नारायणच खरा श्रीमंत.

६७१ निकटचा संबंधी कधी पाहुणा होत नाही व पाहुणा कधी निकटचा संबंधी होत नाही.

६७२ संतकृपेतला जीव नाही ती तक्रार करु लागला म्हणून ईश्वरी इच्छेने जरी त्याला मनासारखी पण मारक (जी ज्याने अज्ञानाने मागीतली ती) परिस्थिती मिळाली तरी संत त्याची दुर्दशा करीत नाहीत योग्यवेळी पूर्वस्थिती दाखवून व जागृती देऊन त्याला निवृत्त करतात.

६७३ प्रसंगानुभवाने उत्पन्न होणारी जागृति हीच खरी जागृति.

६७४ नुसत्या प्रश्नाने खरी जागृति निर्माण होत नाही.

६७५ परीक्षवंत जे मिळे, तरीच ओळखी कळे.

६७६ वाचा बोलू वेदनीती। करू संती केले ते।

६७७ प्रत्यक्ष हजारो अनुभव येऊनही जीवाला चुका कबूल करून परावृत्त होण्याची कोण पंचाईत. मग नुसत्या प्रश्नाने काय होईल?



६७८ नाव बदलले की आडनाव बदलते.

६७९ मरणाचे वेळी परमेश्वराचे नाव आड करणेचे सामर्थ्य ज्याच्या जवळ येते तोच गुरुपुत्र.

६८० संतांचे सान्निध्यात दुर्दैवाने आल्यास मुरलेला मनुष्यही निवळू शकतो; मग मूळचा उत्तमोत्तम पण परिस्थितीने थोडा बाजूस गेलेला निवळणेस किती उशीर?

६८१ कोणत्याही कारणाने घडलेला संतसंग आपला प्रभाव दाखविणारच.

६८२ महाराजांची कृपा ज्याचेवर त्याला ते इकडे तिकडे जाऊ देतील कसे?

६८३ तुम्ही या गावचे की त्या गावचे। आडनाव सांगा काय तुमचे।।

६८४ कित्येक वेळा व्यावहारिक दृष्ट्या ठरलेली दुष्कृति ही हितावह ठरते.

६८५ शापाचा उपयोगही कित्येक वेळा वरासारखा होतो.

६८६ आईने मर जा म्हणणे म्हणजे अमर हो म्हणण्यासारखे आहे.

६८७ महाराजांची अवकृपा ही कल्याणच करणारी असल्याने कल्याणकारी ती कृपाच.

६८८ खरे बोलणारा व वागणाराच देवाला आवडतो.

६८९ उच्चतर स्थिति प्राप्त करून देण्याकरिता परमेश्वर ती स्थिति बदलण्यासारखा प्रसंग निर्माण करतो.

६९० दु:खाची विस्मृति हाच आनंद.

६९१ आनंदाची विस्मृति हेच दु:ख

६९२ कहत कबीरा ओ एक सुखियाँ जिन्ने मनकू जिंता रे।

६९३ माझ्याजवळ कांही नाही व जे कांही असेल ते म्हणजे महाराजांची कृपाच होय.

६९४ मी एक धोंडा आहे. फक्त त्याला महाराजांनी कृपा केल्याने शेंदूर फासला आहे असे मला वाटते.

६९५ खऱ्याच्या ठिकाणी चोरीचा व्यापार नाही.

६९६ देवाजवळ, गुरूजवळ, आईबापाजवळ खरेच बोलावे.

६९७ चांगले महाराजांचे व वाईट तेवढे माझे आहे.

६९८ माझा प्रताप व कीर्ति महाराजांची असून मी अपकीर्तीस पात्र आहे.

६९९ स्तुती करणे तर ती महाराजांची.

७०० कोणी निंदा केली तरच माझ्यात सुधारणा होईल म्हणुन स्तुतीपेक्षाही निंदा झाली तर ती माझ्या वृत्तीला पोषक व उपकारकच होईल.

७०१ वीरावर फुलांचा वर्षाव होतो पण त्याने बंदुकांच्या गोळ्याही तितक्याच आनंदाने झेललेल्या असतात.

७०२ माझे मज कळो येती अवगुण। करू समाधान कशासाठी।।

७०३ काय माझे नेती वाईट म्हणून.

७०४ दुधाने जरी तोंड भाजले तरीसुद्‌धा मनुष्य फुंकून ताक पितो.

७०५ मनुष्य शहाणा व्हावा म्हणून परमेश्वर त्याला ठेच लावतो.

७०६ लहान मुलाला आई जिलबी देत नाही याचा अर्थ त्याच्यावर तिचे प्रेम नाही असा नव्हे.

७०७ आईने थोबाडीत दिली तरी ती चांगल्याकरिताच.

७०८ माझी आई म्हणजे महाराज, माझ्यावर कधीच रागवणार नाहीत अशी माझी खात्री आहे.

७०९ महाराज कोणाचेही अकल्याण करीत नाहीत.

७१० व्यावहारिक दृष्ट्या एखादी गोष्ट अकल्याणाची वाटली तरी आपल्या कल्याणाकरिताच.

७११ माझी काळजी माझ्यापेक्षा महाराजांना आहे.

७१२ विषाची पेरणी करूनही महाराजांनी अमृताची फळे दाखविली आहेत.

७१३ ज्याची स्तुती खूप होते त्याची निंदा ही थोडीशी व्हायचीच.

७१४ पाचकाने जसे जेवलेले अन्न पचते तसे निंदेने स्तुतीचे पचन होते.

७१५ बहुत पापी उध्दरीले। ऐसे ब्रीद रक्षियले।।
येवढा पापी धरा हाती। दास येतो काकुलती।।१।।

७१६ दुर्बद्‌धि ते मना । कदा नुपजो नारायणा।।



७१७ श्रीमंतानी बसावयास तटकूर घातले तरी त्याचे घरी बसायला काही नाही असे कुणीही म्हणणार नाही.

७१८ आले देवाजीच्या मना। तेथे कोणाचे चालेना।।
हरिश्चंद्र ताराराणी। वाहे डोंबा घरी पाणी।।
पांडवांचा सहकारी। राज्यावरुनी केले दुरी।।
तुका म्हणे उगे रहावे। जे जे होईल ते ते पहावे।।

७१९ वैद्य वाचविती जीवा। तेथे कोण ध्यातो देवा।।

७२० तुका म्हणे भोग सरे। गुणा येती अंगारे।।

७२१ भोगी झाला त्याग।।

७२२ पापाने दारिद्र्य प्राप्त। दारिद्र्याने पाप संचित।।

७२३ जैशी जैशी वेळ पडे। तैसे तैसे होणे धडे।।

७२४ भक्ती कधी कमीअधिक होत नाही.

७२५ सर्व विसरले तरी देवाला विसरू नये.

७२६ खरे बोलून अपकीर्ति झाली तरी हरकत नाही पण खोटे बोलून कीर्ति नको.

७२७ देवापेक्षाही देवाचे नावच गोड.

७२८ पापी माणसालाही खरे बोलल्याने देव क्षमा करतो.

७२९ स्थावर जंगम भरली पाही। दासा दैवत त्याविण नाही।।

७३० चैतन्याचा उपाधीशी तादात्म्यतेने येणारा गरमपणा कमी अधिक होणे हीच विकृती होय.

७३१ देवाचे नांवात खरे खुरे भक्तिप्रेम आहे.

७३२ पळसी तू तरी नाम कोठे नेसी?

७३३ आम्हा नाही तुझी चाड। तुझे नामची बरे गोड।।

७३४ गुरुनामापरता आनंद नाही.

७३५ दांत पडले म्हणजे तरी मनुष्य खाली पाहून चालतो.

७३६ काळ सारावा चिंतने। एकांत वासी गंगास्नाने।।

७३७ करोनी पूजन। प्रदक्षिणा तुळशीच्या।।
७३८ संताचे संगती न करावा वास। एखादा गुणदोष येईल अंगा।।
७३९ आमच्या सारख्यांची संगत म्हणजे एक त्रासच.
७४० पूर्वजन्मी ज्यांचे प्रेम असते त्यांचे या जन्मी खटके उडतात.
७४१ पूर्वजन्मी प्राप्त परिस्थितीचा कंटाळा करून सुखोपभोगाचे दृष्टीने ईश्वराजवळ प्रार्थना केली तर परमेश्वराने दिलेल्या स्थितीस ज्याने मान दिला नाही अशा जीवाला त्याने मागितलेली परिस्थिती देऊनही परमेश्वर त्याची फजिती उडवतो व पश्चात्ताप पावणेचे प्रसंगी पूर्वजन्मीच्या संबंधिताकडून तो तसाच अधिकारी असेल तर त्याचे ठिकाणी आठवण देऊन त्याला त्या स्थितीतून परावृत्त करून पूर्वस्थितीत आणतो व परमार्थप्रवण करतो.
७४२ अहंकाराने केलेले कर्म फुकट जाते व पश्चात्तापास कारणीभूत होते.
७४३ ज्याच्याबद्दल अहंकार येतो ती वस्तु जाते.
७४४ अज्ञानी जीवांची कर्मे पाहूनही ज्ञानी जीवास अधिक पश्चात्ताप व त्रास होतो.
७४५ पश्चात्ताप झाला असता क्रांतीच होते.
७४६ जीवाने आत्मशुद्धि केली की संताचे दुखणे जाते व आपण वचनमुक्त झालो असे त्यांना वाटते.
७४७ जीवाला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला तरी संतांना आपले काम झाले असे वाटते.
७४८ प्राप्त परिस्थिति नकोशी होऊन सुखदुःखे कळू लागली की जीवाला साधनाभ्यासाची पूर्व परिस्थिति चांगली वाटू लागते.
७४९ बरे वाईट सर्व नारायणास अर्पण करून तू वागशील तसाच मी आनंदाने वागेन अशी बुद्धि ठेवणाऱ्यास नारायण इकडे तिकडे जाऊ देणार नाही.
७५० तुका म्हणे गंगासागर संगमी। अवघ्या झाल्या उर्मी एकमय।।



७५१ प्राणायाम हा जीवानेच साधावयाचा असतो.
७५२ निर्विकल्प मनुष्य व्यवहाराला निरुपयोगी.
७५३ सविकल्प मनुष्य परमार्थाला निरुपयोगी.
७५४ विकल्प हेच पाप.
७५५ आपला विकल्पच आपणांस बाधक होतो.
७५६ पापी मनुष्य आपले पाप सांगू शकत नाही.
७५७ संकल्प हेच पुण्य
७५८ जी गोष्ट सत्य आहे तेथे पाप संभवत नाही.
७५९ एखादी गोष्ट सत्याला धरून पण व्यवहाराला सोडून असेल तर आपणास या जगात आपले आयुष्य काढायचे आहे, तर त्याचा अवलंब करू नये.
७६० परमार्थ व्यवहाराच्या कसोटीवर घासून पाहणे म्हणजे मूर्खपणाच होय.
७६१ परमार्थाचे जगच वेगळे आहे.
७६२ परमार्थ हा शरीराला व मनाला सुटून आहे.
७६३ निर्विकल्प माणसाचे मनांत विकार उत्पन्न केला तरी तो टिकत नाही.
७६४ देवापुढे गेले तरच सामान्या जीवाला देवाची आठवण होते.
७६५ परमार्थी माणसापुढे दृश्य आहे तोपर्यंतच त्याची आठवण; दृश्य बाजूला केले की ते तो विसरतो.
७६६ वाऱ्यांत वारे मिसळणे हा परमार्थ.
७६७ परमार्थी माणसाच्या शरीराच्या चेष्टा वृत्तिशून्यतेने होत असल्याने त्यांत पाप आणि पुण्य चित्रगुप्तास मांडता येत नाही.
७६८ जीवानेच शिवाला पहायचे आहे.
७६९ कल्पनेने आत्मवस्तूचे दर्शन होत नाही.
७७० निर्विकल्पाचे कल्पनेनेही कल्पनांचा निरास.
७७१ आत्मवस्तु ही निर्विकल्प आहे; पण त्याचा तुकडा तरी आपल्या हाती आला पाहिजे तर त्याची कल्पना करता येईल.
७७२ बर्फाचा खडा आपल्या हाती असेल तर हा सहा मैल उंच केला तर त्याला

हिमालय म्हणता येईल.

७७३ आत्म्याला वस्तु असे म्हणताच येत नाही पण आपल्याला बोलल्या खेरीज त्याचा बोध होणार नाही म्हणून वस्तु हा शब्द वापरला आहे.

७७४ आत्मज्ञान हा शब्द देखील खोटाच.

७७५ ज्ञानाचा विषय आत्मा नसून आत्म्याचा विषय ज्ञान आहे.

७७६ कोणतीही वस्तु म्हटली म्हणजे त्याला स्थितिस्थापकता असावी लागते तरच ती वस्तू होय.

७७७ स्थिति आहे पण स्थापकता नाही किंवा स्थापकता आहे पण स्थिति नाही तर वस्तूच होऊ शकत नाही.

७७८ मन, चित्त आणि बुद्‌धि यांना स्थिति आहे पण स्थापकता नाही कारण ते दृश्याचे तादात्म्याने शरीराशी होणारे परिणाम आहेत. म्हणून त्यांना वस्तु म्हणता येणार नाही.

७७९ निर्विकल्प वस्तु (आत्मा) व सविकल्प वस्तु (दृश्य) यांत फरक आहे.

७८० निर्विकल्प आत्म वस्तूची स्थिती ही बदलणारी नसून तिची स्थापकता ही आत्म्याच्या मर्जीवर आहे.

७८१ दृश्य वस्तूची स्थिति ही बदलणारी असून तिची स्थापकता ही निसर्गाचे किंवा मनुष्याचे मर्जीवर आहे.

७८२ लाकडाचे काय करायचे टेबल की खुर्ची हे सुताराने ठरवायचे आहे. मातीचे काय करायचे हे कुंभाराचे मर्जीवर आहे.

७८३ कापराची वडी जाळली तर त्याचे ज्योतीत व धुरांत रूपांतर होऊन जमिनीवर पांढरा चौक राहतो. यावरून त्याची स्थिती कशी बदलते ते कळणे सारखे आहे.

७८४ अस्तिरूप निर्विकल्प आत्मवस्तूची स्थितिस्थापकता ही बदलणारी व आत्म्याचे मर्जीवर असली तरी त्या ठिकाणी प्रवाही असणाऱ्या चैतन्यापासून उत्पन्न झालेल्या व बनलेल्या उपाधीवर असून अस्तिरूप आत्म्याने ज्या भांड्यात ते चैतन्य सोडले असेल त्यावर त्याची स्थापकता अवलंबून



आहे.

७८५ उत्पत्ति, स्थिति व लय हा चैतन्याचा विलास असून तो आनंदाकरताच आहे. पण त्याचे ज्ञान उपाधीच्या संघर्षणाने व परिभ्रमणाने नष्ट झाले की उपाधीसंभूत जीव पाप पुण्य, सुखदुःखाचे आंदोलनात सापडून भ्रमणाने भ्रमित होतो.

७८६ गत गोष्टीच्या आठवणीनेही मनुष्याला आनंद होतो.

७८७ विसरून जाणे हीच दुःखविस्मृति.

७८८ जो स्वतःला विसरून जातो तोच देवाला ओळखतो.

७८९ व्यवहाराला शेवट म्हणजे काशी यात्रा.

७९० शरीराचा काडीमात्र संबंधही परमार्थाशी नाही.

७९१ सहजतेनेच देणे घेणे जमाखर्च शून्य करणेचे दृष्टीने परमार्थी पुरुषाकडून व्यवहार घडत असल्याने तेथे पाप पुण्य संभवत नाही.

७९२ शरीर ज्याचे बनले आहे ते बनलेलेच असल्याने त्याचे व्यवहारात निसर्गास सुटून फरक होत नाही म्हणून त्याचे परिणाम घडणारच.

७९३ एखाद्या साधूने निखाऱ्यावर पाय दिल्यावर तो चटका देणार नाही असे थोडेच आहे.

७९४ नासिकाग्र दृष्टीनेच विषयविस्मृति.

७९५ गुरूशी वितंडवाद करणे हा मूर्खपणाच आहे.

७९६ एखादे तत्त्व शोधून काढण्याकरिताच ज्यानी जन्मच्या जन्म घालविले त्यातच आपण कालक्षेप करणेत काय अर्थ आहे?

७९७ कान आणि डोळा यांत चार बोटांचे अंतर आहे.

७९८ गत जन्मीचा हिशेब परमेश्वराने एकच ठेवल्याने बिनतक्रार झटून साधन करावे आणि मोक्षसुखाचा लाभ घ्यावा.

७९९ ज्याला घरांत समाधान नाही त्याचेच मन बाजारांत जाते.

८०० आता तरी बाजार पुरे.

८०१ आत्मलाभासारखा लाभच नाही.

८०२ शरीरसुख हे क्षणभंगुर, सापेक्ष, कार्य कारणापुरते, मर्यादित व अंती दुःखच देणारे आहे हे परमेश्वराने दाखवून कोठेही हिशोब एकच आहे. हे दाखविले असता साधनाकडे अजूनी मन का वळू नये हेच कळत नाही.

८०३ साधनाचा कंटाळा हे मात्र दुर्दैव आहे.

८०४ त्यागात व भोगात ज्याची वृत्ती बदलत नाही तोच साधू.

८०५ चहा माहीतच नाही असे असणे; चहाचा त्याग करणे व चहाची चव असून त्यांत ही मन न गुंतवता हा चहा ज्याच्याकरता त्या आत्मसुखाचा लाभ घेऊन आपण आनंदित होऊन तो आनंद सर्वांना देणे यातच जीवाची खरीखुरी सार्थकता आहे.

८०६ आपण कोण आहोत हे ओळखून जर मनुष्य वागेल तर त्याचे पाऊल चाकोरीच्या बाहेर जाणार नाही व दुःख करणेचा प्रसंग त्याच्यावर खात्रीने येणार नाही.

८०७ आपण कोण आहोत हे परमेश्वरच विशिष्ट प्रसंगांनी दाखवून देतो व तोच प्रसंग आपल्या आयुष्यात परमार्थवृत्तीस पोषक असल्याने विशेष ठरतो.

८०८ ज्याचे कौतुक देवाने केले आहे त्याचे इतरांनी करण्याची आवश्यकता नाही.

८०९ साधन करा व प्रपंच, परमार्थ दोन्ही आम्हांस आमचे मनासारखे साधावेत असे म्हणू नका हेच संत मागेपासून सांगत आले आहेत.

८१० आपले अस्तित्वच ज्याने मनाने नाहीसे केले त्याला वर्तमान भूत भविष्याची बाधा न होता तो अविनाश सुखाचा अधिकारी होतो.

८११ माझी अशी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे की सर्वांनीच ज्ञानेश्वर, तुकाराम, मीराबाई, मुक्ताबाई व्हावे.

८१२ तुका म्हणे आम्ही मागावी लडीवाळी। पुरवावी आळी मायबापा।।

८१३ श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, पूजन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन इतक्या प्रकारे भक्ती व्यक्त होते.



८१४ परमेश्वराने एकदा बिनतक्रार केले तर त्या जीवाची तक्रार पुनश्च परमेश्वरही ऐकत नाही व त्याचे कोणतेही समाधान करू शकत नाही.

८१५ विचाराअंती सर्व कोडे सुटते.

८१६ खंबीरीशिवाय प्रपंच हा सफल होत नाही मग परमार्थ कसा साधेल?

८१७ परमार्थी माणसाने प्रपंचाचा विचारच करू नये.

८१८ सारांश साधनाशिवाय सुखाचा रस्ताच नाही.

८१९ रामकृष्ण नामाचा उघडा मंत्र तत्त्वरूप (वायुरूप) असल्याने गुरुकृपेशिवाय हाती येत नाही.

८२० सर्व जग राम राम म्हणे। तया का न येती विमाने।।

८२१ निष्ठेचे फळ म्हणजेच सायुज्य पदाची प्राप्ती.

८२२ मुक्ती वरील गुरुभक्ती। उद्धव मागे अतिप्रीती।।

८२३ कार्य कारणाने येणारे व उत्पन्न होणारे संबंध (बालपणापासूनचे असले तरी) कार्य कारणाअंतीच नष्ट होतात. पण मूलतः असणारा भगवंताचा व जीवाचा संबंधच असा आहे की तो जीवाला इकडे तिकडे जाऊ देणार नाही व हे ज्याने ओळखले त्याचा मूलतः असणारा निरपेक्ष भक्तीचा संबंध अबाधित असतो.

८२४ वायु आणि लहरी म्हणजेच विश्व.

८२५ वायुरूप लहरी साधनाभ्यासाने होणे हाच परमार्थ.

८२६ महाराजांनी जागृति निर्माण केली तर आता स्वप्नांचा विचार तरी कशाला?

८२७ गुरूचा मोठेपणा शिष्याचेवर.

८२८ आपल्यापेक्षाही आपले शिष्य अधिकारी व्हावेत असे खऱ्या गुरूला वाटते.

८२९ वांझेच्या पुत्रा मांडिला विवाही। पुत्रविना तेथे कैचा उत्साही।।

८३० ज्ञानदेव म्हणे ऐक मुक्ताबाई। ओलेचिना तेथे पेरावे ते काई।।

८३१ आपुला तो एक देव करूनी घ्यावा। तेणे विण जीवा सुख नाहे।। हेच

निश्चित.

८३२ देवाची इच्छा तीच आपली इच्छा झाल्यास मनुष्याला दुःख करणेचा प्रसंगच येणार नाही.

८३३ देवाला ज्याने समाधान तसेच आपण वर्तावे.

८३४ देवाचे इच्छेविरूद्ध जाणाऱ्यालाच देव कोठेही हिशेब एकच आहे हे दाखवितो.

८३५ कोणत्याही प्रकाराने व उपायाने देव भक्ताला आपल्याकडेच वळवितो.

८३६ कोठेही हिशेब एकच, याचा प्रकाश बुद्धीत पडल्याखेरीज साधन शक्य होणार नाही.

८३७ साधनाकरताच आपले आयुष्य आहे हे एखाद्याला पटले तरी सर्वांना नाही; म्हणून समाधानातच सर्व सुख आहे हे अनुभव देऊन संताना व भगवंताला दाखवावे लागते.

८३८ अनुभवाने जीव विनातक्रार होतो.

८३९ तक्रार मनाची व इंद्रियाची होते.

८४० तक्रारच उरली नाही की साधन व्यवस्थित होते.

८४१ परमेश्वर एक म्हणून त्याचा हिशोबही एकच.

८४२ तो ज्याने ओळखला तोच तरला.

८४३ काट्याच्या अणिवर वसती तीन गाव। दोन ओसाड एक वसेचिना।। हे ज्याना ओळखले त्यावर ईश्वरी कृपा आहे हे निश्चित.

८४४ मग तो असे भलते ठायी। जनी वनी खाटे भोई।।
कई वहावे जीवन। कई पलंगी शयन।।

८४५ नारायणा वाचूनी दुसरा विषय नको.

८४६ अहो खलभुजंगस्य विचित्रोयं वधक्रमः।
अन्यस्य दशति श्रोत्रमन्यः प्राणैर्वियुज्यते।।

८४७ उष्ट्रस्य लग्नवेलायां गर्दभः स्तुतिपाठकः।
परस्परं प्रशंसंति अहो रूपं अहो ध्वनिः।।



८४८ ज्याने देवालाच वाहून घेतले त्या भक्ताने देवाचे चिंतनाखेरीज काही करू नये.

८४९ यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः। स पंडितः सः श्रुतिमान् गुणज्ञः।
स एव वक्ता स च दर्शनीयः। सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते।।

८५० संत संगतीने वृत्ती निवृत्त होतेच.

८५१ वृत्ती निवृत्त झाली की पुनः प्रवृत्त होत नाही.

८५२ लटके हसे लटके रडे । लटके उडे लटिक्याचे ।।

८५३ ज्या वस्तूबद्दल अहंकार येतो ती जवळची वस्तू दूर जाते व तो अहंकार जाणेची वेळ येऊन गेली की अंतःकरणाचा ठाव घेऊन तेथे प्रविष्ट होते.

८५४ भोगात किंवा त्यागात एकच ठसा उमटणे ही परमार्थातील शेवटची स्थिती.

८५५ अति परिचयाने जर कळत वा नकळत अवज्ञा झाली तर परमेश्वर त्याचे प्रायश्चित्त देतो.

८५६ प्रायश्चित्ताने आत्मशुद्धि.

८५७ योग्य ठिकाणी जाताना बरोबरचा जीव जर मागे राहिला तर त्याला थोडे मागे येऊनच पुढे घेऊन जावे लागते, असा व्यवहार आहे.

८५८ संत दर्शनी हा लाभ । पद्मनाभ जोडिला।।

८५९ दोन घरचा पाहुणा उपाशी.

८६० उपास घडल्यास मोक्ष.

८६१ घरी जेवू नकोस, परान्न घेवू नकोस व उपाशी राहू नकोस, असे मागे एका साधूचे वचन आहे.

८६२ मी कशात नाही हे जरी खरे असले तरी ते सर्वांनाच पटेल असे नाही म्हणून त्याचा निर्णय महाराजांनीच द्यावा अशी प्रार्थना आहे.

८६३ नाम संकीर्तन साधन पै सोपे। जळतील पापे जन्मांतरीची।।

८६४ न लगे सायास जाणे वनांतरा। सुखे येतो घरा नारायण।।

८६५ देव भक्ताकडे येत असला तरी भक्तानेच देवाकडे जाणे हे अधिक

श्रेयस्कर व योग्य.

८६६ मनुष्याचा मोठेपणा मनुष्याच्या सचोटीवरच आहे.

८६७ टाकीचे घाव सोसल्याखेरीज देवकळा येत नाही.

८६८ देवलोकातल्या माणसांनी मृत्युलोकाची वार्ता पुसू नये

८६९ नारायण नामे होऊ जीवन्मुक्त। कीर्तनी अनंत गाऊ गीती।।

८७० चोराला भीती, मालकाला नाही.

८७१ आरंभ नाही शेवट कैचा मध्यस्थितीला भुलू नको.

८७२ संसारात एकही पाऊल अनुभवावीणे टाकू नको.

८७३ देऊन साकी बाकी तुका मार्गी झाला।

८७४ थोरांचे अनुकरण मात्र सर्व प्रकारे करू नये.

८७५ देव भक्तांचा हिशेब माणसांनी लक्षात घेऊ नये.

८७६ श्रीकृष्णे स्वसुखे उचलली मेदिनी। तुमच्याने गोणी नुचलवे।।

८७७ साधन केले तरच कृपा.

८७८ एकादशी दुसऱ्याला सांगता येते पण स्वतःलाच जेवावे लागते.

८७९ संतही एखाद्या गोष्टीवर तळमळताना दिसतात याचा अर्थ खालचे थरातील जीव कसे तळमळत असतील हे दाखविणेकरीता.

८८० परमार्थ तत्त्व एकदा कळले की ते ज्याचे त्यानेच साधावयाचे असते.

८८१ परस्त्री, परधन व परनिंदा वर्ज्यच.

८८२ ज्याचा त्याने आपल्या सुखाचा मार्ग शोधला पाहिजे.

८८३ सर्वाचे सर्व काही सहन करणे यातच मोठी शक्ती आहे.

८८४ राखावी बहुतांची अंतरे। भाग्य येते तदनंतरे।।

८८५ कोणाचे अंतःकरण दुखवू नये म्हटले, तर तो जीव त्यागीच असावा लागतो.

८८६ स्वार्थ म्हणजे दुःख

८८७ ज्या ज्या गोष्टी सोडाव्यात त्या त्या रिझर्व होऊन त्यांना एक प्रकारची शक्ति निर्माण होते.



८८८ पंढरीची वारी, देवाचे दर्शन, व मोक्ष सुख एकदाच.

८८९ साधनाचा साधावयाचा क्षण एकच, पण त्याची तपश्चर्याच मोठी.

८९० परमेश्वरी इच्छेने सुखाचे क्षण प्राप्त झाले तर जसे आपण राजी होतो तसेच दुःखाचे प्रसंगीही ईश्वरी इच्छेस तितकाच मान देऊन राजी राहिले पाहिजे.

८९१ डर तो पिछे रहे.

८९२ मोक्ष मिळावयाचा असेल तर तो केव्हाच मिळाला आहे. आता त्याचा विचार कशाला? मिळाला नाही तरी चालेल.

८९३ परमार्थात आहे म्हटले तरी आहे व नाही म्हटले तरी आहेच हीच वृत्ती महत्वाची.

८९४ आयुष्याचा जीवनक्रम एकदा का ठशांत बसला म्हणजे ते संस्कार वारंवार घडले पाहिजेत असे नाही. त्या संस्कारावर कोणताही अन्य संस्कार त्याचा लवलेशही न होणे म्हणजे आयुष्याचा क्रम (पारमार्थिक) अखंड टिकणे.

८९५ परस्त्री व परपुरुष म्हणजे पापाचा समुद्र.

८९६ जेणो काम तेणो ठाय बीजा करे सो गोता खाय।

८९७ देव भक्ताचे काम बिनहिशेबी असल्याने त्यांत कोणीच हिशेब ठेवू नये.

८९८ एवढ्याने काय होते म्हटले की बिघडलेच.

८९९ कोणाची पैशाची तर कोणाची शब्दाची तैनात.

९०० घरात दिवा लागत नसेल तर त्या घराचा तरी काय उपयोग?

९०१ वायुलहरी हे नाते सर्वात जवळचे व श्रेष्ठ.

९०२ लहरीची फेक दुसरीकडे गेल्यास लहरींचे आर्कषण करणेकरीता वायु हा विशिष्ट ठिकाणी त्या लहरींचे केंद्रीकरण करून बाहेरील फेक नाहीशी करणेचीच परिस्थिति निर्माण करून ती लहर अंतर्मुख करतो.

९०३ बाहेरील वारा बंद झाला की आतील सुरू होतो.

९०४ वायूशी लहरीचे तादात्म्य हाच परमार्थ.

९०५ वायूशी तादात्म्य न होता लहरीस लहर येणे हाच व्यवहार.

९०६ लहर येऊन वायूचे अनुसंधान सुटून दृश्यांत लहरीची फेक होणे हाच व्यभिचार.

९०७ वाऱ्यातून अग्नी व अग्नीतून पाणी; पण ते एकमेकांत मिसळत नाहीत क्वचित् ते साहचर्याने राहतील, क्वचित् नाशासही कारणीभूत होतील पण दोनींचा हिशोब एकच.

९०८ वासना शमन करणे म्हणजे वासना तृप्त करणे नव्हे.

९०९ वासना तृप्त करणे म्हणजे वासना वाढविणेच होय.

९१० कुठेही हिशेब एकच, हे अनुभवास येणे हीच परमेश्वरी कृपा.

९११ हिशेबात फारकत आहे असे वाटणे हे दुचिन्ह होय.

९१२ परिस्थितीत फरक, पण हिशेबात नाही.

९१३ भोगाच्या मागे भोग लागला की भोगवृत्ती ही आपोआप त्यागी बनते. स्वप्नातील गोष्टी जागृतीत कशाला?

९१४ जागृतीचा स्वप्नात व स्वप्नाचा सुषुप्तीत उपयोग नाही.

९१५ लहरींची नियंत्रित व मर्यादित संस्मरणात्मक लहर हाच संसार.

९१६ लहरींची लहर वाढत जाणे म्हणजेच वायूपासून दूर होणे.

९१७ ज्ञानवान् झालेल्या माणसाने काही गोष्टी बरोबर वा चूक केल्या तरी त्याला अर्थ नाही. तद्वतच भ्रमणातून निर्माण होणारे बरोबर किंवा चुकीचे व्यवहार याला अर्थ नाही.

९१८ अटीतटीवर गोष्टी गेल्या की आणिबाणीचा प्रसंग येतो.

९१९ पतिव्रता स्त्रीने एकदा मंगळसूत्र अडकवायचे असते; नंतर दुसरा विचार करणेही पापच.

९२० सर्वत्र प्रेमाची धूळफेकच दिसून येते.

९२१ वायूचे लहरीकडे व लहरीचे वायूकडे आर्कषण हीच शुद्ध भक्ति (भक्तिप्रेम).

९२२ ज्याचे त्यानेच वैकुंठास जावयाचे.



९२३ जो तो आपल्या कर्माचा.

९२४ पंथ वेगळा संतांचा.

९२५ निर्विकल्प स्थितीत विकल्प उत्पन्न केला तरी तो येत नाही. त्याला कोणी डिवचलं तरच तो वस्तुस्थितीकडे पाहणार व विचार करणार.

९२६ निर्विकल्प मनस्थितीत विचार टिकत नाही.

९२७ गंगा दारूचे बाटलीत मिसळली की दारूच होणार पण दारूची बाटली गंगेत मिसळली तर गंगाच होणार.

९२८ निर्विकल्पास दोष व बाधा नाही, सविकल्पास हटकून.

९२९ पतिपत्नींनी आपला व्यवहार बंद ठेवला तरी त्यांचे प्रेम पूर्व संस्काराने मंडित असल्याने ते नष्ट होत नाही. एकमेकांचा आदर प्रेम व कर्तव्य जागृति ही परिपूर्ण असते.

९३० पतिव्रता स्त्री ही सूर्याचा रथही उभा करू शकते.

९३१ सर्वांचे बरोबर, माझेच चूक आहे.

९३२ सर्वांची गरज मला आहे.

९३३ आपल्यासारखेच सर्व आहेत असे मानू नये.

९३४ कुठेही विश्वास ठेवावा असे नाही.

९३५ धर्मराजाची वृत्ति व्यवहारांत निरुपयोगी.

९३६ जो व्यवहारात लंगडा तो परमार्थात लायक.

९३७ व्यवहाराचे पलीकडेच परमार्थ.

९३८ अतिपरिचयाने अवज्ञा होतेच.

९३९ असेल तोपर्यंत कोणाची किंमत असत नाही.

९४० सर्वांना फक्त ओळखून असावे.

९४१ बोलले की फुकट गेले.

९४२ झाकली मूठ केव्हा तरी उघडी होतेच.

९४३ विश्वास ठेवणेस पात्र संत किंवा परमेश्वर.

९४४ संताचे दृश्याबद्दल होणारे पहिले मत तेच शेवटचे

९४५ परमेश्वराची इच्छा व आज्ञा एकच असते.
९४६ सर्व जण बदलणारे, परमेश्वर नाही.
९४७ वायु-लहरी इतके जगात निकटचे नाते नाही.
९४८ पाया बळकट असला म्हणजे वर केवढीही इमारत चढवावी.
९४९ जगाचा कटु अनुभव आल्यावर सुज्ञ मनुष्य आप्तेष्टांशीही फारसा संबंध ठेवू इच्छित नाही.
९५० अघळपघळपणा कोठेही घातकच असतो.
९५१ कोणाशी तुटून वागू नये पण लघळपणाही ठेवू नये.
९५२ उपाधीविना राहू नये, पण उपाधीत सापडू नये, असा समर्थांचा संदेश आहे.
९५३ अति हे सर्वत्र वर्ज्यच.
९५४ अति त्रागा, भीक मागा.
९५५ राग म्हणजे क्रोध व प्रेम.
९५६ आपण भिकारी नाही; करिता आता भिकेचे तर डोहाळे नाहीतच, पण नवसही नको.
९५७ तुका म्हणे आम्ही बाळ। या या देवाचे लडिवाळ।।
९५८ सर्व जग माझ्यावर उखडले तर मी देवाचा आभारी होईन.
९५९ सर्वांनी लाथा मारल्या तरच वैराग्य निर्माण होईल.
९६० चोराच्या वाटा चोरालाच ठाऊक.
९६१ वर्तमान कालावरून भूतभविष्याचे ज्ञान होते.
९६२ ग्रहमानावर भविष्य अवलंबून आहे, हे म्हणणेही अज्ञान आहे.
९६३ आपण वागावे तसे होते.
९६४ भगवान् किंवा सद्गुरु यांचे ग्रहदशा बदलणेचेही सामर्थ्य आहे.
९६५ व्यावहारिक जगात सर्वांना सारखाच व्यवहार लागू आहे, एकाला आहे व एकाने तिकडे पाहून नये असे नाही.
९६६ एक जर व्यवहारांत काय म्हणतील याचा विचार करीत नाही तर दुसऱ्याने तरी का करावा?



९६७ आपण कोण आहोत हे कळून (निश्चित) जो आपली वागणूक ठेवतो त्यांत बदल होत नाही.
९६८ ज्याला परमेश्वराशिवाय आपले कोणीही नाही हे निश्चित समजले त्याचे मन जावे म्हटले तरी दुसरीकडे परमेश्वराशिवाय किंवा सद्गुरूशिवाय कोठेही जाणार नाही.
९६९ मनांत चलबिचल झाली तरी त्याचा धक्का संतांना बसतो.
९७० तोवरी तोवरी ज्ञानाचिया गोष्टी। तुकया सवे गाठी पडली नाही।।
९७१ प्रेमाची धूळफेक जगाला समजली नाही तरी संतसज्जनांना समजते.
९७२ परमार्थात थापा पचत नाहीत.
९७३ तुका म्हणे एक्या मरणेची सरे.
९७४ हा अखेरचाच जन्म आहे, असे समजून माणसांनी फार विचाराने वागावे.
९७५ वर्तमान कालाचे विरुद्ध भूतकाळ असतो.
९७६ वर्तमान काळ बनवावा तसा बनतो व त्यावर भविष्य काळ दोन्ही स्थानीचा ताळा दाखवितो.
९७७ तुका म्हणे मनी नाही। नये आकाराते काही।।
९७८ आंत एक, बाहेर एक असे केव्हाच नसावे.
९७९ या बोटावरची थुंकी त्या बोटावर अशी लहान मुले करतात.
९८० म्हातारपणी कुणी गोट्या खेळतील तर त्याला लोक हसतात.
९८१ नाचरेपणा किती, असे म्हणणाऱ्यानी तरी तो करू नये.
९८२ परमेश्वर स्वतः नाचरा आहे पण त्याचा नाचरेपणा कळला की आपला नाचरेपणा तेथे रहात नाही.
९८३ कोणत्याही परिस्थितीत आपलाच असणारा आत्माराम किंवा सद्गुरु आपल्या कल्याणाकरिता झटत असता (शरीराची किंवा कशाची पर्वा न करता) आपण जर त्यांच्या कोणत्याही वचनाचे उल्लंघन केले तर त्यांत आपली सर्व हानिच होणार हे निश्चित.

९८४ एकदा महाराजांनी कृपा केली की त्याला ते इकडे तिकडे जाऊच देत नाहीत.

९८५ संत सद्गुरु हे जड जीवाकरिताच तपश्चर्या करतात. त्यांचे पारमार्थिक दृष्ट्या कांहीच होणेचे राहिलेले नसते. पण हे स्वानुभवाने कळल्यावर आपण त्यांना तपश्चर्याच करावयांस लावणे हे कर्तव्य होणार नाही. तर त्यांनी ज्या कारणाकरिता कष्ट सोसले त्याचे चीज आपण करून कितीही त्रास सोसावा लागला तरी तो आनंदाने सोसून तपश्चर्येने आपण आपले जीवन त्यागी बनवणे व त्यांना आनंद देणे हेच आपल्या जीविताचे कर्तव्य असून त्यातच आपले खरे सार्थक आहे.

९८६ गुरूचा मोठेपणा शिष्यावरच.

९८७ हिमतवान सगळेच असतात. कोणी म्हणतो तू नाहीस तुझा काका तर कोणी म्हणतो तूही नकोस व तुझा काकाही नको, मी हा रस्ताच सोडला. माझा मी माझ्याच मुळच्या बिंदूवर अढळ हेईन एकदाच, की पुन: मलाच चलनवलनही करावे लागणार नाही.

९८८ चलनवलन करणे हीच अंतर्मुख स्थिती.

९८९ कुंकवाची उठाठेवी। बोडका देवी कशाला।

९९० त्रास म्हणजे बंधन.

९९१ स्वेच्छेने घेतलेले बंधन हीच बंधनाची पराकाष्ठा.

९९२ बंधनाची पराकाष्ठा म्हणजेच मोक्ष किंवा ब्रह्मानंद.

९९३ आधी उत्तम, आता उत्तम, पुढे ही उत्तम, मधला व्यवहार उत्तमत्व दृढ होण्याकरिता म्हणून तो खोटा.

९९४ उत्तमत्व दृढ होण्याकरिता कोणास नको म्हणून परमेश्वराजवळ जर कोणी विनंती अर्ज केला तर त्याचेवर संतांची खरी कृपा असल्यास परमेश्वर कांही काळ खोटाबाजार मांडून त्यास त्याचे अधमत्व दाखवितो.

९९५ मागचा धागा ओवला; तो बळकट व संपूर्ण झाला.

९९६ धागा पूर्ण झाला की ओवण्याचे कामच झाले.



९९७ ओवलेला धागा पुन: ओवताच येत नाही. तो पुन: पुन: पाहण्यातच आनंद.

९९८ वायु हा स्वत: सिद्ध व त्यावर उठणारी लहर दुसरीकडे फेकली गेली की ती त्याच्या कक्षेत आली की व्यवहाराचा शेवट होतो व ध्रुव बिंदूवर सूत्राचा उभा आडवा छेद घेऊन स्थिर झाला की परमार्थाची पूर्णता.

९९९ महापुराच्या लाटा चढत्या व उतरत्या असतात.

१००० उतरत्या लाटा पात्रांत येतात.

१००१ उभा आडवा छेद घेऊन धारेत येणे ही परमार्थाची पूर्णता.

१००२ ज्याला आरंभ आहे त्याचा शेवटही कोठे तरी व्हावाच लागतो.

१००३ पात्रांत लाट येणे हा व्यवहाराचा शेवट.

१००४ ज्याला आरंभही नाही त्याला शेवटही नाही.

१००५ ज्याला शेवट नाही त्यातच अखंड समाधान.

१००६ आपण आपल्यास ओळखून त्याच वृत्तीत अखंड राहणे हेच साधन व समाधान.

१००७ बाहेर गेलेल्याला केव्हातरी आत यावे लागतेच.

१००८ प्रवाशाने आपला प्रवास कधी तरी संपवला पाहिजेच.

१००९ व्यवहार संपला, तरच परमार्थ.

१०१० परमार्थातला व्यवहार हा उपकारक होतो.

१०११ जीवाला गति असल्याने तो फेकला जातो. पण त्यालाही मर्यादा आहेच.

१०१२ महाराजांनी आपले म्हटले यापेक्षा जगात काय मिळवायचे आहे?

१०१३ स्वत:चा विचार असल्याखेरीज दुसऱ्याचा विचार घेताच येत नाही.

१०१४ शिल्लक असलेली रक्कम जमेकडे जाते व त्याचा आनंद खर्चापेक्षा जास्त

१०१५ सायुज्यमुक्तीपेक्षा संतांना भक्तिसुखच अधिक गोड वाटते.

१०१६ ज्याची शिल्लक जास्त तोच श्रीमान्.

१०१७ विशिष्ट असे अत्युच्च ध्येय गाठणेसाठी परमेश्वराने आपणांस या जगांत

का पाठविले आहे याचा विचार करून एखादी आवडती वस्तूही मनांत प्रेम असता ध्येय बिन्दू गाठणेची त्वरा असलेला अधिकारी जीव ती वस्तू बाजूस ठेवतो.

१०१८ आवडता विषय सोडणे हाच त्याग.

१०१९ भोगाचे समाधान त्यागात होणे हीच अंतर्मुख स्थिति.

१०२० आपण कोण आहोत हे ज्यास कळते तोच आपणास कसे वागले पाहिजे याचा खराखुरा विचार करून त्याप्रमाणे वागतो.

१०२१ जवाएवढे सुख प्राप्त करून घेणेकरिता हिमालयाएवढा त्रास सहन करावा लागतो.

१०२२ दु:खाशिवाय सुख भोगणेच अशक्य, म्हणून ते आनंदाने सहन करावे.

१०२३ आपल्या पथ्यावर पडेल एवढीच ईश्वरी इच्छा असे मानू नये.

१०२४ जितका भोग मोठा त्याचे शतपट हानि.

१०२५ व्यवहार दृष्ट्या त्याज्य परंतु सत्य अशा गोष्टीकरिता संतसज्जन निंदा स्तुतींचीही पर्वा करीत नाहीत.

१०२६ भोगाने खर्च व त्यागाने शिल्लक वाढते.

१०२७ कोणीही मॅटरला स्पर्श करू शकतो पण इनर्जीला स्पर्श करणारे संतच.

१०२८ इनर्जी ध्रुव बिंदूत केंद्रित झाली तर वाढते, नाहीतर मॅटर बरोबर त्याची इनव्हेस्टमेंट होते.

१०२९ परमेश्वरी घटनेने प्राप्त झालेले सुख जितक्या आनंदाने घेतले तितक्याच आनंदाने ईश्वरी घटनेने आपल्या कल्याणाकरिता निर्माण झालेले दु:खही सहन करणेची आपली तयारी पाहिजे. मग मात्र ब्रह्मानंदाला तोटा नाही.

१०३० मनाजुकती आज्ञा पाळणे हे कांही आज्ञापालन नव्हे.

१०३१ जिलबीबरोबर घातलेला जसा मठ्ठा तद्वतच सुखाबरोबर दु:ख; कारण दु:खाशिवाय सुख पचत नाही.

१०३२ अनेक जन्म विषयभोग भोगलेच आहेत, त्यांत नवीन असे कांहीच नाही.



१०३३ विषयाचे सुख अनेक प्रकारे प्रचीतीस येऊनही त्याचा मोह सुटला नाही तर शाश्वत सुख मिळणार नाही.

१०३४ विषयाचे सुख हे क्षणभंगुर व नाशिवंत आहे.

१०३५ स्वेच्छेने विषयाचा त्याग झाला तर त्यात दु:ख वाटत नाही.

१०३६ नाईलाजाने घडलेला त्यागच दु:खाला कारणीभूत होतो.

१०३७ जितका त्याग मोठा त्याचे शतपट प्राप्ती.

१०३८ निसर्गानेच भेद येतो.

१०३९ आपली इच्छा काही असो; परमेश्वर आपल्या इच्छेप्रमाणेच करतो.

१०४० परमेश्वराची व आमची इच्छा जमली की ते कार्य झालेच म्हणून समजावे.

१०४१ अज्ञानी जीव सर्व कांही आपण केले असे मानतो.

१०४२ परमेश्वराने धोका दाखविल्यावर तेथून बाजूस होणे म्हणजे त्याच्या इच्छेस मान देणे होय.

१०४३ परमेश्वराचेच इच्छेप्रमाणे वागणे यासारखे सुख नाही.

१०४४ परमेश्वराचे इच्छेविरुध्द वागल्यास तो आपली खोडच मोडील.

१०४५ सर्व कांही त्याचे इच्छेप्रमाणे वागणाऱ्याची इच्छा ही परमेश्वर क्वचित् सफल करतो.

१०४६ देवाशी अटीतटीने वागले की आपलीच खोडकी मोडायची.

१०४७ दुर्जनांचे सांनिध्यातला मोठेपणाही नको.

१०४८ आपलेपणात मनुष्य मानापमानही विसरून जातो.

१०४९ अनुभवी डॉक्टरचे हातून मेलेले परवडले, पण नवशिक्या वैद्याचे हातून जगणे नको.

१०५० सज्जनांचे हातून वाटोळे होणे हे देखील दुर्जनाचे हातून चौकोनी होण्यापेक्षा चांगले असते.

१०५१ जे द्यावयाचे तेच घ्यावयाचे हा संतांचा व परमेश्वराचा व्यवहार आहे.

१०५२ व्यवहाराचा रस्ता संपल्याखेरीज जीवाला परमार्थाचा रस्ताच दिसत नाही.

१०५३ व्यावहारिक जीवनाचा शेवट करून परमार्थाचा उजेड दाखविणे हीच

संतांची व परमेश्वराची जादू आहे.

१०५४ जेथे व्यवहाराचा शेवट तेथेच संतांचा व्यवहार

१०५५ संतांचा व्यवहार झाला की तेथे साधनाच शिलकीस राहते.

१०५६ संतांचा व्यवहार निरिच्छ करणारा तर बाकीचे सर्व व्यवहार वासनेच्या महापुरात बुडविणारेच आहेत.

१०५७ महापुरांत मनुष्य बुडला की, खालवर तीनदा गटकाळ्या खाऊन नाका तोंडात पाणी जाऊन त्याचा प्राणच जातो.

१०५८ ज्यांच्या सांनिध्यांतही आपल्या वासना मरतात तेच महात्मे होत.

१०५९ ज्याला पाहिले तरी आपण स्वत:ला क्षणभर विसरून जातो तेच संत.

१०६० सर्प दंशाने मरण्यापेक्षा, विंचू चाऊन आरडावे लागले तरी परमेश्वराने विषाचा परिणाम दाखवून त्याचे दु:ख हलके केले व सर्प विंचू नारायण।। परी वंदावे दूरून।।, हे अनुभवाने पटविले असाच त्याचा अर्थ आहे.

१०६१ नागाचे तोंडात जाऊन आपली सोंगटी शेपटीवर येऊ न देणे वा साधन अभ्यासाने शिडीच पकडून वरच चढण्याचा प्रयत्न करणे हाच परमार्थ.

१०६२ मेलेले अन्न खाऊन जगण्यापेक्षा न खाताच मेलेले उत्तम.

१०६३ सिंह आणि वाघ ही जात अशी आहे की कोल्ह्याकुत्र्याने टाकलेले हाडूक ते कधीही चघळणार नाहीत.

१०६४ कोणास नशीब काढून घेता येत नाही.

१०६५ पळसाला पाने तीनच.

१०६६ घरोघरी मातीच्या चुली.

१०६७ परमेश्वरासही जे शक्य नाही ते संत नशीब हलके करतात. संपूर्ण बदलता येत नाही.

१०६८ जीवाच्या कृत कर्माने व त्याचेच इच्छेने त्याला योग्य असा मोजून आणि तोलून दिलेला वाटा, यालाच नशीब म्हणतात.

१०६९ मागितलेला वाटा मिळाल्यावर तक्रार करुन उपयोग होत नाही व त्यातूनही जीवाने धडपड केली तर त्याचा हिशेब सारखाच होतो व परमेश्वर त्याला



बिनतक्रार करतो.

१०७० संतसमागमात निरिच्छ झालेला जीव मोक्षाप्रत जातो.

१०७१ कुग्रामवासी हीन जनाचे सेवेने विटलेला जीव नाइलाजाने परावृत्त झाला तरी त्यास नरक चुकत नाही.

१०७२ सर्वांनी सुखी असावे इतकेच मला वाटते.

१०७३ दु:खाशिवाय सुखाची प्राप्ती नाही.

१०७४ ब्रह्मानंद भोगणाऱ्यास ब्रह्माइतकेच दु:ख भोगावे लागते.

१०७५ प्रपंच व परमार्थ, माया व ब्रह्म यांची व्याप्ति सारखी आहे.

१०७६ परमेश्वराची प्राप्ति झाल्यावर त्याला साजेल असे वागणे हेच त्याच्या भक्तांचे कर्तव्य असून त्यातच भक्तिप्रेमाचा जिव्हाळा आहे.

१०७७ दुसऱ्यावर प्रेम करताना त्याचा मोठेपणा राखणेची जबाबदारी आपल्यावर आहे हे ओळखून आपले वागणे ठेवणे हेच प्रेमाचे खरेखुरे चिन्ह आहे.

१०७८ विश्वास तो की ज्यात गैरविश्वास उत्पन्न होत नाही.

१०७९ स्वत:चे अस्तित्व विसरणे हेच शुद्ध प्रेमाचे लक्षण आहे.

१०८० वस्तूची प्राप्ति हेच प्रेमाचे चिन्ह असून वस्तुरूप होणे हीच पूर्णता.

१०८१ वस्तुरूप होणे साधनाशिवाय घडत नाही.

१०८२ स्वत: विसरलेलाच स्वत:चे वस्तूवर प्रेम करू शकतो. दुसरीकडे त्याची दृष्टि जाणार नाही.

१०८३ नारायणास आवडेल तेच करणे हेच त्याचे वरचे प्रेम; मग दुसरा विचारही तेथे शिवणार नाही.

१०८४ परमेश्वरास फसवू पाहणारे इतरांचे हातावर किती तुरी ठेवत असतील? दोन असेपर्यंतच एक होणेचा विचार.

१०८५ एक झाल्यावर पुढे काय हा प्रश्नच संभवत नाही.

१०८६ परक्या वस्तूबद्दलच काय पण व्यावहारिक दृष्ट्या आपली म्हटली जाणाऱ्या कोणत्या वस्तूबद्दलही जाणती माणसे मोह आणि शोक यास आसरा देत नाहीत.

१०८७ साधनाने मिळणारी आत्मवस्तु मात्र अशी आहे की त्याचा मोह हा साधकास वैकुंठ पदावरच चढवील आणि त्यात शोकाचा प्रसंगच येणार नाही.

१०८८ मजबूत पायावर जी इमारत उभी आहे तेथे पुढे काय हा प्रश्नच उरत नाही. जेणे करून आपले चांगले होईल व होणे जरुरीचे आहे तेच होणार.

१०८९ परमेश्वराशिवाय काही नाही म्हणून मामलेदाराचे घरी पाणी भरून गावात मधुकरीचा परवाना मिळवणारे कांही जीव असतातच.

१०९० शरीराच्या सुखाने प्राणास व जीवाला विश्रांति मिळत नाही.

१०९१ जीव अंतर्मुख होण्यास कारण संत व भगवानच त्याला अंर्तबाह्य एका बिंदूत केंद्रित करतात.

१०९२ साधनाने जीवाला विश्रांति प्राप्त झाली की तो शरीराला सुख व्हावे अशी इच्छाच बाळगत नाही.

१०९३ येन केन प्रकारेण जीव अंतर्मुख व्हावा एवढेच संतांचे प्रयत्न असतात. त्यानंतर जर तो बुध्या बहिर्मुख झाला तर त्यात ते लक्ष घालीत नाहीत.

१०९४ साधनाची प्राप्ति होणे यापरते दैव नाही.

१०९५ कांही प्रसंगाने संतसमागमात होणारे ज्ञान ही दैवाची पराकाष्ठा.

१०९६ जन्मांतरी संतसमागम असेल तर तो कितीही दुदैव आडवे आले तरी वैकुंठास जाईलच.

१०९७ साधनाने चैतन्याचे चैतन्याशी ऐक्य साधून तो चैतन्यरूप होईल यांत आश्चर्य काय?

१०९८ चैतन्यरूप झालेल्या जीवाने जरी बहिर्मुख परिस्थिती प्राप्त झाली तरी तसे का वागावे हेच कळत नाही.

१०९९ देवलोकांतील माणसानी अंतर्मुख होऊनच सुख घेतले पाहिजे (ती माणसे मृत्युलोकी आली तरी). नाही तर तळमळ सरणार नाही व दुर्दैव संपणार नाही.



११०० परमेश्वराने व संतांनी आपले म्हटले तरी पुरे अशी ज्याची निष्ठा तोच साधक निर्गुण सायुज्यतेला जातो.

११०१ तेच होणे ही सायुज्यता. ती स्थिति झाल्यावर पुढे काय म्हटले तर त्या आनंदात समाधानाने राहणे येवढेच शिल्लक राहते.

११०२ येथे साधन म्हणजे सायुज्यतेतील प्राप्त झालेली आनंदाची सहजावस्था होय.

११०३ अशा साधकाचे सर्व व्यवहार परमेश्वर करतो.

११०४ गुजेवीण हित कोण सांगे?

११०५ पापपुण्य संपले की पुढे साधनच.

११०६ परमार्थाची वृत्ति शरीराने वा मनाने नाही.

११०७ चैतन्याशिवाय साधन नाही.

११०८ व्यवहार चैतन्याची पूर्णता चैतन्याचे साधनाने.

११०९ चैतन्याचे व्यवहारात शरीराचे व्यवहाराची जरुरी उरत नाही.

१११० पापपुण्य शून्य होणे हाच व्यवहाराचा शेवट.

११११ साधनाची कृति देणे हेच संतांचे उपकार.

१११२ एक गावे आम्ही विठोबाचे नाम। आणिकाचे काम नाही आता।।

१११३ संताचा भोग ही त्यागाकरिताच, तर आमचा त्याग ही भोगाकरिताच असतो.

१११४ संताचा प्रपंचही परमार्थाकरिता, तर आमचा परमार्थही प्रपंचाकरिताच.

१११५ जन्मांतरीची वचने भगवान् व संतच खरी करू शकतात.

१११६ शेवटल्या जन्मांत दिलेली वचने त्याच जन्मात पुरी व्हायची असतात; कारण परत जन्म नसतो म्हणून.

१११७ ज्या ठिकाणी बसल्यावर पुनः कोणी ऊठ म्हणणार नाही ते अढळ पद संतच देऊ शकतात. ज्यांना ते मिळाले त्यांच्या भाग्यास पारावार नाही.

१११८ अढळ पदावर वृत्तिभाव स्थिर करणे हेच साधकाचे काम.

१११९ अढळपद मिळेपर्यंत मागे व पुढे नंतर तेथे वृत्तीने अढळ होऊन राहणे

हेच अखंड उरते.

११२० हंसाला मोत्याचाच चारा; त्याप्रमाणे जीवाने चैतन्यच शोधले पाहिजे.

११२१ जगांत इत:स्तत: विखरणाऱ्या वृत्ति संतांनी एका बिन्दूत आणल्यावर तीच पकड जीवाने घेणे हे तरी त्याचेच काम आहे.

११२२ जेथे गेल्यावर परत येण्याची गोष्टच नाही तेथेच आपणांस जावयाचे आहे. त्याकरिता जे जे करणे योग्य तेच केले पाहिजे.

११२३ गुरुशिष्याचे नाते सर्वात जवळचे व श्रेष्ठ.

११२४ मनुष्याने आपल्या डोळ्यासमोर एखादे ध्येय ठेवले तर त्या ध्येयपूर्ती करिता तो सर्व गोटी बाजूस सारतच तो ते ध्येय गाठत असतो.

११२५ शाळेला जाताना मुलानी वाटेत तमाशा पहात बसू नये.

११२६ सहारा वाळवंटात पाण्याचा थेंबुटा म्हणजेच साधन.

११२७ अज्ञानाने शरीरामार्फत चैतन्याशी समरस होऊन चैतन्याचा भोग घेत असताही मी जडाचाच क्षणमात्र भोग घेत आहे असे अज्ञानाने म्हणून पुन: कष्टी होण्यापेक्षा ज्ञानाने चैतन्यामार्फत चैतन्याशी समरस होऊन अखंड ब्रह्मानंद भोगणारा जीव अधिक श्रेष्ठ नव्हे का?

११२८ क्षणभंगुर सुखासाठी। काय आटी जीवाची ।
ब्रह्मानंद का न घ्यावा। कृपे जीवा प्राप्त जो।।

११२९ आपला आनंद आपल्याजवळ असता तो का दवडावा?

११३० पुढे जाऊन हानि करून घेणाऱ्या जीवाला मागे घेतल्यावर पुढे काय म्हटले तर तसेच मागे जाणे व साधनाभ्यासाने आत्मरूप चैतन्याकार होणे हेच पुढे.

११३१ मोक्ष तो आमच्या गाठवळणातच आहे असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात.

११३२ मोक्ष मिळाला तरी तो जपून टपून वापरणे हेच ज्याच्या त्याच्या अक्कल हुषारीवर अवलंबून आहे.

११३३ मुक्तीवरील गुरुभक्ती ज्यानी साधली त्याना मोक्षसुखही तुच्छ आहे.

११३४ सगळे बाणेदार पण मी ठाणेदार आहे.



११३५ बाणेदार माणसाशी वरचढपणाने वागणेतच वागणाऱ्याची हानी.

११३६ ज्याचे जे ब्रीद ते तो घालवून देणेस तयार असत नाही हेच ओळखून असावे.

११३७ आयुष्याची गम्मत व्हावी पण जम्मत होऊ नये.

११३८ जम्मत न व्हावी तर हिम्मतच धरली पाहिजे.

११३९ मोकळेपणातच ज्याचा जन्म गेला त्याला बंधनात ठेवणेही पापच.

११४० मोकळेपणांने वावरणारा आपण बंधनात न रहावे अशीच परिस्थिती निर्माण करणेचे तजविजीत असतो.

११४१ महापुरे झाडे जाती। तेथे लवाळे वाचती।।

११४२ संतांनी कृपा केली तर जीवाला तेथे कांहीच करता येत नाही. कारण ते सांगतील तसेच वागावे लागते; कारण त्याची बुद्धि तेथे कामच करीत नाही.

११४३ अनुभवाने सांप्रदायिक बंधनातच गोडी वाटते.

११४४ या झाडावरून त्या झाडावर उड्या मारून फळांच्यावर टोचा मारणाऱ्या पक्षास पिंजऱ्यात कोंडून ठेवणेही पापच.

११४५ पक्षी पिंजऱ्यात ठेवला तरी त्याची धडपड संपणार नाही.

११४६ संतांची कृपा असेल तर जीव स्थिर होतो.

११४७ पंचांगांचे ऐक्य करण्याकरिता एक कमिटी काढली पण तिने एक नवीनच पंचांग काढले.

११४८ उपाधि कमी करू जावे तो क्वचित् जास्तच होऊन बसते.

११४९ ज्या गोष्टी आपणांस रुचत नाहीत तिकडे दुर्लक्ष करणे हाच आपल्या समाधानास उत्तम उपाय.

११५० न रुचणाऱ्या गोष्टी घडू नयेत म्हणून अगदी डोक्याने उपाय लढविला तरी अपायच होणार.

११५१ दुसऱ्याने कितीही कंठशोष केला तरी ज्याचे त्यालाच कळले पाहिजे.

११५२ जीवाला पश्चात्ताप करणेचा प्रसंग परमेश्वराने आयुष्यात आणला नाही

तर ती परमेश्वराची कृपाच म्हणून त्याची जाणीव सदैव ठेवावी.

११५३ ठेच लागूनही असे काय नेहमीच होते, म्हणून वर बघत चालणे हे धारिष्टच.

११५४ परमेश्वर कोणत्याही प्रसंगानेच मनुष्यास ज्ञान देत असतो.

११५५ अनुभवाचे ज्ञानच श्रेष्ठ.

११५६ बोलणे सोपे आणि वागणे अवघड.

११५७ आपल्या माणसाजवळही चकवाचकवी करणे, अंत:करणाचा पत्ता लावू न देणे, मनात असते तेच साधणे, या गोष्टी पापमूलक होत.

११५८ कोणाशीही जितक्यास तितके असावे.

११५९ दुसऱ्याने आपल्याशी दुर्वर्तन करावे असे आपले वर्तनच नसावे.

११६० अकारण हास्य हा दोषच आहे.

११६१ मौन हीच संमति.

११६२ कोणास दुखवायचे नाही असे असले तरी वाटेल त्याकरिता वाटेल ते करावे असे नाही.

११६३ दुसऱ्याला बरे वाटते म्हणून अयोग्य वर्तन केलेस कोणासही घातकच.

११६४ आपल्या व्रतनेमाबाबत कोणाचीही भीड बाळगू नये.

११६५ सर्व जग हे सिद्धसाधकच आहे असे मला वाटते.

११६६ ज्याने आपली जमा एकदा बँकेत ठेवली त्याने फक्त योग्य वेळी तिचा उपयोग करणे येवढेच पुढे शिल्लक राहते.

११६७ जशी संचिताची जमा तसेच प्रारब्धाचे व्याज मिळते.

११६८ जेवण न करताच समाधानाने पोट भरले तर त्यास उपाशी असे म्हणताच येणार नाही.

११६९ ज्याचा परमेश्वर सहकारी झाला, त्याला तो भिकेचे डोहाळे होऊच देत नाही.

११७० मर्त्य सुख कोणीही एकमेकाला देऊ शकतात, त्याला संतांची जरुरी नाही.



११७१ जे त्रैलोक्यी नाही दान। ते करती संत सज्जन।।

११७२ मर्त्य सुखांत पडणाऱ्या जीवांना तारण्याकरिताच संतांचे अवतार

११७३ साधनाने मिळणारे सुख मात्र संतांशिवाय प्राप्त होत नाही.

११७४ संतांचे कृपेने साधनाचे सुख प्राप्त होणे हेच संताचे उपकार

११७५ साधन हीच संतांची सेवा.

११७६ तिरस्काराने, तुच्छतेने व निर्विकार मुद्रेनेही कित्येक आपत्ती टळतात.

११७७ मोहात सुख नाही व शोकात दु:ख नाही हेच खरे.

११७८ मर्त्य सुखाकरिता जर आपला जन्म नाही तर त्याचा विचार किती दिवस करावा?

११७९ नशीबाची परीक्षा कोणी वरचेवर घेऊ नये; त्याची परीक्षा घेणे म्हणजेच तोटा.

११८० त्रास भोगल्याखेरीज चांगुलपणा नाही.

११८१ सज्जन माणसे कोणास वाईटपणा देत नाहीत.

११८२ दुर्जनांचे पायांतही कोणास वाईटपणा न यावा म्हणून तळमळणारा जीव असल्यामुळे कोणास वाईटपणा येईल असे खास वागणार नाही.

११८३ झाडाखाली झाड वाढत नाही असे म्हणतात.

११८४ झाडाची खच्ची करणे हे काही वेळा फायद्याचे व तोट्याचेही असते.

११८५ झाडाच्या पानावर झारीने पाणी घातले तरी ते प्रफुल्लित होते मग त्याच्या मुळांत पाणी सोडल्यास ते टवटवीत होईल यांत नवल ते काय?

११८६ म्हशीची शिंगे म्हशीस जड होत नाहीत असे म्हणतात.

११८७ प्रेम करणेसारखी वस्तू एक आत्माच.

११८८ कोणाचे कोणाशिवाय अडत नाही हे खरे, पण प्राणावाचून सर्वांचेच अडते.

११८९ परमेश्वराजवळ जे मागितलेले असते तेच तो देत असतो.

११९० कोणतीही प्राप्त परिस्थिति असो, साधनाशिवाय जीवाला खरेखुरे सुख नाही हेच परमेश्वराला दाखवायचे असते.

११९१ साधनाशिवाय सुख नाही हे दाखविणे करिताच संतांचे अवतार असतात.
११९२ संतांचे कृपेने नशीबही थोडे फार हलके होते, ते केवळ साधन साधावे म्हणून व तेवढ्या अवधीतच साधन जोमाने करणे उत्तम असते.
११९३ जपी, तपी, संन्याशी, हटी, जोगी, वैरागी, गृहस्थाश्रमी कोणीही असो त्याने यातच यावयास पाहिजे.
११९४ कोणत्याही उपायाने संत व परमेश्वर जीवाला साधनांत आणतात. एक उपाय थकला तर दुसरा योजावा लागतो.
११९५ नशीब कोणालाच सुटले नाही व ते चुकविताही येत नाही म्हणून त्याची परीक्षा घेऊ नये.
११९६ संचितासारखी इच्छा व इच्छेसारखे नशीब, तेथे परमेश्वराजवळ तक्रारीला जागा नाही.
११९७ झाले ते झाले त्यात बदल होत नाही, म्हणून परमेश्वराची इच्छा व आज्ञा न मोडता, दुसराही विचार मनाला शिवू न देणे उत्तम.
११९८ जगांत कोठेही प्राप्त न होणारे साधन लाभले यापरती पूर्व पुण्याई आता कोठे शोधावी?
११९९ जीवाला शांति देण्याचे सामर्थ्य एका साधनात आहे, याचा अनुभव तरी घ्यावा.
१२०० साधनाची हेळसांड केल्याने केवळ संतांची कृपा म्हणूनच हा जन्म आला, तेथे तरी महाराजांनी पुन्हा सर्व तऱ्हेने जागृति दिल्याने हेळसांड न व्हावी.
१२०१ नामा म्हणे जरी हे लटके । तरी छेदावे मस्तक ।।
१२०२ साधन साधले तर हाच अखेरचा जन्म.
१२०३ जन्मभर अनेक जन्मी केलेली कटकट करणेपेक्षा साधनाने पुन्हा जन्मास न येणे उत्तम.
१२०४ करविली तैशी केली कटकट। वाकडी की नीट देव जाणे।।
१२०५ ''तुका म्हणे एका मरणेची सरे। उत्तम ते उरे कीर्ती मागे'', अशी वागणूक ठेवावी.
१२०६ सहनशीलपणा हा सर्वात मोठा गुण आहे.
१२०७ असूनही रड, नसूनही रड, म्हणजे आनंदाची स्थिति या पलीकडे असली पाहिजे.
१२०८ अनुभवाने मनुष्याचे विचार बदलतात व त्याप्रमाणेच त्याचे आचार व उच्चार घडतात.
१२०९ पावट्या एवढ्या घड्याळाच्या आकारापासून मोठ्या घड्याळापर्यंत मशीनरी एकच.
१२१० उत्क्रांतिवाद हा असा आहे की मनुष्याचे जीवन क्रमशः उच्च तत्त्वाप्रत जाऊन पोहोचते.
१२११ शरीराच्या गरजा मनुष्य जन्मभर भागवत बसेल, तर त्याला जीवाचे सार्थक करताच येणार नाही.
१२१२ जीवाच्या गरजा आध्यात्मिक स्वरूपाच्या असल्याने त्याशिवाय जीवाला शांति नाही.
१२१३ मेल्यावर तरी दृश्याचा त्याग होतोच, मग तो आधीच करून सुखी का न व्हावे?
१२१४ कित्येक वेळा मनुष्य पाहतो एकीकडे पण त्याचे लक्ष मात्र तेथे नसते.
१२१५ पाहण्यास अवसर मिळाला की जेथे लक्ष तेथेच डोळे जातात.
१२१६ वृत्तीच्या व शरीराच्या हालचाली एक होणे हाच परमार्थ.
१२१७ कित्येक वेळा वृत्तीच्या व शरीराच्या हालचालीत फरक पडतो. त्यांत कित्येक वेळा वृत्ती विजयी होते तर कित्येक वेळा शरीर विजयी होते.
१२१८ शरीराच्या हालचालीवरून वृत्तीचा अंदाज होतो.
१२१९ नाईलाजाने केलेली कोणतीही गोष्ट आपणांस व दुसऱ्यास तापदायक होते.
१२२० वृत्तीलाच वृत्तीचे ज्ञान होते.
१२२१ वृत्ति स्थिर झाली असतांही शरीराच्या हालचाली वेगळ्या होऊ लागल्या

की वृत्तीत कोणत्या कारणाने का होईना पण अस्थिरपणा आला आहे, हे निश्चित समजावे.

१२२२ ''एका काली गातो एका काली ध्यातो'' अशी अवस्था असता दुसरीकडे पाहतानाही देवाकडेच लक्ष अशी अवस्था असणाऱ्या जीवाचे देवाकडे पाहतानाही तेथे लक्ष नसावे हे आश्चर्य आहे व तेच दुर्दैव आहे.

१२२३ मनुष्याला जे ज्या काळी प्रिय, ते तो त्याकाळी कोणत्याही स्थितीत साधतो; म्हणून त्याचा विचार निदान सुज्ञांनी तरी करू नये.

१२२४ अनुभवाने मनुष्य शहाणा होतो.

१२२५ जे सांगितले ते करावयाचे, पण त्यातही आपल्याला जे साधावयाचे असेल ते साधायचे असा अनुभव जगांत विरळ.

१२२६ आपण जगाकडे पाहिले नाही तर जग आपणाकडे पाहणार नाही.

१२२७ आपण देवाकडे पाहिले नाही तर तो तरी आपणाकडे काय म्हणून पाहील?

१२२८ जगाशी सरळ व देवाशी वाकडे ही आमची भक्ति आम्हाला कशी तारील?

१२२९ जगाचा विपरीत अनुभव आलेला मनुष्य पुनः तेच पाहण्याची इच्छा करणार नाही, पण त्यात ही आमचा विनोद.

१२३० देवलोकांतील जीव मनुष्यलोकांत पाहणेची इच्छा करीत नाहीत.

१२३१ मी कोठे पाहतो, जग पाहते, म्हणणेत अर्थ नाही.

१२३२ जे डोळ्यासमोर येईल ते दिसते म्हणणारा परमार्थात नालायक.

१२३३ व्यवहारी व परमार्थी मनुष्य रस्त्याने चालला तर व्यवहारी मनुष्याला सर्व दृश्य दिसेल पण परमार्थी मनुष्याला इच्छित स्थळ व वस्तूच दिसेल.

१२३४ परमार्थी जीवाची प्रपंचात तारांबळ.

१२३५ प्रपंच हा परमार्थाचा रस्ताच आहे.

१२३६ भोगी व त्यागी हे दोघे प्रंपचीच.

१२३७ श्रीकृष्ण हा भोगीही नव्हता व त्यागीही नव्हता.



१२३८ ज्याचे भोगाने कर्माचा त्याग होतो व ज्याचे त्यागाने सर्वाचा भोग होतो तोच कृष्ण.

१२३९ भोग आणि त्याग हेच पाप पुण्य (दृश्याचा).

१२४० त्यागानेच भोगाची किंमत.

१२४१ आजी संसार सुफळ झाला गे माये। देखियेले पाय विठोबाचे।।

१२४२ फळले भाग्य माझे धन्य झालो संसारी।

१२४३ सद्‌गुरू भेटले हो त्यांनी धरीयेले करी।।

१२४४ परमेश्वर जितका दयाळू तितकाच जीवाचे हित करणेचे दृष्टीने न्यायी व निष्ठुर आहे.

१२४५ संताचे जवळ काही लपवून चालत नाही.

१२४६ चैतन्याजवळ झालेल्या गोष्टी उघड होतात.

१२४७ अनुभव हाच बोध.

१२४८ एखादी उत्तम गोष्ट; पण ती महाराजांना नको वाटली तर ते ती बाजूला करतात किंवा तिची बाधा होऊ देत नाहीत.

१२४९ बोलावून कोणीही येईल व सांगून कोणीही वागेल; आतील वृत्तीचेच महात्म्य.

१२५० वेळ जाते व शब्द राहतो.

१२५१ वेळ गेल्यावर लाख तऱ्हा करूनही निरुपयोगी.

१२५२ वरातीमागून घोडे काय कामाचे?

१२५३ साधनांत सर्व काही आहे. फार काय प्रपंचाचे सुखही त्यांत आहे.

१२५४ साधन हाच कल्पवृक्ष. त्यांत स्वसंवेद्य अशा सर्व सुखाची प्राप्ति बसल्या ठिकाणीच होते.

१२५५ मोह व शोक नको.

१२५६ एखाद्याने आपल्याकरिता जीव टाकला तरी त्याचे करिता एखादी गोष्टही स्वतःचे बुद्धीने आपणांस करता येऊ नये यापरते दुर्दैव नाही.

१२५७ संताचे प्रेम हे निरपेक्ष असल्याने ते सदैव कृपाळूच असतात; पण आपले

कर्मच आपणास थोडे फार बाधक होते.

१२५८ काम क्रोध आम्ही वाहिले विठ्ठली। आवडी धरिली पायासवे ।।१।।
आता कोण पाहे मागे परतोनी। गेला हारपोनी देहभाव ।।२।।
रिद्धि सिद्धि सुखे हाणीतल्या लाथा। तेथे या प्राकृता कोण मानी ।।३।।
तुका म्हणे आम्ही विठोबाचे दास। करुनी ठेला ग्रास ब्रह्मांडाचा ।।४।।

१२५९ पारमार्थिक ध्येय बिन्दु एकदा ज्याने गाठला त्याचे उर्वरित आयुष्य इस्पिटाने खेळणे अगर हवा खात जाणे पैकीच आहे हे निश्चित.

१२६० तुका म्हणे आता। उरलो उपकारा पुरता।।

१२६१ हातावरी हात मारुनी जातो तुका।। परि कोणास एका उमजेना।।

१२६२ देऊनि साकी बाकी तुका झाला मार्गी।।

१२६३ तुका म्हणे आम्ही जिंकिला संसार। होऊनी किंकर विठोबाचे।।

१२६४ विठोबाची वेडी आम्हा आनंद सदा। गाऊ नाचू टाळी वाजवू गोविंदा।।

१२६५ जगांत सर्व काही चांगलेच दिसणे यातच जीवाचे मोठेपण आहे.

१२६६ संतांजवळ गुण व अवगुण नाहीत.

१२६७ रिकाम्या भांड्यातच भगवंताची वस्ती.

१२६८ महाराजांची कीर्ति जगभर व्हावी हीच इच्छा.

१२६९ निंदा करणाराच मला स्तुतिपाठकापेक्षा अधिक प्रिय.

१२७० संकल्प विकल्पाचा विटाळ महाराज होऊच देत नाहीत, काय करावे?

१२७१ संकल्प विकल्पाचा अभाव म्हणजे जगाची ठोकर.

१२७२ परमेश्वरा, पांडूरंगा, बघ बाबा आता; काय मनात असेल ते कर.

१२७३ महाराजांनी कृपा करावी असे माझे त्यानी कोणते गुण पाहिले हेच कळत नाही.

१२७४ माझेजवळ काही नाही हे तर उघड आहे पण महाराजांनी कृपा केली हे मात्र नाही म्हणता येणार नाही.

१२७५ महाराजांचे मनांत आले हेच खरे.

१२७६ माझे आयुष्य महाराजांचे हाती असल्याने आयुष्याचा गुंताडा सोडविण्याचेही माझे हाती नाही.



१२७७ पुष्कळ विचार केला, पण माझे हाती काहीच नाही, हेच महाराजांनी पटवून दिल्याने, आता काहीच माझ्या अंतःकरणात येत नाही.

१२७८ माझे हातून काही घडले अगर घडले नाही तरी महाराजांचे स्मरण हेच माझे सर्वस्व असे व्हावे एवढेच वाटते.

१२७९ बाजूला राहिले तर स्मरण पण काही शिलकीलाच नाही तर स्मरण तरी कसे करावे?

१२८० जमाखर्च शून्य झाले की बाकी काही उरत नाही.

१२८१ खजिन्यातील शिल्लक शून्य होणे व सर्व हिशोब बंद होणे या अवस्थेलाच परमार्थात स्मरण म्हणतात.

१२८२ स्मरणातून हिशेबांत आले की जमाखर्चाचे चलन सुरू झालेच असे समजावे.

१२८३ स्मरण ते की ज्याचे ठिकाणी विस्मरणाचे वारे वाहते पण ज्यांत विस्मरण नाही?

१२८४ ज्याचे ठिकाणी ज्याचे अधिष्ठानावर भोग व त्याग घडतो पण जो दोन्हीतही नाही हे कोणाही जीवाला कबूल करणे भाग आहे ,तोच श्रीकृष्ण.

१२८५ जो जना मध्ये वागे। परी जना वेगळी गोष्टी सांगे।
ज्याचे अंतरी ज्ञान जागे। तोची साधू।।

१२८६ जो आत निवाला, तो जग काय म्हणते, याची पंचाईत करीत नाही. जगाला पाहिल्याने व जगाचे सर्व ऐकून घेतल्यानेच जग म्हणजे काय ते कळते.

१२८७ सर्वांचे सर्व जाणून असावे; पण आपली ओळख कोणास देऊ नये.

१२८८ आपली ओळख कोणास न देणे हाच परमार्थ.

१२८९ ओळख नाही तोपर्यंतच व्यवहार.

१२९० ओळख संपली की व्यवहार संपला.

१२९१ व्यवहार संपले म्हणजेच जीवनाचे जीवनांत विचरण.

१२९२ जीवनाचे जीवनांत होणारे विचरण म्हणजेच परमार्थ.
१२९३ दोषांतून गुण प्रगट होतात.
१२९४ ज्या गुणावगुणांची जीव प्रशंसा व अवहेलना करतो त्याची उत्पत्तीच दोषातून, म्हणून संत त्या दोषांचाही विचार करीत नाहीत.
१२९५ बऱ्याने वाईट व वाईटाने बरे नाहीसे होते.
१२९६ पुण्य करता होय पाप.
१२९७ पुण्य झाकण्याकरीता पाप व पाप झाकण्याकरीता पुण्य.
१२९८ पिंड ब्रह्मांड म्हणजेच पाप पुण्य.
१२९९ पिंड ब्रह्मांडात्मक धारणेचे दोन प्रवाह उभा छेद घेऊन मध्य बिंदूत केंद्रित होऊन एका रेषेत गतिमान् झाले की पाप पुण्य बाजूस होते व जीवनांत जीवन मिसळणेची हातोटी साधते.
१३०० जीवनात जीवन मिसळणे हाच परमार्थ.
१३०१ हे तो सोडील्या न सुटे। प्रेमतंतू तो न तुटे।
१३०२ बरे वाईट, पाप पुण्य बाजूस होणे हीच कृपा.
१३०३ संतांची ओळख हीच परमार्थाची किल्ली.
१३०४ व्यवहारात होणाऱ्या ओळखीचे ज्ञानही अपुरे, म्हणून जमाखर्चाची ओढाताण आणि पापपुण्यात्मक व्यवहार.
१३०५ व्यवहारातील ओळख म्हणजेच अज्ञान.
१३०६ उपाधि संपून व्यवहाराची ओळख संपली तरच निरुपाधिक संतांचे दर्शन.
१३०७ शुद्ध पुण्य म्हणजेच चैतन्य.
१३०८ वायूच्या उभ्या आडव्या गतीचा उदयास्त ज्या बिंदूवर घडतो तेथे दृष्टी जाणे हेच संतांचे दर्शन.
१३०९ निरुपाधिक संतांचे दर्शनानेच जीव शिवाचा व्यवहार.
१३१० बुद्धीने दृष्टिद्वारा चैतन्याचे ग्रहण हीच परमार्थाची कसोटी.
१३११ जडावरही चैतन्याचा आविष्कार साक्षात्कारास येणे हेच परमार्थाचे पूर्णत्व.
१३१२ सज्जनांचा राग म्हणजे पाण्याचा झरा असे एका साधूचे वचन आहे.



१३१३ आपण चुकत नाही असे निश्चित आपणास वाटत असेल तर तसे खुशाल वागण्यास हरकत नाही.
१३१४ हजार वेळा सांगूनही एखादा मनुष्य ऐकत नसेल, तर त्याचेवर रागावणेत हशील नाही; कारण तो हशावारी व चेष्टेवारीच नेतो.
१३१५ पुनःपुनः सांगणे निर्लज्जपणाचेच ठरेल.
१३१६ कित्येक वेळा उपायानेच अपाय होतो.
१३१७ कित्येक वेळा अपाय हाच उपाय ठरतो.
१३१८ अपायानेच उपाय होणार असेल तर त्या अपायाची चिंता न केलेलीच बरी.
१३१९ नुसता आपल्यालाच शीण होणार असेल व त्याचे कोणालाही काही नसेल तर शीण करून काय उपयोग?
१३२० ज्याचे त्याला ज्ञान असतेच.
१३२१ स्वतःला जो तो जबाबदार असतोच.
१३२२ कोणाच्या तोंडास हात लावता येत नाही.
१३२३ ज्याची त्यालाच थोडी तरी काळजी पाहिजेच.
१३२४ ह्यात काय होते म्हणणाऱ्याचाच नाश.
१३२५ उगाच ओझी वाहून कुथणारा फुकट मरायचा.
१३२६ आपले दिवे आपणच ओवाळून घेण्यात अर्थ नाही.
१३२७ आपणांस योग्य वाटते तसेच वर्तावे.
१३२८ दुसऱ्याच्या अकलेने चालले की आपलीच फसगत व्हायची.
१३२९ दुसऱ्याला सांगत बसण्यापेक्षा आपणच तसे वागावे.
१३३० दुसऱ्यावर रागावण्यात अर्थ नाही.
१३३१ दुसऱ्यास दंड शिक्षा करण्यापेक्षा ती आपणच घ्यावी हेच उत्तम.
१३३२ आत्म्याचीच प्रार्थना व उपासना केली तर दुसऱ्यास विनंती करणेचा प्रसंग येणारच नाही.
१३३३ नको रे नको नको रे देवा ही कुटुंब सेवा.

१३३४ आपल्या वागण्यावरूनच लोकांनी बोध घ्यावा.
१३३५ ज्याला जे पटेल तेच खरे.
१३३६ खरे, खोटे हा सांगण्याचा विषय नाही.
१३३७ दुसऱ्याची पारख करत काळ दवडण्यापेक्षा आपण आपल्यालाच ओळखून असावे.
१३३८ आपले आपणच विश्वासास पात्र व्हावे.
१३३९ आपुली आपण करा सोडवणं। संसार बंधन तोडा वेगी।।
१३४० अपेक्षेअंतीच सुख दुःख
१३४१ आपण आपल्याला कंटाळलो नाही तरी पुरे.
१३४२ आपली आपणास ग्वाही असली तरी बस.
१३४३ आपले आपण हेच खरे.
१३४४ शेवाळे बाजूला सारूनच पाणी प्याले पाहिजे.
१३४५ आपण आपल्यास पाहणे हाच मोक्ष.
१३४६ ''मी'' हाच महामंत्र आहे
१३४७ ''मी'' चा शोध हीच तत्त्वज्ञानाची गुरुकिल्ली.
१३४८ आपले आपण खंबीर असलो म्हणजे कोणाकडून सेवा घेण्याचा प्रसंगच येणार नाही.
१३४९ नीच सेवा हीच नीच वृत्ती.
१३५० आपला विषय आपणच होणे हीच निर्विकल्प स्थिति.
१३५१ खरा आनंद आपल्यातच आहे.
१३५२ दुसऱ्याची नसली तरी स्वतःची स्वतःला तरी खात्री असावी.
१३५३ आपले आपणच मित्र आणि शत्रू.
१३५४ आपल्यावरच राग लोभ धरावा; म्हणजे दोषही नाही, गुणही नाही.
१३५५ प्रकाश (आत्मा) पहात केलेले काम यशस्वी होतेच.
१३५६ साधनांत दिसणारा प्रकाश हाच आत्मा.
१३५७ उदंड झाले सर्वे जो तो बुद्धीच सांगतो।



१३५८ सांगावे ते आपणाला आपणू करता बरे।।
१३५९ ज्याचे त्यावर टाकून द्यावे.
१३६० स्वानंद साम्राज्याचे अधिपती तेच संत.
१३६१ आपण जेथे बसू तेथेच आनंद आहे.
१३६२ आपण सर्व व सर्वात आपण हीच व्यष्टी समष्टी होय.
१३६३ कर्ता रामची मानुनी वर्तावे.
१३६४ राम कर्ता.
१३६५ भक्तिभावाचे धन पदरी असले की सुखाला तोटा नाही.
१३६६ झोळीला गाठी बांधून मधुकरी कशी चुकणार?
१३६७ विषयाचे गोड का करीसी कोड। होईल तुज जोड इंद्रिय बाधा।।
१३६८ साध्य तेच साधन, साधन तेच साध्य, हाच परमार्थ.
१३६९ ज्याचा राग येतो ते पाहूच नये.
१३७० निळ्या रंगाचे जग दिसावे, तर जगाला रंग फासण्यापेक्षा आपणच निळा चष्मा घालावा.
१३७१ आपल्याकरिताच जग आहे.
१३७२ आमच्याकरिताच विषय आहेत पण विषयाकरिता आपण नाही हे निश्चित समजावे.
१३७३ खाण्याकरिता जगू नकोस, तर जगण्याकरिता खा, असे एका साधूचे वचन आहे.
१३७४ रामजी बुवा एकादस कवा, दाणं नसतील तवा, असे श्रीतात्यासाहेबमहाराज म्हणत.
१३७५ नारायण नाम हीच परमार्थातील जादू आहे.
१३७६ भुकेलेल्याच अन्नाचे व तहानलेल्याच पाण्याचे महत्त्व.
१३७७ पेशंट आहे म्हणून दवाखान्याची जरूरी; तद्वतच त्रिविध तापाने पोळणाऱ्या जीवांनाच परमार्थाची जरूरी.
१३७८ ज्याला कैदखानाच बरा वाटतो त्याला मुक्ततेची काय जरुरी?

१३७९ नामाचा प्रेमाने उच्चार हीच भक्ती.

१३८० कुठेही गेलो तरी मीच आहे.

१३८१ वर्तमान भूत भविष्यकाळी मी एकच आहे माझ्यात फरक नाही.

१३८२ मी वरच जगाचा व्यवहार.

१३८३ मी तच ज्ञान सत्ता व आनंद आहे.

१३८४ मीच जग, कारण जगांत मीच आहे.

१३८५ आत जाणारा व बाहेर येणारा मीच कोणी निराळा नाही.

१३८६ तुम्ही ऐकता, म्हणून मी सांगतो म्हणणेत अभिमान नाही.

१३८७ माझा मीच भोक्ता आहे.

१३८८ मीच सर्व म्हटले की अहंकाराला स्थानच नाही.

१३८९ तू तो मी गा मी तो तू गा । अज्ञान बापुडी नेणती पैगा।।

१३९० आपले ऐकतील तेच आपले.

१३९१ आपल्याच ठिकाणी ज्ञान व अज्ञानावर पदार्थाचे अस्तित्व.

१३९२ मला माझे ज्ञान आहे म्हणून मी आहे हे सिद्ध करणेची आवश्यकता नाही.

१३९३ मीच साक्षी व चैतन्य आहे म्हणून मीचाच पडसाद सर्वत्र उमटून एकमेकाला ओळख पटली.

१३९४ मी आहे व तू नाहीसच व जर कोणी असलासच तर मीच.

१३९५ तो हा विठ्ठल बरवा।

१३९६ मी तू पण गेले हरिचे ठायी।।

१३९७ एनर्जी अदृश्य असली तरी मॅटर दृश्य असते.

१३९८ प्रथम पुरुषाचे यथार्थ ज्ञान झाले की द्वितीय पुरुषाचे खरे स्वरूप कळते व त्या दोहोची सांगड साधली की तृतीय पुरुषांत उपरिनिर्दिष्ट दोहोंचा अंतर्भाव होऊन मी तू पण गेले हरिचे ठायी अशी अवस्था होते.

१३९९ प्रथम पुरुषाचे सर्वव्यापित्व म्हणजेच लय व त्याचा लय म्हणजेच तृतीय पुरुष; कारण तेथे ''मी'' या शब्दाला अर्थ रहात नाही कारण द्वैत नाही म्हणून.



१४०० अरे म्हटले की का रे व तू म्हटले तर मी

१४०१ वस्तूते ओळखा सांडा रे कल्पना।

१४०२ मी चा शोध म्हणजेच अहंकाराचा निरास

१४०३ जव या वायुचा प्रकाशु। तव या भांडियाचा विश्वासु।।
वायो निघोनीया गेला। तव तो झाला उदासू रया।।

१४०४ नमामि नारायणपादपंकजं। करोमि नारायणपूजनं सदा।
वदामि नारायणनाम निर्मलं। वदामि नारायणबोधरूपं।

१४०५ हरि नारायण दुरित निवारण परमानंद सदाशिव शंकर।
भक्त जन प्रिय पंकजलोचन। नारायण तव दासो हं।

१४०६ नारायण नारायण नारायण नारायण.

१४०७ कोणाचेही प्रयत्न सुखाकरिताच; मग त्याच्या आड का जावे.

१४०८ आपल्यामुळे कोणास सुख झाले नाही तरी दुःख तरी नको.

१४०९ घरातले बाहेर फेकण्याइतके जरी आपण तुकाराम महाराज नसलो तरी पराभिलाष तरी नको.

१४१० हरी ठेविल तैसे रहावे । स्वस्थ असावे हेच खरे.

१४११ आपल्याजवळ सद्‌गुण नसले तरी दुर्गुण न शिरतील एवढी तरी खबरदारी घ्यावी.

१४१२ श्रीमंती नसली तरी भीक मागणेचा प्रसंग नको.

१४१३ दारिद्य्र मरण यातुनी मरण बरे बा दरिद्रता खोटी।
मरणांत दुःख थोडे दारिद्य्रात व्यथा असे मोठी।।

१४१४ कोणीही आपल्या पायापुरती वहाण कापणारच.

१४१५ आपल्या भातावर वरण ओढणारेच सर्व, न ओढणारा क्वचित्.

१४१६ तळे राखील तो पाणी चाखील.

१४१७ एकमेकाची भीति एकमेकांना परमेश्वराने ठेवली आहे; नाही तर काय झाले असते कोणास ठाऊक?

१४१८ देवळांत जाऊन देवाची विचारपूस न करणारेच सगळे.

१४१९ कोणालाच न खुपेल असे आपले वागणे असावे.

१४२० आपण खरे असलो, तर कोण काय म्हणेल याचा विचार करणेइतका मूर्खपणाच नाही.

१४२१ आनंद बाहेर फेकावा तसा तो वाढतो व दुःख बाहेर फेकावे तसे ते हलके होते.

१४२२ एनर्जी साठवावी तशी वाढते.

१४२३ आपले अंतःकरण मोकळे राहील, तरच परमेश्वर तेथे वास करतो.

१४२४ रिकामा अर्ध घडी राहू नको.

१४२५ पोस्टमन हिंडून पैसे मिळवतो म्हणून आपण रिकामटेकडे त्याच्या बरोबर हिंडलो तर आपणास कोणी पगार देणार नाही.

१४२६ अंथरूण पाहूनच पाय पसरावे.

१४२७ आपल्या खात्याला जमा असेल त्यानेच खर्च करावा म्हणजे कर्ज बाजारी होऊन दुसऱ्याचे पाय धरणेची पाळी येणार नाही.

१४२८ ऋण काढून सण नको.

१४२९ अजीर्णाने औषध घेण्यापेक्षा अर्धपोटी राहिलेले काय वाईट?

१४३० विषाचा उपयोग अमृतासारखा झाला तर त्याला अमृत म्हणणेत कोणती अडचण आहे?

१४३१ महाराजांची कृपा ही सूर्यप्रकाशासारखीच असल्याने तेथे संशयास थाराच नाही.

१४३२ ज्याचा प्रवास संपला त्याने कोठेही टेकावे.

१४३३ तुका म्हणे मज अवघ्याचा कंटाळा।तू एक गोपाळा आवडसी।।

१४३४ शेळीचे कान गोसाव्याचे हाती.

१४३५ ''तूचि माझे प्रेम सुख । तूचि माझे निरसी दुःख । तुजविणे देख । नावडीचे दुसरे,'' असे ज्याचे झाले तोच साधकोत्तम.

१४३६ आपल्या जवळ काय आहे हे कोणांस कळू नये, अशीच थोरांची नेहमी वागणूक असते.



१४३७ सगळ्यांत मी आहे ही भक्ति.

१४३८ सगळ्यांत मी आहे आणि नाही - वैराग्य.

१४३९ माझ्यात सगळे आहे - ज्ञान

१४४० एकात सगळे व सगळ्यात एक व सगळे एक अशा पदार्थाच्या तीन भूमिका आहेत.

१४४१ गाडीतून स्टेशनवर उतरलेल्या प्रवाशाने पुढे काय? म्हटले तर घरी जाणे हेच पुढे.

१४४२ जीवनांत जीवन मिळाल्यावर प्राप्त झालेला आनंद साधनाने अखंड टिकवणे हेच साधकाचे काम आहे.

१४४३ अंगणी जाते चोरुन खाते। राहते माजघरी। तिहीस हसते। चौथीस रुसते केवढी नवल परी।।, अशी परमार्थाची रीत आहे.

१४४४ तया दर्शने स्पर्शने पुण्य जोडे। तया भाषणे नष्ट संदेह मोडे।।, हा अनुभव जेथे येईल तोच संत.

१४४५ आपला ठेका चालविणे हे परमार्थास बाधक.

१४४६ ज्याने आपले असे काही ठेवलेच नाही तोच परमार्थी.

१४४७ ज्याने आपले असे काही ठेवले आहे तोच प्रपंची.

१४४८ हसणाऱ्यांना सुखाने हसू द्यावे; यातच शाहणपण आहे.

१४४९ ज्याचे जगात कांही नाही तोच देवाचा होतो.

१४५० ज्याने येथपर्यंत आणले तोच कडेला पोचवीलच.

१४५१ ज्या अर्थी जन्म झाला त्या अर्थी आता मेलेच पाहिजे.

१४५२ प्रत्येकाचा शेर प्रत्येकाबरोबरच आहे.

१४५३ आत्म्याची चिंता आपण केली तरच आत्मा आपली चिंता करतो.

१४५४ आत्म्याचे ध्यान करणेनेच आत्मा प्रसन्न होतो.

१४५५ नामच्या चिंतेने बारा वाटा पळती विघ्ने, हेच खरे.

१४५६ अवसान गेले की सगळेच गेले असे समजावे.

१४५७ अमोलिक वस्तू ठेवणेकरीता परमेश्वराने अशी एक पेटी दिली आहे की ती वस्तू चोरालाही चोरून नेता येणार नाही.
१४५८ ''क्ष'' किरणाने तिजोरीतल्या पदार्थाचेही ज्ञाने होते.
१४५९ आता हेचि काम करू। संत पाऊले ह्दयी धरू।।
१४६० सोहंभाव मुकुंदरायी। भरला निज गुरु सर्व ठायी.
१४६१ धीमेपणासारखा सर्वश्रेष्ठ गुणच नाही.
१४६२ कोठे ही विरोधक असायचेच.
१४६३ निरोधानेच ध्येयाची सिद्धी।
१४६४ भावे विण भक्ति भक्ति वीण मुक्ती। बळेवीण शक्ती बोलू नये।
१४६५ आपण वाऱ्यासारखे असावे, वर्तावे, बोलावे, तरच आयुष्यात मौज आहे.
१४६६ वारा हाच परमेश्वर.
१४६७ वाऱ्याच्या दर्शनाकरीता वाऱ्याचीच जरुरी.
१४६८ पंढरीचे वारकरी ते अधिकारी मोक्षाचे.
१४६९ श्रीगुरुलिंगगीतेचा जयजयकार असो.
१४७० नामाविण जन्म नरकचि पै जाण। यमाचा पाहुणा प्राणी होय.
१४७१ नामाविण माझी वाचा अमंगळ
१४७२ तुका म्हणे माझी जळोजळो काया । विठ्ठल सखया वाचे विणा ।
१४७३ सर्वाचे वागणे मला उपकारकच असल्याने, ते प्रेमाचे किंवा विरोधी असले तरी सर्वाचेबद्दल मला आदरच वाटतो.
१४७४ ऐसे स्थळ आहे कोठे। तुकयाला विठ्ठल भेटे।।
१४७५ संत हे वाऱ्यासारखे असतात.
१४७६ वाऱ्याची मौज जगापेक्षा निराळी.
१४७७ देवा, तुझा खेळ होतो, पण आमचा जीव जातो, याला काय करावे?
१४७८ सर्व सुखसोयी परमेश्वराने करून दिल्या असता गैरसोय का?
१४७९ सरळ घास तोंडात जात असताना वाकडेपणाने जीवाला प्राणायाम करण्याची पाळी येते.



१४८० अहिंसेच्या नावावर शिकार करणे ही जगाची रीतच आहे.
१४८१ सहस्रामध्ये एक निवडे तो शूर। गाजवी तरवार बरे होते. श्रीसंत तुकाराममहाराज
१४८२ काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, मोह यांपासून सावध रहावे. त्यांच्या सरहद्दीवर जरी कोणी गेला की त्यांनी त्याला कापलेच म्हणून समजावे.
१४८३ हिंसा करून अहिंसेने राहणारे महात्मेच होत.
१४८४ आपण कोणाकडे गेलो तर त्याची गाठ पडल्यापासून तो वेळ मोजणार. तद्‌वतच संतांचे दर्शनांनतरच पारमार्थिक दृष्ट्या आयुष्याचे मोजमाप होते.
१४८५ देवाचे दारांत जाऊन प्रहर न् प्रहर गेला तरी देव दर्शन झाले नाही तर वारी आणि श्रम फुकटच.
१४८६ एका द्वाराने आंत जाऊन दुसऱ्या द्‌वाराने बाहेर आला तरी तो प्राणी एकच; तद्‌वतच हरिहरांचे स्वरूप आहे.
१४८७ वांकडेच होते म्हणून वाकडे, व सरळ असून निरुपयोगी म्हणून वांकडे, या दोहोंचा हिशोब एकच.
१४८८ शरीराचा आणि परमार्थाचा संबंधच नाही.
१४८९ काढोनी डोईचा शेला लोळविला। असेल आपुला येईल कोणी।।

संत तुकाराम.

१४९० ज्याचे जया ध्यान। तेचि त्याचे होय मन।।
१४९१ ज्यासी विषयाचे ध्यान। त्यासी कैसा नारायण।।१।।
काय पतितासी पिता। कैची अधमासी गीता।।२।।
साधू कैचा पापियासी। कैची चांडाळाशी काशी।।३।।
तुका म्हणे निरंजनी। शठ कैचा ब्रह्मज्ञानी।।४।।
१४९२ झाली जमा बँकेत ठेवली की त्याचे जन्मभर व्याज तरी मिळतेच.
१४९३ झालेली जमा घरी आणली तर श्रीमंती दिसेल पण त्याला व्याज नाही.
१४९४ जसा अंतःकरणाचा छाप असेल तसा फोटो उठतो.

१४९५ आपलाच फोटो पाहताना कोणास वाईट वाटेल?

१४९६ प्रपंची मनुष्य आपला फोटो मर्यादित स्वरूपांत व अज्ञानाने पाहतो व परमार्थी मनुष्य विशाल ज्ञानाने आपला फोटो अमर्याद स्वरूपात पाहतो.

१४९७ आपण आपल्याला पाहतो तोच मुक्त होतो. प्रपंच आणि परमार्थ याची पूर्णता यातच आहे.

१४९८ दुखण्याचे निदान लागल्याने औषधाची अगर डॉक्टरची जरुरीच लागली नाही, परमेश्वरकृपेनेच गुण आला.

१४९९ वैद्य लाभला सुखदाता। रोग पालट झाला आता।।

१५०० पेशंटची नाडी हाती आल्यावर औषधाची व अनुपानाची योजना करणेस डॉक्टरास वेळ लागत नाही.

१५०१ भक्ताचे सर्व मनोरथ अपेक्षेच्या आतच परमेश्वर पुरे करतो.

१५०२ सद्‌गुरु व परमेश्वर भक्ताला निरिच्छ करतात.

१५०३ अपेक्षा नसताही महाराजांनी सर्व गोष्टी माझ्या मनासारख्याच केल्या आहेत.

१५०४ ज्याला कृपेने दिव्य दृष्टि प्राप्त झाली त्याला क्ष किरणावाचूनही बसल्या ठिकाणी सर्व ज्ञान होते; फार काय तो मनातील हालचालीही ओळखू शकतो.

१५०५ वस्तूची प्राप्ति झाल्यावर तिचा सदुपयोग करावा की दुरुपयोग करावा हे आपल्या हाती आहे.

१५०६ वस्तूचा दुरुपयोग झाल्यास ती नाहीशी होते किंवा आपल्यापासून निघून जाते; मग त्याचा काय उपयोग?

१५०७ शरीर, मन, चित्त व बुद्‌धि या गोष्टी फार जपून वापराव्या, तरच त्या फलदायी ठरतात.

१५०८ अखंड टिकेल तेच प्रेम.

१५०९ सर्वांचा माझ्याशी संबंध येतो म्हणून मला सर्वांनाच राखले पाहिजे.

१५१० जगातील कोणतेही ऋण फिटते पण मातृऋण व सद्‌गुरूंचे ऋण फिटत



नाही असे श्रुतिवचन आहे.

१५११ पुत्रमुख पाहिले की स्त्री ऋणातून मुक्तता होते.

१५१२ स्त्रीला पतिऋणातून मुक्तता नाही म्हणून तिने पातिव्रत्यधर्माने रहावयाचे आहे.

१५१३ ज्या स्त्रीचे ठिकाणी पातिव्रत्य मुरले ती परपुरुषाकडे पाहणारही नाही. जे मायेत आहे असे दिसते, पण मायेच्या तडाख्यात सापडत नाही, तेच ब्रह्म.

१५१४ ज्याचे प्रेमही लटके व राग ही लटका, तोच श्रीकृष्ण.

१५१५ खरे आणि खोटे जेथे सापडत नाही व ज्यास खोटे किंवा खरे काहीच म्हणता येत नाही, असे जे निरपेक्ष स्थान तेच ब्रह्म होय.

१५१६ जगाकडून छीःथू करून घेत शंभर वर्षे जगण्यापेक्षा थोडी कीर्ति झाली तोवरच मेलेले चांगले.

१५१७ आपण आपल्या चांगल्या वागणुकीने शत्रूलाही लज्जित करावे.

१५१८ चांगुलपणात त्रास झालेला परवडला पण वाईटपणाचे सुख नको.

१५१९ कसेही वागले तरी आयुष्य संपणारच; मग भलेपणानेच का न वागावे?

१५२० जगांत शोभेल अशी वागणूक भलेपणाची.

१५२१ शंभर आंधळ्यांनी सांगितलेल्या गोष्टीपेक्षा एक डोळस सांगेल तेच खरे.

१५२२ सर्वास बरे ते आपणांस बरे.

१५२३ सर्व सुखी तर आपण सुखी.

१५२४ जे दुःख परवडेल त्यालाच सुख म्हणतात.

१५२५ मोराला हजारो डोळे असले तरी त्याचा पाहणेस उपयोग होत नाही.

१५२६ सदार्जवी प्रीय जो सर्व लोकी। सदा सर्वदा सत्यवादी विवेकी।।

१५२७ न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा। जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा।।

१५२८ जो आपल्याठायी जीव तोडून करेल तोच बोलेल.

१५२९ आपले झाकून दुसऱ्याचे उघडे करणे हा तो जगाचा धर्मच आहे.

१५३० आपला बाळ्या आणि दुसऱ्याचे कार्टे.

१५३१ लोकांच्या डोळ्यातील कुसळ दिसते पण स्वतःच्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही.

१५३२ दिव्याखाली अंधार असावयाचाच.

१५३३ मशाल लोकास उजेड दाखवून आपण अंधारातून जाते; अशीच गत पंडिताची असते.

१५३४ अर्भकाचेसाठी पंतोजी हातात पाटी घेतो.

१५३५ आपल्या माणसास कुणी चांगले म्हटले तर अंगावर मूठभर मांस येते.

१५३६ आपल्या त्रासानेही ज्याला त्रास होतो व आपल्यास दुःख न होईल अशी खबरदारी घेतो तोच आपला.

१५३७ देहदुःख हेच सुख असे समर्थ म्हणतात.

१५३८ जीवास जे सुख तेच शरीरास दुःख (जीवाचे)

१५३९ काळजीसारखे दुखणे नाही.

१५४० दुसऱ्याचे दुखणे आपल्या अंगावर घेऊन त्या जीवास त्रिविध तापांपासून मुक्तता करणारे संतच महात्मे होत.

१५४१ शोक मोहासारखे प्रसंग आपल्या घरात निर्माण झाले तरी ती देवाने घेतलेली परीक्षा आहे याचा विचार करुन जाणती माणसे ते प्रसंगही विवेकाने बाजूस सारतात.

१५४२ नित्य काय आणि अनित्य काय याचा सतत विचार ठेवणे हाच विवेक.

१५४३ विवेक आणि वैराग्य संपन्न पुरुषच धन्य होत.

१५४४ विवेक निर्माण झाला की वैराग्य निर्माण झालेच म्हणून समजावे.

१५४५ तोवरी तोवरी वैराग्याच्या गोष्टी। जव सुंदर वनिता दृष्टी देखिली नाही।।

१५४६ लावण्य सुंदर रुपाने बरवी। पापीण जाणावी कामिनी ते।।

१५४७ पापची वासना नको दावू डोळा। त्याहूनी अंधळा बराच मी।।

१५४८ पाप पुण्याचे मिश्रणांतून जीवाची उत्पत्ती असून ज्याचे मिश्रण जास्त तसा देह प्राप्त होतो.

१५४९ त्याच्या संगतीचा लागे मज वारा। तेणे सखया पावेन पैल तीरा।।



१५५० जेथे चकाकी व लकाकी नाही तेथेच खरा परमार्थ आहे असे निश्चित समजावे.

१५५१ दगडाचे टाळ हातात घेऊन विठ्ठल विठ्ठल म्हणणे हाच तुकाराममहाराजांचा परमार्थ.

१५५२ नित्य नवा कीर्तनी कैचा ओढवला रंग।
श्रोता आणि वक्ता स्वये झाला श्रीरंग।

१५५३ एका जनार्दनी नित्य हरीचे कीर्तन। निमाली इंद्रिये विषय विसरले भान।।

१५५४ सारा गांव आमचा आणि एक नाही कामाचा.

१५५५ काम आहे तोपर्यंत कोणीही कोणास विचारते.

१५५६ काम नाही म्हटले तर कोणी कुणाची चौकशी करणेची बातच कसली?

१५५७ ज्याचा प्रत्येक जीवाबद्दल पक्का समजच आहे तेथे गैरसमज होण्याचा प्रश्नच उरत नाही.

१५५८ कशातही सुख नाही हेच जीवाला उमजले पाहिजे.

१५५९ युद्धाच्या गोष्टी बोलण्यातच मौज.

१५६० कोणावर प्रसंग येऊ नेय हेच खरे.

१५६१ ज्याच्या बद्दल आपण काही बोलतो त्याच्या जागी आपणच असतो तर काय केले असते याचाच प्रथम विचार करावा.

१५६२ सर्वांची मने राखावयाची तर मनाची ताकदच मोठी पाहिजे.

१५६३ एकमेकाला एकमेकांची गरज ठेवूनच परमेश्वराने सांगड घातली आहे.

१५६४ अति राग भीक माग असे म्हणतात ते काही खोटे नाही.

१५६५ मनाची दिलदार वृत्ती पहावयास मिळणे कठिणच.

१५६६ मनुष्याचा मेंदू शाबूत असेल तर तो काही करू शकेल.

१५६७ परमार्थाची कथा वाचून आणि ऐकून कधी कोणाचा उद्धार झाला आहे?

१५६८ जो अंगात मुरला तोच गुण आपला.

१५६९ जगांत पैशालाच मान आहे, मनुष्याला नाही.

१५७० गड्यांनो ऐका गड्यांनो ऐका। परमेश जगाचा पैका।।

१५७१ कृष्णा कोयनेचाच संगम खरा. बाकी सारे संगमच.
१५७२ महाराजा सद्‌गुरु मायबापा रे। तुझ्या संगे संसार गमे सोपा रे।।
तुझा हस्त धरुनी जाता वाटे रे। पदोपदी समाधी सुख दाटे रे ।।१।।
१५७३ एखादा मनुष्य श्रीमंत नाही म्हणजे गरीब नव्हे किंवा गरीब नाही म्हणजे श्रीमंतही नव्हे.
१५७४ प्रसंग आल्यावर ज्याचा तो रे, हेच खरे.
१५७५ चोराने चोरी केलेली काही वेळा पचली तरी परमेश्वराने त्यावेळी कानाडोळा केला असेच समजावे.
१५७६ गुन्ह्याला शिक्षा ही होणारच व ती अटळ आहे हे निश्तिच.
१५७७ कर्मासारखे फळ, वासनेसारखे कर्म, परिस्थितीसारखी वासना व चिंतनासारखी परिस्थिति.
१५७८ ताबेदारी बरी पण मोकळेपणा नको असे मनुष्याला अनुभवाने पटेल.
१५७९ अपकार करण्यारावरही उपकार करणारा साधू.
१५८० दुसऱ्याबद्दल जे चिंतावे तेच आपणास होते.
१५८१ अनंत हस्ते कमलावराने। देता किती घेशील दो कराने।।
१५८२ कनक आणि कांता हीच जीवाला कापणेची कात्री आहे.
१५८३ देहभान विसरणे हीच परमार्थ साधणेची सोपी व साधी युक्ति आहे.
१५८४ देहभानविस्मृतीतच चैतन्याचा खराखुरा आनंद आहे.
१५८५ वाऱ्यावरी लागली नजर। देहभानाचा पडला विसर।।
१५८६ रामकृष्ण परमहंस आई आई आई असे प्रेमाने म्हणता म्हणता देहभान विसरून जात.
१५८७ निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम, या सर्व परमार्थाच्या भूमिका आहेत.
१५८८ जीवाच्या सुखाची गोष्ट, ती शरीराला नकोच असते.
१५८९ एनर्जी वेस्ट होण्याचे साधन म्हणजेच शरीर.
१५९० बोलण्याप्रमाणे तंतोतंत होणे याचेच नाव सिद्‌धि.



१५९१ कोणत्याही गोष्टीचे स्मरण होणे याचे नावच बुद्‌धि; कारण स्मरण हेच बुद्‌धीचे कार्य.
१५९२ कोणत्याही गोष्टीचा संग्रह करणे हाच निधि.
१५९३ हरिनामाचा पाठ म्हणजेच हरिपाठ.
१५९४ प्रपंचाचे मौन म्हणजेच नामपाठ
१५९५ जे कधी उणे होत नाही त्यालाच अधिक म्हणतात.
१५९६ ज्याचे उत्तर बाकीत येते त्याला वजाबाकी म्हणतात.
१५९७ भाग देऊन बाजूला आकडा आला की तो भागाकार व पटीने वाढू लागला की गुणाकार.
१५९८ जगी कर्म भोगातुनी कोण सुटला। जो वरी नाही भवबंध तुटला।
१५९९ जगी होईजे धन्य या रामनामे। क्रिया भक्ति उपासना नित्य नेमे
उदासीनता तत्वता सार आहे। सदा सर्वदा मोकळी वृत्ती राहे ।।१।।
१६०० बहुनाम या रामनामी तुळे ना।
१६०१ आपले नाव सार्थ असावे व आपण आपल्या नावाप्रमाणे असावे
१६०२ कैवल्याचे रोप लावियेले द्‌वारी। त्याचा वेलू गेला गगनावरी।।
मोगरा फुलला मोगरा फुलला।।
१६०३ तृतीय पुरुषी व्यवहारच परमार्थ.
१६०४ जशी वेळ येईल तशी बुद्‌धि.
१६०५ होणारासारखी बुद्‌धि म्हणतात.
१६०६ काळ आला पण वेळ आली नाही तरी उपयोग नाही.
१६०७ आधी जाते बुद्‌धि, मग जाते भांडवल.
१६०८ जबाबदारी पडली की सर्व काही बिनबोभाट होते.
१६०९ आत्म्याचे सेवेला डोळे, वाणी, कान, हात, पाय, इ. नोकर चाकर अगदी तत्पर असतात.
१६१० रामाबरोबर वानर सेना ही असायचीच.
१६११ वानरा हाती लंका। घेवविली म्हणे तुका।।

१६१२ प्रभु रामचंद्रही भिल्लीणीच्या उष्ट्या बोरास भुलला होता असे भक्तिप्रेमाचे माहात्म्य आहे.

१६१३ देव तो देवच.

१६१४ तुका म्हणे तरी म्हणावे सेवक। खादले ते हक्क अन्न होय।

१६१५ तुका म्हणे मज कळते चाचणी। बडबडीची वाणी अथवा सत्य।

१६१६ नामचिंतनाने विघ्ने दूर होतात म्हणून विघ्नात पडून नामाचे चिंतन करावे काय?

१६१७ विषयाचा मधु बिंन्दू। जीवा लोटी दुःखसिंधू।

१६१८ खरे आणि खोटे म्हणजे त्रासच.

१६१९ खऱ्याचे खरे आणि खोट्याचे खोटे होतेच; ते सिद्ध करत बसणेची जरुरी नाही.

१६२० मनाला स्वस्थता नसेल तर जगातील सुखांचा तरी काय उपयोग.

१६२१ परमेश्वरा, माझे खरे आणि खोटे तू सर्व जाणतोस, म्हणून तू ठेवशील तसाच मी आनंदाने राहणेस तयार आहे.

१६२२ हपापाचा माल गपापा.

१६२३ परमेश्वर जशास तसे देत असतो.

१६२४ जगांबरोबर आपणही हा हा हा करावे; यातच मौज आहे.

१६२५ आजचा दिवस पुनःकधीतरी येईल; कारण तो मागेही केव्हा तरी आला होता व आजही येऊन गेला.

१६२६ एखादे वेळेस जीवाचे देवाकडे व भक्ताकडेही लक्ष नसावे असे होते.

१६२७ समुद्राचा अंत लागत नाही हे खरे पण त्याच्या तळाशी जाऊन मोती घेऊन वर येणाऱ्यास तरी त्याचा अंत लागतोच.

१६२८ भस्मासुराने शंकराच्या डोक्यावरच हात ठेवून त्यालाच भस्म करावे असा विचार मोठ्या कपटाने केला खरा; पण विष्णूने मोहिनीचे रूप घेऊन आपल्याबरोबर त्यास नाचावयास लावले व मोहिनीसारखे नाचता नाचता त्याने आपणच आपल्याच डोक्यावर हात ठेवून घेतला व शंकराचा नाश करता करता स्वतःचाच नाश करून घेतला.



१६२९ गुरूची विद्या गुरूसच फळली असे होऊ नये व कुठला शिष्याला बोध केला असे वाटण्याचा प्रसंगच त्याच्यावर येऊ नये.

१६३० कोणत्याही बाबतीत मनुष्याला सुख नसले तरी निदान दुःख तरी असू नये.

१६३१ शरीरावर पडलेले डाग जातात पण हृदयावर पडलेले डाग जात नाहीत.

१६३२ शरीरास झालेल्या जखमा भरून येतील पण हृदयावर झालेल्या जखमा भरून येत नाहीत.

१६३३ पेलेल तेवढीच जबाबदारी पत्करावी; म्हणजे यात पडावयांस कुणी सांगितले असे कुणी कुणाला म्हणणार नाही.

१६३४ शक्तीप्रमाणे पाऊल टाकावे.

१६३५ जबाबदारी अधिक न वाढविणे हाच जबाबदारी उत्तम रीतीने पार पाडण्याचा राजरस्ता आहे.

१६३६ मनुष्याने आपणांस परमेश्वराने दिलेला हक्क मात्र प्रस्थापित करून तो शाबीत करावा.

१६३७ वासनेच्या जाळ्यांत जो गुरफटला नाही व दुसऱ्यासही त्यातून मुक्त करतो तोच आपण सुखी होऊन दुसऱ्यास सुखी करतो.

१६३८ परमेश्वराने आपल्या अपेक्षेबाहेर कृपा केली तर त्याच्या आज्ञेबाहेर वागावे म्हटले तरी अशक्यच.

१६३९ मनुष्याच्या आकांक्षाही कोठेतरी संपतातच.

१६४० आकांक्षा संपणे म्हणजे अंतर्मुख होणे.

१६४१ अंतर्मुख होणे म्हणजेच सुखरूप होणे.

१६४२ सुखरूप होणे म्हणजेच परमेश्वराचे आज्ञेत राहणे.

१६४३ परमेश्वराची भक्ति हीच त्याची आज्ञा.

१६४४ परमेश्वराची भक्ति केली आणि तो बुडाला, त्याचे वाटोळे झाले, अपकीर्ति झाली, असे आजपर्यंत झाले नाही.

१६४५ भक्ति हे जीवास सुख प्राप्त करून देणारे उत्तम रसायन आहे.
१६४६ गाय ही कसायालाच धार्जिण.
१६४७ भित्यापाठी ब्रह्मराक्षस.
१६४८ वाजे पाऊल आपुले, म्हणे मागे कोण आले?
१६४९ कोणाचे चांगले कोणास पहावत नाही.
१६५० लवून नमस्कार करणारेच गोता देतात असा व्यवहार आहे; म्हणून नमस्कारास भुलू नये.
१६५१ वाघ सिंहाची शिकार करणेची तयारी ठेवावी, तेव्हा कोठे ससा हाती लागतो.
१६५२ ऊस गोड लागला म्हणून काय मुळासकट किंवा वाढ्यासकट खावा.
१६५३ कोणाचेही कल्याणासाठी प्रयत्न केला तरी आपणांस कोण चांगुलपणा देणार आहे याचा विचार करावा.
१६५४ दोन फूट रुंदीच्या भिंतींनी वारे अडवले तर मनुष्यास गुदमरल्या सारखे होते तर ज्याच्या नाकातोंडातील वारेही अडवून परमेश्वराने ते आपल्याकडे खेचून घेतले त्याला जगांत कोणती हालचाल करता येईल.
१६५५ भक्त विन्मुख झाला तरी देव मात्र त्यास सन्मुखच होतो.
१६५६ आपले गुणधर्म जिवंत ठेवून परमेश्वरास ओळखताही येणार नाही.
१६५७ हल्लीच्या काळात धर्मराज एखादाच असावयाचा.
१६५८ कमरेखा फुसणारे तेच संत.
१६५९ स्लेट पाटीवर पाण्याने लिहिलेली अक्षरे कोण ओळखू शकेल?
१६६० शहाणा माणूस कोणतीही गोष्ट बोलून दाखवीत नाही, पण करून दाखवितो.
१६६१ घासून घ्यावे पण हसून घेऊ नये म्हणतात ते खोटे नाही.
१६६२ सात भिंतीपलीकडील वस्तुही बसल्या ठिकाणी ज्याला दिसते त्याला जगांत कोण आड येऊ शकेल?
१६६३ जगांत वाईट लोकांचा भरणा फार आहे. तुम्ही फारच भोळे आहा, तेव्हा सांभाळून परमार्थ करावा असे चिमडचे श्रीरामचंद्रावमहाराजांनी उपदेशिलेले वचन कोणासही चिंतनीय आहे.



१६६४ कोणत्याही चौकटीत बसू शकत नाही तोच संत.
१६६५ शेंडी तुटो की पारंबी तुटो असे ज्याचे झाले तोच एक परमार्थाची कड गाठू शकेल.
१६६६ वाऱ्याने डोलणारी वाऱ्याची फुले कोणाचे हाती लागतील?
१६६७ काही झाले तरी मिठाच्या डेऱ्यावरच गळावयाचे हे तर खरेच; पण मिठाचा डेरा, तो-पाझरून गेल्यावर?
१६६८ हरिला पाहूनी भुलली चित्ता। राधा घुसळी डेरा रिता।।
वारियाने कुंडल हाले। डोळे मोडित राधा चाले।।,
याचा अर्थ जाणणारा भाग्यवानच म्हटला पाहिजे.
१६६९ जो तो उपदेशाच्या गोष्टी बोलू लागला की आता कोणाचा उपदेश नको असे वाटते.
१६७० एक भाकड कथा, कर्म कथा, व हरि कथा अशा तीन कथा आहेत.
१६७१ आम्ही सांगू ती गाथा करू ती कथा आणि पाडू ती प्रथा असे नसावे.
१६७२ दुसऱ्यावर बोट ठेवण्यापेक्षा माणसाने आपणच सावध असावे.
१६७३ मनुष्याच्या गरीब स्वभावाचा फायदाच घेणारे सगळे.
१६७४ ज्यातून काही निष्पन्न होणार नाही असे वागणेच नसावे.
१६७५ मनुष्याने आपण परिस्थितीचा दास होऊन राहू नये.
१६७६ भुसाचे कांडण करून व ताक घुसळून काय उपयोग?
१६७७ हौसेला मोल नाही हेच खरे.
१६७८ गरजवंताला अक्कल नसते.
१६७९ अडला नारायण गाढवाचे पाय धरी.
१६८० खावयास फुटाणे व टांग्यास आठ आणे असे नसावे.
१६८१ देवा, मला जगवावयाचे झाले तर, केवळ कथाकीर्तनाकरिताच जगव.
१६८२ सर्वांना सद्‌वासना देऊन सर्वांचे कल्याण असावे हीच महाराजांना प्रार्थना.

१६८३ सूर्यप्रकाश हा जी वस्तु दाखविणेस असमर्थ, तेथे बॅटरीचा उजेड काय दाखवील?

१६८४ प्रसंगोपात जीवाच्या प्रवृत्ती उसळ्या मारतातच, पण ज्यास परमेश्वरानेच झटका दिला त्याच्या मात्र थंड होतात.

१६८५ सुसंगती सदा घडो सुजन वाक्य कानी पडो । कलंक मतिचा झडो विषय सर्वथा मनी नावडो ।।

१६८६ शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ।। हे जसे, तसे सूर्यापोटी शनेश्वरही असावयाचेच.

१६८७ सूर्यावर थुंकले तरी आपली थुंकी सूर्यास लागत नाही.

१६८८ कावळ्याच्या शापाने गाय मरत नाही.

१६८९ आत्म्यावर उठणाऱ्या वायूच्या लहरी या वायूमार्फत आत्म्यातच विराम पावतात.

१६९० मनलतेवरील सुमनेच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीपांडुरंगाचे चरणी अर्पण केली.

१६९१ मनावर चढलेली लता तीच मनलता. तेथे वृक्षाचा म्हणजे प्रेमाचा दृश्याचा तादात्म्याचा-आडरान-मायेचा वनाचा संबंध नाही.

१६९२ पाण्याने दम टाकला की महापुराची भीति नाही.

१६९३ झणी दृष्टी लागो तुझ्या सगुणपणा, हे चरण बुद्धीला अनुभवानेच पटणारे आहे.

१६९४ ज्याच्या घरी मनलतेवरील फुले वाऱ्याने उमलतात, डोलतात व पांडुरंगाचे चरणी गळून पडतात तेथे मोक्षाचे झाडच आहे असे समजावे.

१६९५ नीट वाटे चाल बाई चोर बहू साल। जाईल टका उडेल रुका लोक लावितील बोल।।

१६९६ पदरचे खर्चून लोकांचा बोल कां घ्यावा.

१६९७ आत पाणी बाहेर पाणी। पाण्यास पाणी आले बांधोनी।, असे ज्याचे झाले तोच परमार्थी.



१६९८ धुताच मोती जळी हरपलं सखोल मोठं पाणी।
चला जाऊ सहा चार अठरा जणी।

१६९९ बहुत दिवस चुकले सखे गं बहुत दिवस चुकले। राजहंस पाखरू माझे मजला सापडले। बसूनी एकांती पाहू सखे गं बसुनी एकांती पाहू। उडून जाईल म्हणूनी तयासी डोळ्यांत साठवूनी ठेवू। घडो घडी अनुभव घेऊ सखी ग घडो घडी अनुभव घेऊ। ज्याचे सुख त्याने भोगावे नये दुसऱ्याला देऊ। असा परमार्थाचा निष्कर्ष आहे.

१७०० पदरचे खाऊन लष्कराच्या भाकरी कशाला?

१७०१ मार्गस्थ जीवांना धडे देण्याकरिता परमेश्वर काही प्रसंग घडवितो.

१७०२ हृदयावर कोरलेले प्रसंग व अक्षरे हे चिरस्थायीच असतात.

१७०३ कोणत्याही निमित्ताने अगदी नीच वृत्तीने जरी कोणी परमार्थ मार्गास लागले तरी त्याला देखील परमार्थ हा शांतीच देईल, झिडकारून टाकणार नाही अशी माझी खात्री आहे.

१७०४ दया क्षमा शांती। तेथे देवाची वस्ती आहे, असेच समजावे.

१७०५ कोणी चांगले अगर वाईट म्हणावे याकरिता आपुले आयुष्य नाही. योग्य दिशेने सर्वांनाच सुख होईल अशा दृष्टीने पाऊल टाकत जाणे हेच माझ्या जीविताचे सार सर्वस्व आहे.

१७०६ कोणाही जीवाचे बाबतीत एकदा पाऊल टाकलेले मागे न घेतलेलेच चांगले. तो जीव लायक नाही असे वाटल्यास किंवा अपरिहार्य परिस्थिति असल्यास पुढे पाऊल न टाकावे इतकेच.

१७०७ चांगल्याचे कोणी सोंग घेतले तरीही त्याचे चांगले होते.

१७०८ वेडाचे सोंग घेतले तरी पाटाव फाडावा लागतो.

१७०९ मनुष्याची चर्याच तो कसा आहे ते सांगते; इतरांनी त्याची प्रस्तावना करून मतपरिवर्तन करणेची जरुरीच नाही.

१७१० साधा माणूस जर क्षणार्धात कोणाचीही पारख करतो तर आमचे अंतरंग जाणणाऱ्या चैतन्यास त्याची पारख नसेल काय?

१७११ राजयाची कांता काय भीक मागे। मनाचिया जोगे सिद्‌धि पावे।।
१७१२ जातीचेच पाहिजे. ओढून ताणून चंद्रबळ किती आणणार?
१७१३ तुका म्हणे मुक्ती परीणली तोवरी। आता दिवस चारी खेळी मेळी।।
१७१४ आपण जी पोज (भूमिका) घेतली असेल तसाच फोटो निघणार.
१७१५ सर्वांचे सर्व ओळखण्याकरिताच परमेश्वराने आयुष्याचे नाटक रंगवले आहे; पण त्याची तो कोणास आठवणही देत नाही.
१७१६ नाटक कसे ही रंगलेले असो कोरसच्या वेळेला सर्व पात्रे स्टेजवर यावीच लागतात.
१७१७ सर्व पात्रे एका स्टेजवर आली की नाटक संपले असे समजावे.
१७१८ शरीरांत वाहणारी चैतन्याची एनर्जी इंद्रियांचे मार्फत फुकट घालवून न देता त्याची जमा एका चैतन्यातच करणे वा एनर्जी वाढविणे याचेच नाव साधन.
१७१९ परमेश्वराने आमच्याकरिता काही केले व काही नाही केले तरी त्याची सत्ता व हक्क आमचेवर अबाधित असल्याने त्याची आज्ञा उल्लंघन करणे हे जीवाला अशक्यच आहे.
१७२० परमेश्वराची आज्ञा मोडण्याची वासना होणे हाच दुःखाचा समुद्र होय.
१७२१ देवाइतके लबाड या जगांत कोणी नाही असे म्हणावे लागेल.
१७२२ एकीकडे तुफान वादळ तर दुसरीकडे खवळलेला समुद्र; अशा स्थितीत आपल्या भक्ताची नौका कोठे तरी समुद्रास्तुप्यंतु होईना का? असे परमेश्वर खास म्हणणार नाही तो त्याचा बचाव या दोहोतून करून आपल्या भक्ताची नाव कडेला पोचवील.
१७२३ भक्ताने ज्याची टाळाटाळ करावी तेच देव त्यास करावयास लावतो.
१७२४ देव आणि भक्त आहेत म्हणूनच परमार्थाच्या गोष्टी.
१७२५ नाही तरी तुम्हा पुसते कोण। एवढा देवासाठी मान।
१७२६ हसत आले ते हसतच व रडत आले ते रडतच जावयाचे.
१७२७ जे जसे आले तसेच ते जाते; त्यास प्रयत्नाची जरुरी नाही.



१७२८ नागाच्या तोंडातून लाल काढून घेण्यास युक्तिवान् गारोड्यांची कलाच हस्तगत झाली पाहिजे.
१७२९ नाग जिवंत असताना तो आपल्या तोंडातील लाल बाहेर फेकून त्याच्याशी खेळत असतो.
१७३० नागाने बाहेर फेकलेला लाल त्यास भुलवूनच, त्यास धक्काही न लावता घ्यावा लागतो; नाही तर दंश करून ठार करील.
१७३१ नागास ठार करून लाल घेता येत नाही.
१७३२ लाल तो लालच. तो पकडणे हे जसे असामान्य तसेच शरीरास धक्का न लावता चैतन्यावर आपल्या दृष्टीने किरण टाकून आत्मप्रकाश डोळ्यात साठवून चैतन्य हस्तगत करून घेणेही असामान्यच.
१७३३ माझे तेच खरे असे कोणीही म्हणू नये.
१७३४ खरे ते आपले तेच खरे.
१७३५ काय करायचे ते करून दाखविलेलेच उत्तम. नुसती तोंडाची वाफ दवडण्यात अर्थ नाही.
१७३६ दिसते पण हाताने धरता येत नाही; असे स्वरूप सद्‌गूरुकृपेने प्राप्त होते.
१७३७ साखरेची गोडी सांगता येणार नाही. ती बोलून काय दाखवायची?
१७३८ आठव तो ब्रह्म। नाठव तो भवभ्रम।।
१७३९ ब्रह्मरूप झालेल्यास तेथे भूत हारीमोरी रहात नाही. फार काय आसपासही येत नाही, म्हणून भुताची भीति नाही. उलटपक्षी भूत हे भुताच्याच जातीचे म्हणून त्याला एकात्म्याची भीति नाही.
१७४० ज्ञप्ती सुखाचे आत तल्लीन होणे हे परमार्थातील वर्म आहे.
१७४१ कोणाचाही गैरसमज घालवणेचा प्रयत्न करणे व्यर्थच.
१७४२ कायदेपंडिताजवळ बोलणेही मूर्खपणाच.
१७४३ कोर्टात केस गुदरणे अगर डॉक्टरच्या हाती केस देणे म्हणजे आपण त्यांचे ताब्यात जाणेच होय.
१७४४ शहाण्याची भलाई मोठी.

१७४५ आली उर्मी साहे। तुका म्हणे थोडे आहे।।

१७४६ मोकळेपणा परमार्थास चांगला, पण व्यवहारास हानिकारक आहे.

१७४७ आहे ते सोडून नसलेल्याच्या मागेच जग धावते, व आयुष्य खलास होते, असा संतांचा अनुभव आहे.

१७४८ परावलंबी जीवन हे प्रपंच परमार्थासाठी निरुपयोगी.

१७४९ कडेने हात पाय मारताना नाका तोंडात पाणी जाऊन गुदमरणारा मध्ये काय पोहील?

१७५० उपाधिभूत जीवनाच्या मध्यबिंदूत जीवाचे तादात्म्य हाच परमार्थ.

१७५१ आयुष्यक्रमात बदल हीच चुकीची कबुली.

१७५२ आयुष्यक्रम सद्‌गुरूशी निगडित करून त्यात वाटेल ते झाले न बदलता अंर्तमुख होणे हाच निवृत्तिमार्ग होय.

१७५३ दगडास कोणी शेंदूर फासला तरी दगड तो दगडच.

१७५४ श्रीगुरुलिंगगीता हे महाराजांचेच स्वरूप असल्याने त्या गीतेची उपासना करणाऱ्यास महाराज खास तारतील असा माझा दृढ विश्वास आहे.

१७५५ ज्या दगडाला महाराजांनी शेंदूर फासला असा कोणताही दगड असो तो तरलाच पाहिजे असा दृढ विश्वास बाळगणे दुरभिमानाचे ठरेल असे मला वाटत नाही.

१७५६ माझे काही बरेवाईट असले तरीही मी महाराजांचे नाव घेतच मरेन एवढी मला खात्री आहे.

१७५७ महाराजांचे नावानेच माझे काय ते व्हावे यापलीकडे माझी इच्छाच नाही.

१७५८ श्रीगुरुलिंगगीता ही बोधामृताची गंगाच असल्याने त्यांत सदा डुंबावे असे वाटते.

१७५९ शेंदूर फासलेल्या दगडावर प्रेम करणेपेक्षा तो ज्यांनी फासला त्यांची भक्ती केली तर त्यातच कोणाचाही तरणोपाय आहे.

१७६० मला दोनच डोळ्यांनी पाहता येते; पण महाराजांना अनंत डोळे असल्याने त्यांना सर्वांचे सर्व काही दिसते.



१७६१ जगाचे रक्षण करणारे महाराज आपणास दूर ठेवतील असे खास नाही.

१७६२ महाराज कोणाकडून काय करतील व कोणाकडून कशी सेवा घेतील हे सांगता येणार नाही.

१७६३ आयुष्यात धोका दाखवून देणारेच सज्जन

१७६४ धोका दाखवून जीवाचे कौतुक करणारेच संतसज्जन असल्याने त्यांची सेवा करणेतही धन्यता वाटते.

१७६५ काही बोलले तरी हसणाऱ्यांना स्थितप्रज्ञच म्हटले पाहिजे.

१७६६ सर्व जीव हे गुरुस्थानीच आहेत असे वाटते.

१७६७ ज्यास जशी संगत तसा तो होतो.

१७६८ पाणी तेरा रंग कैसा। जिसमे मिलावे वैसा।।

१७६९ सुताने स्वर्गात जाणे शहाणपणाचे नव्हे.

१७७० एखाद्याचे भले होत असेल तर भल्याने खोटे वागले तरी पाप नव्हे, असे शास्त्रवचन आहे.

१७७१ जो जसे वागेल तसे त्यास वागू देणेतच शहाणपण आहे.

१७७२ सांगून उपयोग होत नाही, असाच थोरामोठ्यांचा अनुभव त्रिवार सत्य आहे.

१७७३ संतांचे करणे आपल्या कल्याणाचे आहे, असे वाटणे हाच दृढ विश्वास.

१७७४ आंत एक, दाखवायचे एक, बोलायचे एक, करायचे तिसरेच, हसायचे चौथ्याकडे पाहून, तशीच तऱ्हा मृत्युलोकाची.

१७७५ ध्याईन तुझे रूप गाईन तुझे नाम। आणिक न करी काम जिव्हा मुखे। पाहीन तुझे पाय ठेवीन तेथे डोय। पृथक ते काय न करी मी। करेन सेवा चालेन पायी। तुका म्हणे हा जीव ठेवीन मी पायी।। आणिक ते काय देऊ कोणा।

१७७६ कित्येक वेळा धाकाने अगर आडव्या तिडव्या प्रश्नाने चोर नसलेला सावही मी चोरी केली आहे असे सांगतो व परिणामी तो त्यातून सुटतोही.

१७७७ आपल्यावर हे संकट कोसळेल काय या भीतीनेही मनुष्य घाबरतो म्हणून

तो काही चोर नव्हे.

१७७८ गुन्हा करून कबूल करणाऱ्यास कदाचित् माफीही मिळते.

१७७९ सगळेच कायदे व्यवहारात बसतात असे नाही, उलट सगळेच व्यवहार कायद्यात बसतात असे नाही.

१७८० कायद्यासाठी आपण नसून आपल्यासाठी कायदे आहेत.

१७८१ गुन्हा करुन तो केला नाही म्हटले तर तो दोन गुन्ह्यांचा अधिकारी होतो.

१७८२ आपला जिन्नस एखाद्याने वापरून वहिवाटीचा हक्क सांगितला तर तो आपलाच.

१७८३ घटकेत सौभाग्यवती व घटकेत गंगा भागीरथी असे नोकरांचे होत असते.

१७८४ नोकरीत मालकाची मर्जी राखून प्रामाणिकपणाने आपले काम बजावणाराच कडेस जातो.

१७८५ लाच न घेणारा नोकरच श्रेष्ठ.

१७८६ जिथे माणसाचा शहाणपणा चालत नाही त्यालाच नशीब म्हणतात.

१७८७ बाहेर मानमान्यता व्हावी असे ज्याला वाटत असेल अशा नोकराने मालकाकडून अपमान झालेला तो मानच समजला पाहिजे.

१७८८ मानापमान बाजूस ठेवणे हेच प्रपंचपरमार्थ सुखाचा होण्यास जरुरीचे आहे.

१७८९ अहिंसा आणि सत्य यांची मूर्तीच महात्मा.

१७९० भजनानंदाचा एक प्याला ज्याने आपल्या मुखाला लावला तेथे मानापमान संशयकल्लोळाची पूर्तता होऊन भ्रमाचा भोपळा फुटलाच म्हणून समजावे.

१७९१ भ्रमाचा भोपळा फुटला म्हणजेच सत्य उजेडात येते.

१७९२ या जगाच्या कोर्टात एखादा जीव अन्यायी ठरला तरी परमेश्वराच्या दरबारात ठरेल तेच खरे.

१७९३ सर्व उपाय थकले म्हणजे मनुष्य रागावतो.

१७९४ राग व लोभ हे एकमेकास पूरक म्हणजे भाऊभाऊच आहेत.



१७९५ राग व लोभ यांचा उद्देश एकच असेल तर त्याचा परिणामही एकच होतो.

१७९६ कित्येक वेळा रागही लोभाकरिताच असतो.

१७९७ विरोधी राग असेल तरच तो खरा.

१७९८ रावणासारखी विरोधी भक्ति क्वचित् दिसते.

१७९९ काम + क्रोध = लोभ; क्रोध + लोभ = मोह; लोभ + मोह = मद; मोह + मद = मत्सर; मद + मत्सर = काम.

१८०० मायापवनात मद मत्सर

१८०१ मदमत्सराचे मिश्रण म्हणजे कामबिंदू

१८०२ उन्माद व तिरस्कारात्मक दृश्यच इच्छाशक्तीस कारण होते.

१८०३ कोणास जामीन होऊ नये.

१८०४ कोणतेही व्यसन म्हणजे संकटच.

१८०५ अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान् मे प्रियो नरः । असे भगवान म्हणतात.

१८०६ आपल्याकरिता व्यसन, व्यसनाकरिता आपला जन्म नाही. हे ज्याला कळले असा पुरुषच व्यसनाधीन अगर परस्वाधीन होत नाही.

१८०७ सत्त्व, रज, तमात्मक तीन गतींचे मिश्रण म्हणजेच मायेचे वारे.

१८०८ अस्तिरूप निःशब्द ब्रह्माचे ठिकाणी फक्त पहाणेचीच क्रिया एकत्वातही दृश्य नसेल तरी पहाणे असतेच.

१८०९ मनुष्याने डोळे मिटले व तो एकाकी झाला तरी पाहणे व त्याचे ज्ञान आहेच. अंधारच अंधार हे तरी डोळे मिटूनही पहाण्याचे ज्ञानच.

१८१० चैतन्याचे ठिकाणी पहाणे व ऐकणे या दोन क्रिया संभवतात.

१८११ आनंदात कोणताही व्यवहारच नाही.

१८१२ व्यवहार झाल्यावरच आनंद

१८१३ उपाधिभूत जीवनात पहाणे, ऐकणे व बोलणे या तीन क्रिया संभवतात.

१८१४ शरीराचे जीवाशी तादात्म्य म्हणजे दृश्यातील सर्व प्रकारचे व्यवहार.

१८१५ एक खोटे पचविण्याकरीता मनुष्याला हजार खोटे बोलावे लागते.

१८१६ खोट्याचे सर्व काही खोटेच.

१८१७ मनुष्याने खरेपणाने वागावे.

१८१८ खरे नाणे कोठेही नेले तरी आपला आवाज बद्द देणार नाही.

१८१९ खऱ्याचे खोटे व खोट्याचे खरे एखादा फर्डा वकीलही करू शकतो.

१८२० कोठेही विश्वास ठेवावा इतका व्यवहार व परमार्थ सोपा नाही.

१८२१ वकिलाने एखादी केस बुद्धिकौशल्याने आपल्यासारखी लढविली अगर डॉक्टरच्या हाताने एखादे वेळेस आपणास यश लाभले, म्हणून नेहमी तसेच होईल असे नाही. कारण जेथे तेथे सर्व गोष्टी स्वार्थ निस्वार्थवृत्तीवरच अवलंबून असतात.

१८२२ स्वार्थी माणसावर विश्वास टाकणेही घातकच.

१८२३ आईने मुलास काही मुकाट्याने पोळी घातली की त्याने ओरडून तूप मागावे, असेच बहुधा होत असते.

१८२४ शिळे का खाल्ले तर कुत्रे शिवले म्हणून असेच म्हणणारे फार.

१८२५ ज्याचे त्याने आपले नाव राखले पाहिजे; मग त्याकरिता कितीही त्रास होवो अगर जनापवाद घ्यावा लागो.

१८२६ आपण आपले नाव राखणे म्हणजेच देवाचे नाव घेणे.

१८२७ आपल्या नावारूपाचा अभिमान न धरणे म्हणजेच आपले नाव राखणे; कारण अभिमानानेच सर्वनाश होतो.

१८२८ आपण आपले नाव राखले तर त्यात परमेश्वरास आनंद आहे.

१८२९ प्रपंचात काय किंवा परमार्थात काय ज्याला एकच साधावयाचे किंवा सर्व साधावयाचे याची कुरकुर पण जे साधेल ते साधेल म्हणणाऱ्याची कुरकुर होतच नाही.

१८३० जितके सूक्ष्म व्हावे तितके खुट्ट झालेलेही खपत नाही.

१८३१ कोर्टात डायरेक्ट एव्हिडन्स न्यायाधिशास पटला म्हणून गुन्हेगाराचे सर्व बोलणे खरे आहे, असे तो म्हणणार नाही त्यास अडकवून घेणे पुरतेच त्याचे बोलणे तो सत्य मानेल व येथे आता पुराव्याची निराळी जरुरीच नाही, असे तो म्हणेल.



१८३२ कोणास काही पटवून देत बसणे म्हणजे आपली बाजू लंगडी आहे हेच सिद्ध करणे होय.

१८३३ जे सत्य असलेने पटवावे लागत नाही. अनुभवाने पटेल तेच खरे.

१८३४ दुसऱ्याने सांगितलेल्या लाख गोष्टीपेक्षा स्वानुभवच श्रेष्ठ.

१८३५ एखाद्याने मजजवळ बरी अगर वाईट गोष्ट मी केली असे सांगितले तरी ते माझ्या ताळ्यात बसल्याखेरीज सत्य म्हणणार नाही. त्या व्यक्तीचा मला जो अनुभव असेल त्यावरूनच मी काय असेल ते सत्य अगर असत्य म्हणेन, असे एका साधुचे वचन आहे. (रामानंद)

१८३६ जगात पापपुण्य, दुर्जनसज्जन हे सारख्याच उपयोगाचे. ज्याप्रमाणे मैला व अन्न त्याप्रमाणेच त्याचा यथोचित उपयोग करुन घेणे हेच शहाणपणाचे आहे.

१८३७ अन्नाचे जागी विषाचा व विषाचे जागी अन्नाचा उपयोग केल्यास हानीच होणार. तेथे त्या पदार्थास नाव ठेवणेतही अर्थ नाही.

१८३८ अन्न ग्राह्य असले तरी त्याची बनणारी विष्ठा अन्नातील रसग्रहण झाल्यावर टाकूनच द्यावी लागते.

१८३९ वास्तविक आपण ज्यांना दुर्जन म्हणतो तेही सज्जनच असतात. पण आपण त्यांचा सदुपयोग करून न घेतल्याने ते आपणास दुर्जन होतात.

१८४० हिंसा करणे हे पाप, विंचू, साप ठार करणे हे पाप नसून पुण्यच आहे.

१८४१ पुण्याचा दुरुपयोग व पापाचा सदुपयोग हेही पाप पुण्यच म्हणून जगात पाप नाही. पण त्याचा उपयोग करावा तशी त्याची फळे असल्याने त्याचा उपयोग योग्य रीतीने न झाल्याने त्यास मिळालेल्या विपरीत फळामुळे आपण त्यास पाप म्हणतो.

१८४२ अन्नापासून तयार झालेल्या विष्ठेचा उपयोग खताचे जागी केला तर त्यास कोणीही चांगलेच म्हणेल; तसे सद्विचारांचे रसग्रहण झाल्यावर बाजूस येणारे दुर्विचार! काम असावा इश्वर भजनी क्रोध असावा इंद्रिय दमनी, या प्रमाणे योग्य ठिकाणी उपयोगास लावले तर त्यातून पुन्हा सद्विचारांचे

रसग्रहण होवून ते पुण्यदायीच होतील व पापाचे स्थान ही राहणार नाही.

१८४३ जगातील व्यवहार सापेक्ष असल्याने आपल्या सोईसाठी पाप पुण्य हे शब्द वापरतात.

१८४४ प्रपंचात पाप नाही पण व्यभिचारात पाप आहे. अन्न हे जीवन पण अति झाले की विषच बनते तसे.

१८४५ कोणत्याही वृत्तीचा, कृतीचा, पदार्थाचा सदुपयोग व दुरुपयोग याच्यावरच पापपुण्याचा खेळ आहे. म्हणून वृत्तीत, कृतीत, पदार्थात पाप नसून आपली अक्कल गेली व दुरुपयोग झाला तर त्यात पापच आहे.

१८४६ कोणत्याही वस्तूचा दुरुपयोग घातकच ठरला की जीव योग्य वाटेवर येतो व दुरुपयोगाने होणारा परिणाम त्यास उपकारच होतो.

१८४७ पायातील दगडांचे कौतुक होत नाही. इमारतीच्या दगडांचे कौतुक होते. पण त्यामुळे पायातील दगड कमी महत्त्वाचे असे कोणी म्हणू नये.

१८४८ चैतन्य सर्वत्र आहे. त्याचाच विलास आहे. पण त्यावरच दृष्टि ठेवणारे तरतात व जडास चिकटणारे अधोगतीस जातात.

१८४९ चैतन्यास विसरणे हा त्याचा दुरुपयोग आहे.

१८५० चैतन्याचा विकास जसा कमीअधिक असेल त्यावर जीवाची श्रेष्ठता कमीअधिक होते.

१८५१ जीव हा कितीही खालच्या थराचा झाला तरी जडापेक्षा त्याला किंमत आहेच.

१८५२ जितका मनुष्य श्रेष्ठ पदाला जातो तितका तो अधिक नम्र होतो.

१८५३ घरच्याला उजेड दाखवून चोराला अंधार करावा हे कसब दिव्याजवळ नाही; तशीच संताची वृत्ति असते.

१८५४ अस्तित्व, चैतन्य व आनंद म्हणजेच ब्रह्म. जगातील कोणत्याही पदार्थात हे तीन गुण आहेत म्हणून सर्व ब्रह्म असे म्हटले आहे.

१८५५ चैतन्याचे प्रमाण कमी होणे म्हणजेच जड व जडाचे प्रमाण कमी होणे म्हणजेच चैतन्य.



१८५६ आनंद सतत टिकणे म्हणजेच परमेश्वरदर्शन.

१८५७ जडात समरस झाल्याने आनंद टिकत नाही.

१८५८ चैतन्यात समरस होण्याकरताच साधनाची आवश्यकता.

१८५९ सत्चिदानंद परमात्मा म्हटल्यानंतर त्याचे अस्तित्वच सिद्ध करण्याची आवश्यकता नाही.

१८६० जगात कोणी नास्तिक नाहीच. कोणी आपणास तसे म्हणवीत असेल तर परमात्म्याचे अस्तित्वावरच. कारण तो जिवंत आहे त्यात चैतन्य आहे. व परमेश्वर जगात नाही म्हणणेतच त्यास आनंद होत आहे. अस्तित्व चैतन्य व आनंद हाच परमेश्वर.

१८६१ वृत्तींचा प्रवाह जडाकडे वळणे म्हणजेच चैतन्यापासून दूर होणे व चैतन्याकडे जाणे म्हणजेच जडापासून दूर होणे यातच पाप-पुण्य, सुख-दुःख सापेक्षतेचे वर्म साठविले आहे.

१८६२ कमी आनंद व सतत आनंद हाच प्रपंच-परमार्थातील फरक आहे.

१८६३ आकाशावर प्राणवायूचा आघात म्हणणजेच दृश्य.

१८६४ निरपेक्ष ब्रह्म व सापेक्ष दृश्य

१८६५ गप्प बैस म्हणजेच ब्रह्म कळेल.

१८६६ आधिभौतिक सुखाच्या मागे लागलेले संशोधक व त्यांचे अनुयायी दुःखाकडेच धावताहेत.

१८६७ स्वस्थ बसणाराच्या मागेच सुख व ऐश्वर्य धावत येते.

१८६८ परमार्थचे अधिकार देताही येत नाहीत व घेताही येत नाहीत.

१८६९ चैतन्यरूप झालेल्या जीवाकडे परमार्थाचे अधिकार धावत येतात.

१८७० आत्मबिंदूत सर्व सुख आहे हेच निश्चित.

१८७१ आत्म्यातून उठणाऱ्या लहरी म्हणजेच आत्मलहरी.

१८७२ ध्वनीमध्ये मन रंगुनि गेले। भ्रूभंगावरी लक्ष लागले।
न ढळे पाती नीर चालिले। असे होणे हेच परमार्थ साधन

१८७३ भ्रमणातून भ्रांती व भ्रांतीतून अहंकार

१८७४ आपले स्थान सोडणे म्हणजेच भ्रमण
१८७५ जीवाची फेक म्हणजेच स्थानभ्रष्टता
१८७६ स्थानभ्रष्टता म्हणजेच गती व भ्रमण
१८७७ त्रिगुणात्मक अहंकारातून मायेचे वारे
१८७८ वाद तुटेल असाच संवाद असावा
१८७९ नाना पंथ नाना मते जगात प्रचलित असली तरी सर्वांच्या प्राप्तीचे स्थान एकच.
१८८० ज्याचे पोटच भरले त्याला विवेक करून वैराग्याचे सोंग पांघरावे लागत नाही.
१८८१ घरातील शिरलेला पाहुणा पडशीसकट बाहेर जाणे व मालकास घराचा कब्जा मिळणे म्हणजेच परमेश्वराने-महाराजांनी-जीवाची काळजी दूर करणे होय.
१८८२ बिऱ्हाडकरूने पोट बिऱ्हाडकरू ठेवून मालकाला घराचा कब्जा दिला नाही व घराची नासधूस होऊन ते नामशेष होण्याची वेळ आली की मालक पित्ताने घेरी येऊन पडलाच म्हणून समजावे.
१८८३ समुद्रात बुडणाऱ्या जीवास उडी टाकून वर काढल्यावरही आता काय मी बुडतो आहे म्हणून जीव देणेस प्रवृत्त होणार असेल तर त्याची काळजी करणे व्यर्थ. उलटपक्षी तो जर त्यास प्रवृत्त न होता आपले आयुष्य सार्थकी लावेल तर त्याची काळजी करणेचे कारण नाहीच नाही.
१८८४ काळजीने झुरावे येवढेच. चिंता करून काय होते?
१८८५ काळ आणि वेळ आल्याशिवाय काहीच होत नाही.
१८८६ तुका म्हणे नाही चालत तातडी। प्राप्त काळ घडी आल्यावीण ।।
१८८७ तुका म्हणे ने दी आणिकांचे हाती। बैसला तो चित्ती निवडेना ।।
१८८८ श्वासोच्छ्वास सुरू झाला की बाकीची तक्रार आपोआप दूर होईल. त्याला फारसे सायास नकोत.
१८८९ घराचा कब्जा मिळाला व मालकाच्या ताब्यात घर आले म्हणजे त्यात सामानसुमान कसे लावावे व कोठे ठेवावे याची व्यवस्था लावणेची फारशी पंचाईत नाही.



१८९० द्वंद्वाच्या झगड्यात शांततेने प्रेमपूर्वक कर्तव्य-पार होणाराच महात्मा.
१८९१ कृष्णाबाईस महापूर ते नेहमीच येतात? पण त्यात जीव देऊन माणसाने आत्महत्येसारखे महापातक घेणेपेक्षा आपल्या देहाचे सार्थक व्हावे म्हणून देहदु:ख हेच सुख का मानू नये?
१८९२ कोणत्याही सुखाचा शेवट दु:खातच म्हणून जाणती माणसे देह दु:खातच सुखी होत असल्याने त्याना दु:ख करणेचा प्रसंग येत नाही; कारण त्याचा शेवट सुखाचाच आहे.
१८९३ नश्वर गोष्टीवर प्रेम केले तरी शेवटी सर्व सोडून परलोकात एकटेच जावे लागते. मग अशा रीतीने शेवट दु:खाचा करणेपेक्षा तेच दु:ख आधी घेऊन परलोकी हसतच का जाऊ नये?
१८९४ जगि आसरा । प्रभुचा खरा ।।
फास पसारा । नाशिवंत सारा ।। भवसागर हा पार कराया ।
शांति सुखाचा पंथ धराया। मधुर नाम नौका धाडा ।। १ ।।
१८९५ मनावर उठणाऱ्या वृत्ती दृश्याशी तादात्म्य न होता जर मनाशीच तादात्म्य झाल्या तर तेथेच जिरतात व सुखरूप होतात. यामुळे दृश्य पदार्थाची तेथे जरुरी रहात नाही व सुखात कमती येत नाही.
१८९६ शरीरातील कोणतीही शक्ति संयमाने वाढते; त्यालाच आपण रिद्धि-सिद्धि म्हणतो.
१८९७ महाराज काळजी वाहणारे समर्थ असता आम्ही काळजी वाहणे म्हणजे श्रीकृष्णाने गोवर्धन उचलला असता गोपाळांनी काठ्या लावून कुंथण्यापैकीच आहे.
१८९८ आपण आपले राखावे व दुसऱ्यास चांगुलपणा द्यावा तरच मौज
१८९९ अनुभव येऊनही मनुष्याची वृत्ती परतणेची पंचाईत. युक्तीने व विवेकानेच ती हटवावी लागते, तर नुसत्या बोधामृताने काय झाले असते?

१९०० अनुभव येऊन मनुष्याचे ज्ञान दृढ झाले की वृत्ति परतलीच म्हणून समजावे.

१९०१ नुसत्या अनुभवाचा अगर नुसत्या ज्ञानाचा उपयोग व्हावा तसा होत नाही. म्हणून परमेश्वर अनुभव देऊन मनुष्यास ज्ञान देतो व वृत्ति अंतर्मुख करतो.

१९०२ ज्याच्या वृत्ति परतल्या त्याच्याच आरत्या होतात.

१९०३ मनुष्याचे सुख-दुःख हे त्याच्या कल्पनेत आहे, प्रत्यक्षात नाही हा सिद्धांत आहे.

१९०४ वृत्ति दृश्यावर उठली की शरीर दृश्याकडे धावते व तेच सुखदुःखाचे कारण बनते; म्हणून वृत्ति ही वृत्तिवरच उठू द्यावी म्हणजे परिणामी तरी सुखदुःखाचे झोले बसणार नाहीत.

१९०५ शरीर नेहमी दुःखीच असावे, तरच जीवाला ब्रह्मानंदाची प्राप्ती होईल.

१९०६ शरीराच्या दुःखाने आपण मात्र दुःखी होऊन त्यात ती वलये वाढवून दुसऱ्यास घेऊन पडू नये.

१९०७ शरीराच्या दुःखाने आपण दुःखी होऊन त्यात दुसऱ्यास ओढण्याचा प्रयत्न म्हणजेच जीवाचा भ्रांत स्वभाव व सुख-दुःखाचा गोदम काला.

१९०८ वृत्तीवर वृत्ति उठली की मनास सुख व शरीरास दुःख

१९०९ वृत्ति वृत्तीतच जिरली की जीवास सुख व मनास दुःख, शरीरास त्याची जाणीव नाही.

१९१० शरीराचे चोजले कितीही पुरविले तरी ते अपुरेच.

१९११ वृत्तीचा निरास झाला की जीवास निर्भेळ सुख व मनास व शरीरास त्याची जाणीव नाही.

१९१२ शरीर दुःखी असता मनुष्य कल्पनेनेही सुखी होतो.

१९१३ शरीरास चोवीस तास सुखी ठेवणे अशक्य.

१९१४ प्रत्यक्ष शरीर सुखात असताही मनुष्य निर्विकल्प असेल तर त्यात सुख नाहीच म्हणून कल्पनेत सुख दुःख असेच म्हणावे लागते व असे आहे



तर सुख दुःखाचा दंड का घ्यावा?

१९१५ बँक बुडाली म्हणताच दुःख पण तुमची नव्हे म्हणताच सुख

१९१६ उंदीर पाय कुरतडू लागला तर आग होत नाही उलटे बरेच वाटते कारण तो फुंकर घालत कुरतडतो व त्याचे कुरतडून झाले की आग होते.

१९१७ पैसे टाकल्याखेरीज दुकानातील माल देखील मिळत नाही तर त्यागाशिवाय ब्रह्मानंद कोठून मिळेल?

१९१८ जगातील सर्व विषय हे विषारीच आहेत त्याचा सदुपयोग दुरुपयोग करणे आपले हाती आहे. ज्याला त्याचा उपयोग कसा करून घ्यावा याचे ज्ञान नाही त्यानी तो मार्ग सोडावा हेच उत्तम.

१९१९ शरीरास जसे सुख पुरवावे तसे ते अधिकच अपेक्षेने दुःखी होते म्हणून ते दुःखीच ठेवावे, म्हणजे अधिक दुःख त्यास होणार नाही व कल्पनेने मनास सुखी ठेवून निर्विकल्पतेने ब्रह्मानंद भोगणेही अवघड होणार नाही.

१९२० अधिक दुःख न होणे हेच सुख, हे ज्यास कळले तोच देहदुःखास सुख मानतो व निरपेक्ष होतो.

१९२१ परमेश्वराने मनुष्यास दिल्यपेक्षा जास्त आशा धरली की तो ठार झाला असेच समजावे.

१९२२ पोट भरल्यावर तू तृप्त झाला आहेस किंवा कुत्सित बुद्धीने अगदी उपाशी आहेस असेही म्हणणेचे कारण नाही.

१९२३ पोट भरले की तृप्ति झालीच.

१९२४ जीवनकलेवरच जगणाराला, कशाचीच आवश्यकता नाही.

१९२५ स्वामी रामतीर्थाना लोकांचे दर्शनाचाही त्रास वाटे.

१९२६ संत हे एकांतप्रिय असल्याने चैतन्याशी समरस होण्याची हातोटी अगदी सूक्ष्म असल्याने, अगदी थोड्या उपसर्गानेही त्यांना त्रास पोचतो.

१९२७ हिराही दगडच पण तो न भंगणारा असल्याने त्याला किंमत आहे.

१९२८ इतरांचे काव्य चुलीत जाते पण तुकाराम महाराजांचे अभंग हे अभंगच

राहिले, म्हणून त्याचे महत्त्व आहे.

१९२९ परमेश्वराने आपले कोडकौतुक व लाड किती पुरविले आहेत याचा विचार केला तर जीवाची कुरकुर होणार नाही.

१९३० मनुष्याने नेहमीच खाली पाहून चालावे; म्हणजे त्यास दु:ख करणेचा प्रसंग येत नाही.

१९३१ घरात दिवा आणि दारात अडखळतोय असे नसावे.

१९३२ ज्याला दिसेल व वाटेल तसे तो म्हणतो म्हणून सर्वांचे सर्व खरेच.

१९३३ सर्वांना सर्व ज्ञात नसल्याने त्यांच्या प्रशंसेस अगर निंदेसच अर्थ नाही.

१९३४ मनुष्याचे खरे खोटे तो मेल्याशिवाय कळत नाही हेच खरे!

१९३५ आपण कसे आहोत हे बरोबर परमेश्वर किंवा महाराजच सांगू शकतील. जितकी माणसे अधिक मोठी तितकी ती अधिक नम्र असतात.

१९३६ विद्या ही विनयानेच शोभते.

१९३७ पती-पत्नीचे सुख दु:ख एकच असल्याने स्त्रियाना पातिव्रत्त्यासारखा धर्मच नाही

१९३८ शील संभाळणेसारखा जगात अलंकारच नाही.

१९३९ शीलवान् मनुष्य गुणवान् असतो.

१९४० स्त्रीचे सर्व दु:ख पति घेतो व तिच्या सुखदु:खात तो सहभागी होतो म्हणून पतीशी पातिव्रत्याने व्रतस्थ राहणे हेच पत्नीचे आद्य व श्रेष्ठ कर्तव्य ठरते.

१९४१ बाजारी प्रेम ते प्रेम नसून तो बाजारच आहे हे निश्चित समजावे.

१९४२ बाजारात जिन्नस गेला की त्याची किंमत कमी झाली म्हणून समजावे. जोपर्यंत तो तिजोरीत मालकाचे ताब्यात आहे तोपर्यंतच त्याची किंमत.

१९४३ वायुलहरी आत्म्यावरच विलसत असल्याने त्यांचे प्रेम व सानिध्य अखंडच आहे हे निश्चित.

१९४४ फास पसारा नाशिवंत सारा ''हे ज्याला पटले तो तरी फास अडकवून आपला जीव गमवण्याच्या नादास लागणार नाही हे खास.



१९४५ तत्त्वज्ञांचे चारित्र्य त्यांच्या विचारातच प्रगट होते.

१९४६ प्रवाशाला घरी जाण्याची घाई असल्याने जितकी स्टेशने तो पुढे जाईल तसा त्याचा आनंद वाढतो.

१९४७ प्रवासात दु:ख पण घरी जाण्यात सुखच आहे.

१९४८ चैतन्याचा गुणच असा आहे की त्याची नेहमी ऐटच.

१९४९ सूर्य हा केव्हा ही उगवला तरी त्याचे बरोबर प्रकाश हा असणारच.

१९५० मनुष्याची एक काळजी दूर झाली की दुसरी दत्त करून उभी रहाते व ज्याची कमी झाली त्याचे त्याला सुख वाटते, हीच परमेश्वराची जादू आहे.

१९५१ कोणतीही गोष्ट मागे सारणे म्हणजेच आपण पुढे जाणे.

१९५२ सारे जग मागे सारून ज्याने आपल्या दृष्टीसमोर सतत चैतन्यच ठेवले तो त्याच्या केवळ दर्शनानेही सुखी होतो.

१९५३ ज्याच्या दर्शनानेही जीवाला विश्रांति प्राप्त होते तेच ब्रह्म.

१९५४ मुलाने आईच्या नावाचा टाहो फोडला की मुलाचे काम झालेच म्हणून समजावे; त्याला विद्वत्तेची गरज नाही.

१९५५ कोणी म्हणतात मी आपल्या पायावर उभा असतो तर सुखी झालो असतो; पण आपल्या पायावर उभे असलेले दुसऱ्याचा पाय का ओढतात हेच कळत नाही.

## श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प यादी

| श्रीदासराम ग्रंथमाला | पुष्प क्रमांक | प्रकाशन वर्ष |
|---|---|---|
| चिमड संप्रदाय | १ | २००५ |
| श्रीरामदासस्वामी चरित्र | २ | २००६ |
| भजन तरंग | ३ | २००६ |
| हरिपाठ संकीर्तन | ४ | २००७ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | ५ | २००७ |
| दासबोधातील तत्त्वज्ञान | ६ | २००७ |
| दासराममहाराज : वचनसंग्रह | ७ | २००८ |
| श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे चरित्र | ८ | २००९ |
| साधनसंध्या | ९ | २००९ |
| अनंत अमृत स्मरण | १० | २००९ |
| श्रीगुरुमहिमा | ११ | २००९ |
| श्रीज्ञानेश्वरी प्रसाद | १२ | २००९ |
| श्रीदासरामगाथा पुरवणी | १३ | २००९ |
| श्रीदासराममहाराज : आत्मचरित्र | १४ | २०१० |
| श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र | १५ | २०१० |
| श्रीदासराममहाराजकृत श्लोकरचना | १६ | २०१० |
| अनुभवामृत : श्रीदासराममहाराजकृत समओवी टीकेसह | १७ | २०१० |
| श्रीदासरामहाराज सहस्रनामस्तोत्रम् | १८ | २०१० |
| आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | १९ | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २० | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २१ | २०१० |

## श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प यादी

| श्रीदासराम ग्रंथमाला | पुष्प क्रमांक | प्रकाशन वर्ष |
|---|---|---|
| श्रीरामनिकेतन (परिचय पत्रिका) | २२ | २०११ |
| श्रीरामनिकेतनमधील आराधना | २३ | २०११ |
| ग्रंथत्रयी | २४ | २०११ |
| उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | २५ | २०११ |
| अभंग दरबार | २६ | २०११ |
| सद्‍बोध दशक | २७ | २०११ |
| श्रीदासराममहाराजांचे नित्यपाठचरित्र (३ री आवृत्ति) | २८ | २०११ |
| श्रीगुरुराज कथित ज्ञान आणि बोध | २९ | २०११ |
| प. पू. मातोश्री माईसाहेब यरगट्टीकर यांचे चरित्र | ३० | २०११ |
| पाठांतरसुलभ भगवद्‍गीता (आवृत्ति २ री) | ३१ | २०११ |
| श्रीदासराममहाराज लिखित लघुचरित्रे | ३२ | २०११ |
| श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस कृत मनोबोध व निवडक अभंग (विवरणासह) | ३३ | २०११ |
| प.पू. सद्‍गुरु श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर ऊर्फ श्रीचिमडमहाराज | ३४ | २०११ |
| महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का | ३५ | २०११ |
| तो हा दासबोध | ३६ | २०११ |
| श्रीदासराममहाराज चरितामृत (दुसरी आवृत्ति) | ३७ | २०११ |
| प.पू. श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे चरित्र | ३८ | २०११ |
| प.पू. श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र | ३९ | २०११ |
| प.पू. श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे चरित्र | ४० | २०११ |